म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. ९८९७

IRBK-0109897

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क्र. ८८९७



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

- 5 MAY 1977

30 MAY 1975

16/12

[क्र. मा. प.]

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः॥

# आईची देणगी

IRBK-0109897

गो. नी. दाण्डेकर

गो : ६ [ वै. ८४ ]

• •

© १९६२
गोकुळ मासिक प्रकाशन

• •

आईची देणगी : पुस्तक पांचवें

• •

मूल्य दीड रुपया

• •

आठ पुस्तकांचा संच : रु. १२

• •

पहिलीं तीन पुस्तकें : पुनर्मुद्रण
पुढील तीन पुस्तकें :
पहिली आवृत्ति
शके १८८४; सन १९६२

• •

चित्रकार : ग. वि. देशपांडे

• •

संपादक-संयोजक :
अमरेन्द्र गाडगीळ

• •


एकमेव विक्रेते :
श्री लेखनवाचन भांडार
लक्ष्मी रस्ता, गणपति चौक, पुणें २

• •

प्रकाशक :
सौ. मंगला गाडगीळ
गोकुळ मासिक प्रकाशनांकरितां
११९४ सदाशिव पेठ, पुणें २

• •

मुद्रक :
श्री. ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ, पुणें २



मित्रांनो ! तुम्ही आजचीं मुलें म्हणजे उद्यांचे या देशाचे नागरिक — भारताचे भावी नागरिक. भारतीय म्हणून तुम्हांला जग ओळखणार. तुमचा देश तुमच्याकडून तुम्ही खरेखुरे, अतर्बाह्य भारतीय असावेत अशी अपेक्षा करणार.

हें सगळें खरें; पण भारतीय नागरिक म्हणजे काय? तो कसा असला पाहिजे? असे प्रश्न तुम्ही साहजिकच विचाराल. त्यांचें उत्तर म्हणजेच हीं आठ पुस्तकें.

भारत हें एक राष्ट्र आहे. कोणतेंहि राष्ट्र त्यांतील घटकांनीं — तेथील नागरिकांनीं बनत असतें. हे नागरिक त्या राष्ट्राच्या इतिहासांतून, धर्मांतून, संस्कृतींतून, परपरांतून घडत असतात. पण तो सारा ओजस्वी इतिहास, तो विश्वमन्य धर्म, ती विशाल संस्कृति, ती अखंड तेजस्वी परंपरा सारेंच्या सारें कांहीं या लहानशा पुस्तकांतून सांगतां यण्यासारखें नाहीं... म्हणून त्यांतून निवडलेल्या या कथा तुमच्या हातीं देत आहोंत.

राष्ट्राची उभारणी होण्यासाठीं राष्ट्रीय, सामाजिक सद्गुणांची गरज असते. त्या सद्गुणांच्या जोपासनेंतूनच राष्ट्राचे नागरिक निर्माण होत असतात. असे छत्तीस राष्ट्रीय सद्गुण आम्ही निवडले. त्या प्रत्येक सद्गुणाच्या दोन कथा निवडल्या. त्यांपैकीं एक प्राचीन कालांतली व दुसरी ऐतिहासिक किंवा आधुनिक कालांतली. अशा आठ-किंवा दहा कथांचें एक पुस्तक याप्रमाणें आठ पुस्तकें तयार केलीं. आणि तींच हीं या संचरूपानें — पेटींतून तुमच्या हातीं देत आहोंत.

तुम्ही राष्ट्राचे नागरिक म्हणून कोणते गुण आपल्या अंगीं बाणवावेत हें ओळीनें या पुस्तकांतील कथांतून सांगितलेलें आहे. त्या कथा तुम्ही वाचा आणि त्यांवर विचार करा. नुसती गंमत म्हणून वाचून हीं पुस्तकें भिरकावून देऊं नका. हा आईच्या देणगीचा — आपल्या थोरल्या आईच्या — भारतमातेच्या सद्गुणांच्या देणगीचा अमोल ठेवा तुमच्या हातीं आम्ही देत आहोंत. तो हृदयांत जतन करून ठेवा आणि त्याचें मर्म आपल्या जीवनांत उतरवा.

— संपादक

सद्गुण १८. कर्तव्यनिष्ठा

१. एकच एक-लक्ष्मण ! ... ... ... पस्तिसावी
२. अप्पांच्या कतव्यनिष्ठेचा विजय ... ... छत्तिसावी

सद्गुण १९. सच्छील

३. या वस्तूला शिवायचं नाहीं ... ... सदतिसावी
४. आम्हीं विष्णुदास तसे नव्हों ! ... ... अडतिसावी

सद्गुण २० ज्ञानलालसा

५. मला शिकायचं आहे ... ... एकोणचाळीसावी
६. होईनच मी एम्. ए. ... ... ... चाळिसावी

सद्गुण २१. श्रद्धा

७. माझा देव सगळीकडे ... ... ... एक्केचाळिसावी
८. मांजरीचीं पिलं ... ... ... एक्केचाळिसावी

सद्गुण २१. मातृभक्ति

९. मातृभक्त गरुड ... ... ... त्रेचाळिसावी
१०. आई आलों ना मी ! ... ... ... चव्वेचाळिसावी

## पुस्तक पांचवें

अनुक्रम ...
विभाग ...
क्रमांक 3002
नों. दि. ...

# एकच एक लक्ष्मण !

माझ्या बालमित्रांनो !

मीं एक मुलगा पाहिलाय्. भारी हट्टी. खूब रडका. सगळ्या मुलखाच्या खोड्या त्याच्या अंगांत भरलेल्या. कध्धीं म्हणून शाळेंत जायचा नाहीं. त्याला एकदां विचारलें,

" काय रे, तूं शाळेंत जायला कां कंटाळतोस ? "

तर त्यानें उत्तर भारी गमतीदार दिलेंन्. तो काय म्हणतो, " हो ! कंटाळतों ! मग ? अन् तिथें मास्तर कशाला असतात ? " तात्पर्य, त्याला अशी शाळा पाहिजे कीं, जिथें मास्तर नाहींत. सगळीं मुलेंच मुलें ! पण त्याच्या वडिलांची गंमत अशी कीं, त्याला रोज रडत रडत ते शाळेंत घेऊन जातात ! कधीं त्याला खाऊ देतील. कधीं फुगा देतील. कधीं नवी टोपी घेऊन देतील. तर कधीं धबाधब धबकेहि मारीत चालतील. पण नेहमीं आपली ती दुक्कल दिसायचीच !


त्यांना विचारलें, " कां हो, याला जर इतका कंटाळा आहे, तर मग तुम्ही तरी रोज कां त्याला शाळेंत नेऊन गुदरतां ? "

तर ते काय म्हणतात, " अहो मला माझें पितृकर्तव्य म्हणून कांहीं आहे ना, तें मला पार पाडलेंच पाहिजे ! नाहीं तर उद्यां लोक म्हणायचे, पहा ! बाप जिवंत असून त्यानें कांहीं पोराला शिकवलें नाहीं ! "

मित्रांनो, हें पितृकर्तव्य म्हणजे काय ? आपल्या समाजांत किनई प्रत्येकाकडे कांहीं गोष्टी नेमून दिलेल्या असतात. त्या त्यानें केल्याच

पाहिजेत. त्या केल्याशिवाय त्याला गत्यंतर नाहीं. कांहीं गोष्टी मुलाकडे सोपवल्या, त्यांना म्हणायचें पुत्रकर्तव्य. कांहीं भावाकडे, त्यांचें नांव भ्रातृकर्तव्य. या गोष्टी अगदीं अगत्यानें, निष्टेनें पार पाडणारीं अनेक माणसें आपल्या या देशांत जन्मलीं आहेत.

अयोध्येंतली गोष्ट. राम कैकेयीच्या महालाकडे निघाले आहेत. सुंदर राम. सुदृढ राम. तेजस्वी राम. युवक राम. ते मनांत विचार करताहेत, "मला बाबांनीं कशाला बोलावलें असेल बरें ? काय काम असेल असें महत्त्वाचें ?" येऊन पोहोंचले महालांत. तेजस्वी राम कैकेयीच्या महालांत आल्याबरोबर सगळीकडे प्रकाश पसरला. पण त्यांना त्यांचे वडील कुठें दिसेनात ! एका दासीला विचारलें त्यांनीं, "बाबा कुठें आहेत ? आई कुठें आहे ?"



त्या दासीनें खालच्या मानेनें सांगितलें, "क्रोधागारांत !"

'क्रोधागारांत ?' राम चकितच झाले. 'बाबा क्रोधागारांत कां गेले ?' ते तसेच क्रोधागाराकडे वळले. क्रोधागार म्हणजे राग आल्यावर बसायची खोली. राम क्रोधागारांत शिरले. काय दिसलें त्यांना ? त्यांनीं

पाहिलें कीं, आपले वडील अत्यंत दुःखी होऊन कपाळावर हात दऊन बसेले आहेत. अन् शेजारीं कैकेयी उभी आहे.

" बाबांनीं कां आठवण केली होती माझी ? " रामांनीं विचारलें. पण दशरथ कांहींहि बोलेना. थोडा वेळ वाट पाहिली रामांनीं. अन् मग ते दशरथाच्या जवळ गेले अन् म्हणाले, " बाबा कां बोलत नाहींत ? आई, बाबांना कसलें दुःख होतें आहे ? "

" वचनभंगाचें ! " कैकेयी फणकाऱ्यानें म्हणाली.



" वचनभंग ? कुणाचा वचनभंग ? कुणाला वचन दिलें होतें बाबांनीं ? "

" तुझ्या बाबांना नाहीं सांगवत. मीच सांगतें सगळें. तुझ्या बाबांनीं पूर्वीं एकदां दोन वर दिले होते मला. अन् आतां मी ते वर मागूं लागलें, तर त्यांना जड जातें आहे. "

" सांग, आई, मला सांग ते वर. मला ते पूर्ण करतां येतील तर मी करीन. "

" तुझ्यासंबंधींच आहेत ते. "

" काय ? माझ्यासंबंधीं ? " रामांनीं आश्चर्यानें विचारलें.

" हो. तुझ्यासंबंधीं. एक वर असा आहे कीं, तूं चौदा वर्षं वनवासास जावें. अन् दुसरा वर असा कीं, माझ्या भरताला राज्य मिळावें. " कठोर हृदयाची कैकेयी म्हणाली.

क्षणभर धक्काच बसला रामांना. 'कैकेयी आपली आई. सावत्र कां होईना, पण आई आहे ती. ती असें कसें बोलेल ? तिचें मांझ्यावर कितीतरी प्रेम आहे !' परत एकदां राम म्हणाले, " आई, मी ऐकतों आहें तें बरोबर आहे ना ? माझ्या कानांना तर कांहीं झालें नाहीं ना ? मी स्वप्नांत तर नाहीं ना ? "

दुष्ट स्वभावाची कैकेयी म्हणाली, " छे छे रामा, तूं अगदीं शुद्धीवर आहेस. तुझे कानहि बरोबर ऐकत आहेत. खरोखरच तूं चौदा वर्षं वनांत जाऊन तुझ्या वडिलांनीं मला दिलेला वर खरा करशील का ? "

काय बोलले राम ? आपण काय बोललों असलों ? आपण कैकेयीवर 'कोर्टांत फिर्याद' केली असती ! दशरथावर आपण 'नोटिस बजावली' असती ! आपण अकांडतांडव केलें असतें. आपण चहूंकडे दंगल माजवली असती. आपण बंड केलें असतें.

पण रामांनीं काय केलें ? काय बोलले राम ?

राम म्हणाले, " आई, बाबांचें वचन खरें करण्याकरितां एकदांच काय पण दहादां सुद्धां मी अरण्यांत जाईन. तूं कांहीं चिंता करूं नकोस राम दिलेलें वचन मागें घेत नाहीं.

"रामो द्विर्नाभिभाषते।"

दशरथ हें सगळें ऐकत होता. रामांचा हा निश्चय ऐकल्याबरोबर त्यानें एक उसासा सोडला. कैकेयीला असा कांहीं आनंद झाला कीं, ती म्हणाली, "रामा, तूं खरें का वनांत जाणार आहेस? मग केव्हां निघतोस बोल."

"आई, मी कौसल्येची भेट घेऊन येतों. सीतेची समजूत करतों. आणि मग निघतोंच बघ."

राम कैकेयीच्या महालांतून निघाले. दृढनिश्चयी राम. झपाझप चालत ते कौसल्येच्या महालांत पोहोंचले. कौसल्या अत्यंत आनंदांत बसली होती. आज तिच्या मुलाला यौवराज्याभिषेक होणार होता. तिचा मुलगा आतां युवराज बनणार होता. आज तिच्या सुखाला सीमा नव्हती.

राम आले. त्यांनीं कौसल्येला नमस्कार केला. कौसल्येनें उठून रामांना पोटाशीं धरलें. तिच्या डोळ्यांतून आनंदाचीं आंसवें वहायला लागलीं. राम म्हणाले, "आई, मी आलों आहें."

कौसल्या आपल्या आंसवांनीं रामांना न्हाऊं घालीत म्हणाली, "बाळ, तूं आला आहेस? मला माहीतच होतें कीं, आज सकाळीं तूं येणार. कारण नंतर दिवसभर तुझी-माझी अशी मोकळी भेट होणार नाहीं."

राम हंसून म्हणाले, "आई, आतां दिवसभरच काय पण चौदा वर्षें मी तुला भेटणार नाहीं. आई, मी तुझा निरोप घ्यायला आलों आहें."

कौसल्येनें रामांना सोडलें. जरा पाठीमागें सरली ती. आश्चर्यानें तिनें डोळे विस्फारले. अन् तिनें विचारलें, "काय म्हणालास? रामा काय बोललास तूं?"

राम म्हणाले, "आई, आज मी वनांत जायला निघणार. कैकेयी-माता मला वनांत पाठवत्ये आहे. तिनें बाबांजवळ दोन वर मागितले. एका वराप्रमाणें मीं वनांत जावें. अन् दुसऱ्या वरानें भरतानें राज्य करावें.

बाबांनीं तिला पूर्वी वर देण्याचें कबूल केलें होतें. तें बाबांचें वचन मी कसें खोटें करूं ? ”

कौसल्या ! बिचारी कौसल्या ! मटकन् खालींच बसली ती. तिची कंबरच खचली. तिच्या तोंडांतून शब्दहि बाहेर पडेना कांहीं वेळ. आणि मग ती मोठमोठ्यानें शोक करूं लागली. ‘आपला मुलगा, अन् तो आपलें पुत्रकर्तव्य पार पाडण्याकरितां चौदा वर्षें वनांत जाणार ! आज तो युवराज होणार होता ! अन् एका घटकेंत काय झालें कोण जाणे !’

‘तो वनांत जायला निघाला आहे. अन् तोहि थोडेथिडके दिवस नव्हे, तर लांबलचक चौदा वर्षें !’ तिला कल्पनाहि सहन होईना ओक्साबोक्शीं रडूं लागली ती.

राम तिला समजावूं लागले. “आई, तूं माझी आई ना ! मग अशी रडत्येस कां ? तूं तर मला धीर द्यायचास. मला आशीर्वाद द्यायचास. मोठ्या आनंदानें मला पोहोंचतें करायला वेशीपर्यंत यायचेंस. तर तूंच अशी रडत्येस ? ”

“रामा, माझ्या सोन्या, काय करूं मी ? कसें सहन करूं मी हें ? कुठून आणूं धैर्य ? तूं नसल्यावर माझे प्राण तरी रहातील का ? पाण्याविना मासा कसा जगेल ? वाऱ्यावांचून पांखरूं मरणार नाहीं का ? माझ्या सोन्या, नको रे सोडून जाऊं मला ! ”

“आई, जाऊं नको तर काय करूं ? वडिलांचें वचन खोटें करूं का ? सूर्यकुलाच्या कीर्तीला कलंक लागूं देऊं का ? मग लोक मला काय म्हणतील ? ते म्हणतील, ‘राम अगदीं वाईट मुलगा होता. त्यानें वडिलांचें वचन पुरें केलें नाहीं. त्याला राज्याचा लोभ झाला. त्याला कष्ट सहन करवले नाहींत. तो सुखाला लालचावला होता. त्याला सेवेला दासदासी पाहिजे होत्या. त्याला जेवायला पक्वान्नें पाहिजे होतीं. त्याला रहायला महाल पाहिजे होता. त्याला झोंपायला चांगल्या गाद्यागिरद्या

३००/ १०१० ३००१

पाहिजे होत्या. म्हणून त्यानें वडिलांचें वचन पुरें केलें नाहीं. म्हणून त्यानें पुत्रकर्तव्य पाळलें नाहीं. म्हणून तो वनांत गेला नाहीं.' ते मला नांवें ठेवतील —"

"कांहीं नाहीं ठेवायचे नांवें —" कुणी तरी रागानें बोललें.

रामांनीं मागें वळून पाहिलें. कोण बोललें रागानें ? राम वनवासाला जातात, म्हणून कुणाला राग आला ? रामांना कष्ट भोगावे लागतील म्हणून कोण संतापला ?

कोण दिसलें रामांना ?

रामांना दिसला लक्ष्मण. तेजस्वी लक्ष्मण. धनुष्य खांद्यावर घेतलेला लक्ष्मण. बाणांचा भाता पाठीवर असलेला लक्ष्मण. रागानें कपाळाला आंठ्या पडलेला लक्ष्मण. तो पुढें आला.

"कोण बोलला हें ? लक्ष्मणच का ?" रामांनीं आश्चर्यानें विचारलें.

"होय दादा, मीच तो लक्ष्मण — लोकांना काय लागतें आहे नांवें ठेवायला ? एका बाईच्या हट्टाकरितां राम वनांत जाणार नाहींत. त्यांना आज यौवराज्याभिषेक व्हायचा आहे. अन् आज तो समारंभ होणारच. मी पहातों कोण आड येतो तो मी स्वतः तिथें उभा राहीन धनुष्यबाण घेऊन, अन् माझ्या दादाला यौवराज्याभिषेक होतोसा पाहीन. कैकेयीला आजच संधि मिळाली वाटतें वर मागण्याची ?"

"ऊंहूं ऊंहूं ! लक्ष्मणा, ऐकवत नाहीं माझ्यानें हें ! अरे, कांहीं झालें तरी आईची निंदा करावी का रे ?"

"अलबत करावी. अशी कशी आई ? मुलाला वनांत पाठवणारी ?"

"असूं दे, लक्ष्मणा, वनांत पाठवलें तरी ती आईच. अन् बाबा तिला वर देऊन चुकले आहेत. ते तिनें आज मागितले, यांत तिचें काय चुकलें ? पण लक्ष्मणा, तुला माहीत नाहीं का ? राम एकदां दिलेलें वचन फिरवीत नसतो ! — आई, मग येऊं ना मी ? येतों हां."

निघाले राम. लक्ष्मण एक क्षणभर तिथें थांबला. त्यानें आतां काय करायचें तें ठरवलें. एका क्षणांतच. तो फार वेळ विचार करीत बसला नाहीं. फार लवकर त्यानें निश्चय केला –

अन् तो रामांच्या मागें निघाला !

राम सीतेच्या महालांत आले. सीतेचा त्या दिवशींचा आनंद काय वर्णावा ! ती विचार करीत होती – 'आतां माझे राम युवराज होतील ! किती चांगले आहेत ते ! किती सद्‌गुणी. किती पराक्रमी. किती धैर्यशाली. ते युवराजपदाला योग्यच आहेत मुळीं.' इतक्यांत –

"सीते !" रामांनीं हांक मारली.

जराशी लाजली सीता. 'प्रभु आले, अन् मी बसलेली !' पटकन् उठली ती.

"सीते," परत राम हंसून म्हणाले, "अगदीं वाट पहात होतीस ना माझी ? पण आतां चौदा वर्षं वाट पहावी लागेल. तोंपर्यंत धीर निघेल ना ?"

"म्हणजे ? कुठें जायचें आहे चौदा वर्षं ?"

"वनवासाला ! कैकेयी मातेच्या इच्छेप्रमाणें. बाबांचें वचन पुरें करण्याकरितां."

"हें काय नवीनच ? मला सांगायचें नाहीं का सगळें स्पष्ट ?"

रामांनीं सीतेला सगळा वृत्तान्त सांगितला. अन् म्हणाले, "मग तूं रहाशील ना इथें ? रहा हो ! बघ. आई अन् बाबा वृद्ध आहेत. त्यांतल्या त्यांत आईला तर भारी वाईट वाटलें आहे तूं त्यांची सेवा कर. त्यांना माझी आठवण होऊं देऊं नकोस. मग रहाशील ना ?"

"मुळींच नाहीं रहायची ! मीही वनांत येईन. जिथें राम तिथें सीता. जिथें वृक्ष तिथें छाया. सांवली झाडाला सोडून कशी राहील ? सीता रामांना सोडून कशी राहील ? जिथें जिथें आपण जाल, तिथें तिथें आपल्या पावलां-वर पावलें टाकीत मीही येईन."

" असें काय करतेस सीते ? वनांत किती कष्ट असतात ! काटे-कुटें. रहायला जागा नाहीं. खायला कंदमुळांशिवाय दुसरें अन्न नाहीं. अन् शिवाय जंगली जनावरांची भीति. तुला कष्ट भोगायची संवय नाहीं. रानांत रहाणें तुझ्याच्यानें व्हायचें नाहीं. "

" होईल. खात्रीनें होईल. मलाही होईल संवय. नाथ, आपण लक्षांत ठेवा कीं, कांहींही सांगितलेंत, कितीही भीति घातलीत, म्हणून कांहीं मी आपल्याबरोबर वनांत आल्याशिवाय रहायची नाहीं. "

" अन् मीही येणार ! " लक्ष्मण महालांत पाऊल टाकीत म्हणाला. राम आश्चर्यानें म्हणाले, " अरे, तुम्हांला झालें आहे तरी काय ? "

" कांहीं झालें नाहीं. " लक्ष्मण अन् सीता दोघेंहि एकदम म्हणालीं अन् खुदकन् हंसलीं.

" अरे, हिला समजावतां समजावतां पुरेवाट झाली आहे मला. अन् त्यांत आतां लक्ष्मणा, तुझी भर ! "

लक्ष्मण रामाजवळ आला. त्यांचा हात धरलान् त्यानें अन् गहिंवरल्या आवाजांत तो म्हणाला, " रामा, तुमच्याशिवाय कसा राहूं ? "

" अरे, पण तूं वनांत जावेंस, अशी कांहीं कैकयीची इच्छा नाहीं ! " राम त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले.

" पण माझी इच्छा आहे ना ? रामा, मला फक्त येऊं द्याच तुमच्याबरोबर. मी तुमच्या मागोमाग चालेन. तुम्हांला बसायला जागा स्वच्छ करून देईन. तुम्हांला पाणी आणून देईन. तुमच्याकरितां फळेंमुळें आणीन. रहाण्याकरितां झोंपडी तयार करीन. हा माझा बाणांचा भाता अन् हें धनुष्य घेऊन सदोदित तुमच्या सेवेला हजर असेन मी. "

" अरे, पण बाबांकडे कोण बघेल ? "

" भरत अन् शत्रुघ्न आहेत त्यांच्याकडे बघायला. तुम्ही माझे दादा. तुमच्याबरोबर नको का कुणी ? मी तुमच्याबरोबर असेन. "

" लक्ष्मणा, असें काय करतोस तूं ? माझें ऐकत नाहींस का ? असें काय करावें बरें वेड्यासारखें ? "

" हो ! ऐकेन मी तुमचें. तुम्ही मला आपल्याबरोबर वनांत यायला सांगा. मग पहा ऐकतों कीं नाहीं. तिळभरही बाहेर जाणार नाहीं तुमच्या आज्ञेच्या. "

" अरे पण माझी कशाला चिंता करतोस तूं ? "

" वाः ! म्हणे माझी कशाला चिंता करतोस ! भावाचें म्हणून कांहीं कर्तव्य आहेच कीं नाहीं ? "

" ऐक रे लक्ष्मणा ! येऊं नकोस तूं ! "

" रामा, तुम्ही वनांत गेल्यावर माझ्याच्यानें इथें रहावेल का ? तुम्ही कंदमुळें खात असाल अन् माझ्याच्यानें इकडे पक्वान्नें गिळतील का ? तुम्हांला झोंपायला तिकडे धड चांगली जमीनही नसेल अन् मला इकडे मंचकावर झोंप येईल का ? रामा पाण्याविना मासा जगेल का ? जसा पाण्यांतून काढून टाकलेला मासा, तसा तुमच्याविना मी. तुम्ही गेलांत तर माझ्याकडून एकटें मुळींच रहावायचें नाहीं. "

" नाहीं ऐकत तूं ? बरें तर ये हो लक्ष्मणा ? "

" अन् मी ? " सीतेनें विचारलें.

" तूंही ये. " राम हंसून म्हणाले.

किती आनंद झाला म्हणून सांगूं लक्ष्मणाला ! आनंदाच्या भरांत त्यानें आपल्या दादाला घट्ट मिठी मारली. रामांनीं प्रेमानें त्याच्या पाठीवरून हात फिरवला.

माझ्या बालमित्रांनो, बंधुकर्तव्य व्यवस्थित कुणी पाळलें, असा प्रश्न विचारला, तर उत्तर काय येईल सांगा बघूं ?

" लक्ष्मण ! एकच एक – लक्ष्मण ! "

♣ ♣ ♣

# अप्पांच्या कर्तव्य-निष्ठेचा विजय

बरें का मित्रांनो !

समुद्र पाहिलाय् का तुम्ही ? तुम्हांपैकीं अनेकांनीं पाहिला असेल. समुद्र हें नांव ऐकल्याबरोबर त्या अनेकांना तो खूप मोठा, पहावें तिकडे पाणीच पाणी, असा पाण्याचा सांठा आठवेल. त्याच्या किनाऱ्यावरचे खडकहि आठवतील कित्येकांना. कांहींच्या नजरेसमोर ते मासे धरणारे कोळी, त्यांचीं तीं भलीं लांबलचक जाळीं, त्यांनीं धरून आणलेले ते चकचकीत मासे, त्या समुद्राच्या लाटा, हें सगळें उभें राहील पटकन्. कदाचित् कुणाला समुद्रावरच्या त्या भल्या मोठाल्या लाटाहि आठवतील. मोठाल्या म्हणजे किती मोठाल्या माहीत आहे ?

आपल्या गांवाबाहेर लहान लहान टेकड्या असतात ना ? अगदीं तेवढाल्या ! एँ ! अशा जिभा काय बाहेर काढतां ! कधीं कधीं तर त्याहून मोठाल्या ! अगदीं डोंगराएवढ्या ? हो ! मी कांहीं खोटें नाहीं सांगत !

तर अशा त्या समुद्राच्या कांठीं मुंबईच्या उत्तरेस जवळच वसई नांवाचें ठिकाण. त्या वसईला एक किल्ला. त्या किल्ल्याचा कोट भला रुंद. चांगली ऐसपैस दोन बैलगाड्या जातील एवढी रुंद गच्ची. अन् समुद्राच्या अगदीं तोंडाशीं. त्यामुळें भरती आली कीं चहूंकडे पाणीच पाणी व्हायचें. बरें, किल्ल्याच्या तटाबाहेर लपायला एवढीशी तरी जागा आहे का ? छेः ! सगळी बाहेरची जागा किल्ल्यावरील पहारेकऱ्यांच्या गोळीच्या टप्प्यांत !

अन् त्यांत तो किल्ला होता पोर्तुगिजांकडे. पोर्तुगीज हे चांगले दमदार लढवय्ये म्हणून प्रसिद्ध. त्यांच्याजवळ चांगल्या छान बंदुका. छान ओतीव पंचरशी तोफा. पल्लेदार दुर्बिणी.

पण अशा त्या लढवय्या पोर्तुगिजांच्याहि तोंडांत माती घालून एका शूर मराठ्यानें त्यांच्याकडून तो किल्ला हिसकावून घेतला.

— चिमाजीअप्पा! थोरल्या बाजीराव पेशव्यांचे हे धाकटे भाऊ.

त्याचें असें झालें कीं, पोर्तुगीज हे आपल्या या सुजल सुफल देशांत व्यापाराच्या निमित्तानें पोर्तुगॉलहून आले. पण व्यापाराचें नुसतें सोंग बरं का! त्यांनीं इथें आल्यावर जेव्हां पाहिलें कीं, हे हिंदु लोक बिचारे अगदींच साधे-भोळे आणि सरळ मनाचे आहेत, तेव्हां मग इंग्रजां-सारखीच सुचली कीं दुर्बुद्धि त्यांना! त्यांनाहि वाटलें कीं, आपल्या देशापेक्षां हाच देश बरा आहे! असेना का कुणाचाहि! हिंदूंचा जरी असला तरी थोडी दमदाटी दिली, थोडें मनगटाचें बळ दाखविलें, थोडासा यांच्या आपआपसांतील भांडणाच्या आगीवर आपल्या पोळ्या भाजून घेण्याचा काबेबाजपणा अंगीं असला कीं, मग या देशांतहि राज्य मिळविणें कांहीं फारसें कठीण नाहीं!

अन् मग ते लोक आले अगोदर व्यापाराच्या निमित्तानें, अन् हळू-हळू पाय पसरायला केली कीं त्यांनीं सुरुवात! गोवा घेतलें, तिथें फौज ठेवली आपली. साष्टी घेतली, तिथें किल्ले बांधून बंदोबस्त केला. दमण घेतलें, तो मोर्चा मजबूत केला. दीव घेतलें, तें ठाणें बांधून काढलें.

अन् हा सगळा उद्योग करतां करतां या अस्वलानें आपलीं नखें काढलीं मग बाहेर! पोर्तुगीज हे ख्रिश्चन धर्माचे. त्यांनीं विचार केला कीं, 'हे हिंदु लोक अगदींच निरुपद्रवी दिसताहेत! मग आतां आपल्या धर्माचा प्रचारहि सुरू करूं या धूमधडाक्यानें. साधला भांडण न करतां, तर तसा करूं. अन् भांडण करायची पाळी आली, तर आपल्याला कोणीं शपथ थोडीच घातली आहे! भांडण-तंटेहि करूं!'

अन् एकदां मनुष्यानें अपराध करायचें ठरवलें, म्हणजे मग त्याला धरबंध थोडाच रहातो आहे? पोर्तुगिजांच्या पाठोपाठ पाद्री आले, आणि

त्या पाद्र्यांनीं धर्माच्या नांवाखालीं इथल्या हिंदु जनतेला अगदीं त्राहि भगवान् करून सोडलं ! त्यांनीं 'इन्क्विझेशन' नांवाचें एक कोर्ट स्थापन केलें. आणि जो मनुष्य त्यांच्या 'दयाळु येशूच्या कळपांत' येणार नाहीं' त्याला कोर्टापुढें खेंचूं लागले ते ! त्या कोर्टानेंहि त्या माणसाला नाहीं तसल्या शिक्षा द्याव्यात ! कुणाचा हात छाटून टाकवावा ! कोणाचें डोचकें



तोडवावें ! कोणाचें सालडें काढवावें ! कोणाला गरम राखेचे तोबरे बांधवावेत ! हळूहळू बिचाऱ्या हिंदूंनीं धर्मकृत्येंहि करूं नयेत, असा हुकूम काढला त्या पाद्र्यांनीं !

हिंदूंनीं सत्यनारायण करायचे नाहींत, लग्नें लावायचीं नाहींत, मुंजी करायच्या नाहींत, मारुतीला नमस्कार करायचा नाहीं, देवाचें भजन करायचें नाहीं, अन् कुणी केलेंच, तर त्या बिचाऱ्याला आपलें डोकें गमवावें लागायचें !

अहो, हिंदु लोक सहनशील झाले म्हणून काय झालें ? सहनशीलतेला मर्यादा असतेच कीं नाहीं ? शेवटीं साष्टीशेजारीं मालाडचे सरदेसाई अंताजी रघुनाथ अन् अणजूरचे गंगाजी नाईक या दोघांनीं संतापून जाऊन ठरवलें कीं, 'काय होईल तें होवो ! आतां हा जुलूम सहन करायचा नाहीं !'

अन् मग ते दोघेजण धांवले ! कुठें ? दुसरें कुठें ? पुण्याला ! तिथें सगळ्या हिंदुस्थानांतल्या हिंदूंना ज्याचा आधार वाटायचा, तो बाजीराव पेशवा होता, त्याच्याकडे. बाजीरावाला या दोघांनीं ही सगळी हकीगत सांगितली. पोर्तुगीज करीत असलेला छळ सांगितला. साष्टींतल्या देवळांची पोर्तुगिजांनीं केलेली दुर्दशा सांगितली. तिथल्या आयाबहिणींची फजिती सांगितली. हिंदु धर्माचे चाललेले हाल सांगितले.

बाजीरावानें तें सगळें ऐकलें. त्याचे डोळे झाले इंगळासारखे लालभडक. त्याच्या मुठी वळल्या. त्याचे दांत त्याच्या ओठांत जाऊन रुतून बसले. मग ते म्हणाले, " कुणाच्या आश्रयानें हे फिरंगी एवढे धीट झाले ? त्यांना काय हिंदुस्थान पोरका वाटला काय ? कुणीहि येऊन इथें हैदोसधुळा घालावा ? "

अन् मग त्यांनीं सगळ्या सरदारांना साद घातली. लक्ष्मणासारखा भाऊ चिमाजीअप्पा बोलावला, होळकर बोलावले, शिंदे बोलावले. अन् त्यांना म्हणाले, " बोला, काय करूं शकतां तें ! "

चिमाजीअप्पा म्हणजे दुसरा ! भरत बाजीरावांवर त्याचें भारी प्रेम. बाजीराव बोलावेत आणि चिमाजीअप्पा हलावेत. तर ते चिमाजीअप्पा

म्हणाले, "वसई-वसई म्हणजे काय गोष्ट? फिरंग्यांचा काय पाड हिंदूंसमोर ! आपली आज्ञा होऊं द्या, अन् मग पहातों काय तें !" सगळ्या सरदारांनीं माना डोलविल्या.

तरी पण कांहीं दिवस दुसऱ्या कामामुळें कांहींहि काम जमलें नाहीं. अणजूरकरानें खूप प्रयत्न केले. वारंवार बाजीरावांना भेटायचा तो. कांहीं दिवस किरकोळ सरदार पाठवून काम चालविलें. पण फिरंग्याला पाण्याचा आसरा. त्यामुळें तो कांहीं हार खाईना.

अन् मग शेवटीं चिमाजीअप्पानें विचार केला कीं, हें काम आपण स्वतः गेल्याशिवाय कांहीं जमायचें नाहीं. म्हणून मग सगळ्या सरदारांना, शिंद्यांना, होळकरांना, राणब्यांना, पुढें चालवून मागून कांहीं दिवसांनीं हा 'लक्ष्मण' जाऊन पोहोंचला वसईजवळ. एवढे मोठमोठाले सरदार गेल्यावर मग काय? चुटकीसरसें ठाणें घेतलें, साष्टी घेतली, माहीम घेतलें. तारापूरचा किल्ला मोठा बांका, पण तिथूनहि फिरंगी पळवून लावला, अन् भगवें निशाण फडकवलें त्यावर.

मग शेवटीं हे सगळे एकाहून एक शूर सरदार वसईच्या शेजारीं ठाण मांडून बसले. वसई किल्ला मोठा बांका. समुद्राचा शेजार. अन् त्यांत फिरंग्यासारखा लढवय्या. पण मराठेहि कांहीं कमी नव्हते. त्यांनीं हळूहळू फिरंग्याचें नरडें आवळायला केली सुरुवात.

बुरुजाच्या भोकांतून फिरंगी सारखा गोळीबार करायचा. कधीं गरनाळांचा मारा, तर कधीं दारूनें भरलेलीं अन् पेटविलेलीं मडकीं, कधीं तापलेलें कडकडीत माशाचें तेल, अशी फिरंग्याकडून सारखी आग बरसत असायची.

पण मराठेहि ती सगळी आग पिऊन मोर्चेबंदी करीत पुढें चालले. जमिनीकडून ते चिटपांखरूं फिरकूं देईनात वसईकडे. असा बंदोबस्त केला त्यांनीं कीं, धान्याचा कीं मिठाचा एक दाणा मिळेना फिरंग्याला.

मात्र समुद्राकडून फिरंगी दाणागोटा भरायचा किल्ल्यांत. तिकडून त्याला गोळाबारूद मिळायची. अन् म्हणून एवढा गळा आंवळूनहि तो कांहीं हार खातां दिसेना! सगळे सरदारहि मग इरेस पेटले. 'काय होईल तें होईल, पण वसई घ्यायचीच!'

शेवटीं वरच्या आगीचा मारा सहन करून अन् खालची पाण्याची थाप तशीच गिळून किल्ल्याला सुरुंग लावून बुरूज उडवून द्यायचें ठरविलें मराठ्यांनीं. केला हाकारा सैन्यांत. "कोण पाडतो सुरुंग? कोण आहे एवढा शर्थीचा वीर?"

भराभर माणसें पुढें झालीं. चिमाजीअप्पा प्रसन्न होऊन म्हणाले, "शाबास र पठ्ठ्यांनो! भरा यांच्या ढाली रुपयांनीं!" निघाले ते वीर पहारी घेऊन. लागले सुरुंगाचें भोक खणायला. वरून सुरू झाला गोळीबार. होईना का! एक मेला, त्याच्या छातीवर पाय देऊन दुसरा खणतोय्. दुसऱ्यामागून तिसरा. तिसऱ्यामागून चौथा. स्वराज्याची अब्रू इरेला पडली, मग दावाचौवांच्या जिवांची काय किंमत!

शेवटीं एवढा सगळा वरचा मार सोसून सुरुंग खणून अन् ठासून झाले तयार. मराठ्यांच्या उत्साहाला नुसता बहर आला. सगळे चालून जायला तयार झाले. प्रथम राणत्रांकडील सुरुंग उडवायचे ठरले. सुरुंगवाले बत्ती घेऊन तयार झाले. नगाऱ्यावर टिपरू पडलें, अन् सुरुंग पेटविले त्यांनीं.

धुडुम् धडाम्! धुडुम् धडाम्!

चार सुरुंग उडाले. बुरुजाला लहानसें खिंडार पडलें. मराठ्यांना झाली लढायची घाई. 'हर हर महादेव'च्या आरोळ्या ठोकीत अन् तरवारी परजीत ते मर्द चालले बुरुजाच्या खिंडाराकडे. जाऊन पोहोंचलें खिंडारांत. तोंच—एक सुरुंग उडायचा राहिला होता, तो उडाला! अपरंपार दगडांच नुसता पाऊस पडला. शेकडों माणसें जाया झालीं. कित्येक तर त्या दगडांबरोबर आकाशांत उडालीं. नुसता आकान्त माजला. अन् तेवढ्यांत

किल्ल्यांतून फिरंग्यांनीं ‘ दुक्के, गरनाळा, दारूचीं मडकीं, बरखंदाजी, रंजगिरी, येणेंप्रमाणें अतिशय मार दिला ! ’

नाइलाजानें मराठ्यांना परतावें लागलें ! सगळे निराश होऊन गोळा झाले अप्पांच्या तंबूंत. सगळ्यांच्याच मुद्रा खिन्न. एक सरदार म्हणाला, “ फार माणसें जाया झालीं ! वसई फत्ते होईलसें दिसत नाहीं ! ”

“ कां दिसत नाहीं ? ” अप्पांनीं चिडून विचारलें.

“ फिरंग्याचा मारा जबर ! माणसें त्या बाजूला तोंडच घेत नाहींत ! ”

“ फिरंग्याचा मारा जबर, म्हणून तोंड घेत नाहींत माणसें ? ” अप्पा क्षुब्ध होऊन बोलूं लागले. “ न घेऊं द्यात. माणसें पहिले दिवस विसरलीं. जेव्हां अवरंगजेबाचें सैन्य लाखालाखांनीं वावरत होतें या प्रांतांत तेव्हां ज्या मूठभरच माणसांनीं कर्तव्य करायचेंच म्हणून शर्थीची झुंज देऊन अवरंगजेबाला खड्डे चारले, तींच माणसें आज फिरंग्या-पेक्षां किती तरी अधिक, तरी पण कच्च खातात ? फिरंग्याचा मारा जबर म्हणतात ? ठीक आहे. जा सगळे परत ! मला येतां यायचें नाहीं तुमच्याबरोबर ! मीं दादांना कबूल केलें आहे, वसई घेईन म्हणून. मला माझें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. ”

चिमाजीअप्पा उठले. चिडलेल्या बिथरल्या वाघासारखे फेऱ्या घालूं लागले ते. सगळीं माणसें गप्प ! कोणी चकार शब्द बोलेना. फेऱ्या घालतां घालतां अप्पा सरदारांसमोर थांबले, अन् होळकरांना म्हणाले, “ मल्हारबा, एक काम कराल ? ”

“ काय अप्पा ? ”

“ उद्यां सकाळीं एक तोफ लावायची किल्ल्यावर. गोळा नीट किल्ल्यांत पडला पाहिजे. अन् मग –

“ मग मी तोफेसमोर उभा राहीन ! बरोबर समोर ! अन् तुम्हीं आपल्या हातांनीं तोफेला बत्ती द्यायची. माझें मुंडकें नीट किल्ल्यांत

पडेल, अशा वेतानें ! अन् परत जाऊन दादांना निरोप सांगायचा कीं, फिरंग्याचा मारा फार जबर, म्हणून आम्ही सगळे परत आलों. तुमचा अप्पा आला नाहीं. त्यानें तुम्हांला कबूल केलें होतें, वसई फत्ते करीन म्हणून; तो नाहीं तर त्याचें मुंडकेंच गेलें किल्ल्यांत ! फिरंग्याच्या पोरांनीं तें उचलून चेंडूसारखें लाथांनीं उडवीत किल्ल्याबाहेर फेंकून दिलें ! अन् कोल्हयाकुत्र्यांनीं तें खाऊन टाकलें ! मग –"

"थांबा अप्पा ! थांबा ! आतां हा मारा नाहीं होत सहन ! फिरंग्याच्या गोळीची जखम आज ना उद्यां बरी होईल, पण ही जखम नाहीं बरी व्हायची ! आतां उद्यां पहाच तुम्ही मजा ! माझ्या पायाला झालें आहे करट. मी तर चालूं शकत नाहीं. पण माझ्या गड्यांची कर्तबगारी पहा उद्यां !" होळकर ताव खाऊन म्हणाले.

"अन् आम्ही काय मागें राहूं ?" शिंदे बोलले. सगळ्या सरदारांना स्फुरण चढलें. सगळे तसेंच म्हणूं लागले. झालें, मग काय ? परत माणसांची निवड केली. दोन सुरुंग अजून उडायचे राहिले होते, ते उडवायचें ठरलें. अन् वाटेल तें झालें तरी उद्यां किल्ला ठेवायचा नाहीं, अशा आणाभाका झाल्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या दोन सुरुंगांना बत्ती दिली. निम्मा बुरूज उडाला ! मराठ्यांना असा कांहीं आनंद झाला म्हणून सांगूं ! जीविताकडे लक्ष न देतां चालोन गेले. मेला तो मेला, जळाला तो जळाला, त्याजवर दृष्टि न देतां ज्या जागीं गेले, तेथेंच कायम राहून फिरंगी झोडपून काढला !

शेवटीं फिरंग्यांनीं पांढरा बावटा दाखविला ! "हर हर महादेव" या गर्जनांनीं आकाश कसें अगदीं दुमदुमून गेलें !

बरें का मित्रांनो, हा विजय अप्पांच्या कर्तव्यनिष्ठेचा !

♣ ♣ ♣

# या वस्तूला शिवायचें नाहीं !

माझ्या बालमित्रांनो !

पर्वत पाहिला आहे तुम्हीं एखादा ? असेल तुमच्या गांवाजवळ एखादा डोंगर किंवा लहानशी टेकडी, तीच कां होईना ! आपल्याला तीहि चालेल.

तर मी असें म्हणत होतों कीं, पर्वत म्हणा कीं डोंगर म्हणा, कीं टेकडी म्हणा, एक गुण मोठा चांगला असतो त्यांच्याजवळ. ती तुमची टेकडी उन्हानें खूप तापली, अन् मग चांगले पाण्यानें भरलेले ढग आले तिच्याजवळ, तर उठून चालली धांवत त्या ढगांचें स्वागत करायला, असें तुम्हीं कधीं पाहिलें आहे ?

तुम्ही होः होः हंसत म्हणाल, " वाः ! टेकडी कुठें पळत्ये वाटतें ? "

मलाहि तेंच म्हणायचें आहे. टेकडी पळत नाहींच, उलट अंगावर सांडलेलें पाणीहि जवळ ठेवीत नाहीं, झुगारून देते.

या टेकडीसारख्या स्वभावाचीं असतात कांहीं माणसें. त्यांचा पवित्रपणा, त्यांचें शील, त्यांचें चारित्र्य बिघडवून टाकील, अशी कोणतीहि गोष्ट येईना का त्यांच्याकडे, झुगारून देतील तीं; बघणारहि नाहींत तिच्याकडे.

आणि याच्यांतच पुरुषार्थ आहे. अंगावर आली त्या गोष्टीकडे चालले लाळ घोटीत, त्यांना माणसें का म्हणायचें ?

आपले रामराय, सीतामाई अन् लक्ष्मण हीं तिघें कैकेयीच्या इच्छेप्रमाणें निघालीं वनांत. सीतामाई हट्ट धरून बसली. ती म्हणाली,

"रामा, काय वाटेल तें करा, पण मला घेऊन चला तुमच्याबरोबर. पाण्यांतून काढलेली मासळी कशी जगूं शकेल ? तुमच्यावांचून मी जिवंत कशी राहूं शकेन ? "

राम तिला बरोबर न्यायला कबूल झाले. पण लक्ष्मण ?

तो त्याच्या दादांना वनांत संकटांत पाठवून आपण मजेंत राजधानींत कसा राहूं शकेल ? 'दादा वनांत चालले, थोरली वहिनी त्यांच्यामागें निघाली ! वाटेंत किती अडचणी असतील ! किती यातना असतील! ऊंहूं! मी त्यांना एकटें नाहीं जाऊं द्यायचा. मी राहीन त्यांच्याबरोबर. त्यांच्या अडचणी मी सोशीन. अन् वनांतली रम्यता त्यांच्याकरितां ठेवीन.'



पण ऊर्मिला ? लक्ष्मणाची पत्नी. तिचेंहि तर नुकतेंच लग्न झालें होतें ! तिच्या किती तरी आशा असतील, किती आकांक्षा असतील !

लक्ष्मण विचार करतोय्, ' उर्मिलेला नेऊं का मी बरोबर ? ऊंहूं ! तिला बरोबर नेलें, तर मग दादांची सेवा करायला वेळ उरणार नाहीं मजजवळ. तिला इथेंच राहूं दे ! '

लक्ष्मण एकटाच रामाबरोबर निघाला. उर्मिलेच्या डोळ्यांतून आंसवांची नदी वाहूं लागली. पण तिनें विचार केला, ' हे जाताहेत भाऊजींबरोबर त्यांची सेवा करायला. जाऊं देत. मी त्यांच्या मार्गांतली धोंड होणार नाहीं ! इथेंच राहून मी त्यांची चिंता करीत बसेन. ते आपलें कर्तव्य करायला जाताहेत, जाऊं देत. माझ्यापेक्षां रामांची किंमत किती तरी अधिक आहे. '

निघाले रामराय वनांत. त्यांच्यामागें सीतामाई. अन् बरोबर बंधुराज लक्ष्मण. जिथें जिथें रामांचा मुक्काम व्हायचा, तिथें तिथें लक्ष्मणानें एखाद्या झाडाखालीं त्या दोघांच्याकरितां जागा स्वच्छ करायची. लांकडें आणायचीं. फळेंमुळें आणायचीं. केळीचीं नाहीं तर वडाचीं पानें आणायचीं.

राम त्या झाडाखालीं बसले कीं, लक्ष्मणानें त्या दोघांना पाय धुण्याकरितां द्रोणांत पाणी द्यायचें. मग सीतामाईनें वाढलें म्हणजे रामाचें जेवण व्हायचें. त्या दोघांचें झालें, म्हणजे उरलीं-सुरलीं फळें लक्ष्मणानें खायचीं.



अन् मग गवत गोळा करून त्या दोघांकरितां दोन अंथरुणें करून द्यायचीं.

रात्रीं रामराय व सीतामाई झोंपलीं, म्हणजे लक्ष्मणानें आणलेलीं लांकडें पेटवायचीं, आणि रात्रभर त्या दोघांचें रक्षण करीत असायचें. सकाळीं तीं दोघें उठलीं कीं पुनः चालूं लागायचें.

रस्त्यानें चालतांना पुढें राम चालायचे. त्यांच्यामागें सीतामाई, अन् पंधरा पावलांवर लक्ष्मण. वाटेंत कुठें कांहीं अडचण आली, कुठें लांकूड आडवें आलें, कुठें एखादा साप आला, कुठें एखादा मोठा दगड रस्त्यांत असला कीं, तेवढ्यापुरता लक्ष्मण पुढें व्हायचा अन् रामांना ती अडचण दूर करण्यांत साहाय्य करायचा. तेवढें काम झालें कीं परत तो आपल्या जागेवर जाऊन चालूं लागायचा !

निष्ठावान् लक्ष्मण ! त्याची तपश्चर्या चालू होती.

एखादे वेळीं वाटेंत कुठें झाडाखालीं विश्रांतीकरितां रामराय अन् सीतामाई बसलीं कीं, लक्ष्मणानें आपलें मर्यादेनें दूर बसावें. राम म्हणायचे,

" लक्ष्मणा, असा इकडे येऊन बस कीं रे ! "

" नको दादा ! बरा आहें इकडेच. इथें चांगली छान सांवली आहे. " लक्ष्मणानें म्हणावें.

सीतामाईनें थट्टा करीत म्हणावें, " भावोजी, छान सांवलींत तुम्ही बसलांय्, अन् आम्ही उन्हांत बसूं होय ? रामा, चला आपणहि त्या छान सांवलींत जाऊन बसूं ! "

राम आणि सीता पोटभर हंसायचीं.

लक्ष्मणाचें हें मर्यादशील वागणें पाहून सीतामाईनें एखादे दिवशीं विनोद करावा,

" बरें का रामा, एक माणूस आहे आपल्याबरोबर. चांगलें शूर, वीर, धैर्यशाली. पण नुकतेंच लग्न झाल्यावर मी सुद्धां जितकी लाजल्यें नव्हत्यें इतकें तें माणूस मला लाजतें; बरें का ! आज इतके दिवस झाले,

पण माझें तोंड कसें आहे, नाक कसें आहे, डोळे कसे आहेत, कांहीं कांहीं माहीत नाहीं हो त्या माणसाला ! "

लक्ष्मणानें हें ऐकून अधिकच लाजून मान खालीं घालावी ! खरोखरीच चौदा वर्षांत लक्ष्मणानें सीता-रामांच्या बरोबर राहूनहि सीतामाईच्या त्या सुंदर मुद्रेकडे न्याहाळून पाहिलें नाहीं ! कारण ती त्याची थोरली वहिनी होती, त्याच्या मातेच्या ठिकाणीं होती !

पुढें तीं तिघें दंडकारण्यांतल्या पंचवटींत जाऊन पोहोंचलीं. भारी आवडली ती जागा त्यांना. लहानशी गोदामाई झुळझुळ वाहत्येय्. अन् तिच्या कांठीं हिरवीगार झाडी. पलीकडच्या बाजूला छोट्या छोट्या टेकड्या. चहूंकडे प्रसन्नता. रामांनीं तिथेंच रहायचें ठरविलें.

तिथें रामांनीं आणि लक्ष्मणानें, दोघांनीं मिळून एक झोंपडी बांधली. छानदार झोंपडी. सीतामाईनें त्या झोंपडीच्या बाहेर सुंदर फुल-झाडें लावलीं. ती रोज त्यांना पाणी घालायची गोदावरीचें. लक्ष्मणानें रोज वनांत जाऊन नाना प्रकारचीं फळें अन् कंद आणावेत. कधीं आणावीं कवठें, कधीं बेलफळें, कधीं बोरें, कधीं रामफळें, कधीं सीताफळें.

दिवस मोठ्या मजेंत जायचा. राम त्या दोघांना नाना तऱ्हेच्या गोष्टी सांगून रिझवायचे. सीतामाई गाणीं म्हणायची. संध्याकाळीं फराळ झाला कीं, हीं दोघें झोंपायचीं गोष्टी बोलत बोलत. झोंपडीच्या बाहेर पांच-दहा पावलांवर असलेल्या झाडाखालीं लक्ष्मणानें आपल्याकरितां एक ओटा तयार केला होता. त्यावर रचली होती एक धुनी. रात्र झाली कीं, लक्ष्मण ती धुनी पेटवायचा आणि धनुष्यबाण घेऊन तिथें राखण करीत बसायचा.

एके दिवशीं पौर्णिमा होती मार्गशीर्षी. रात्र झाली. राम आणि सीता झोंपलीं. लक्ष्मण आपल्या जाग्यावर येऊन बसला. पलीकडून गोदामाईचें पाणी खुळखुळ आवाज करीत वहात होतें सीतामाईनें

लावलेल्या फुलझाडांच्या फुलांचा सुगंध चहूंकडे पसरला होता, अन् पांढरेंफेक चांदणें पडलें होतें. चहूंकडे कसें शांत होतें. त्या शांत सुंदर वातावरणांत तपस्वी लक्ष्मण आपलें धनुष्य सांवरून आपल्या धुनीजवळ राखण करीत बसला होता. त्याच्या डोक्यांत विचार घोळत होते. ' आई बरी असेल ना ? उर्मिला बरी असेल ना ? मी तिला एकटीला सोडून आलों ! असूं दे, ती सहनशील आहे. अन् चौदा वर्षे म्हणजे कांहीं फार मोठा काळ नव्हे. आत्तां संपतील चौदा वर्षे. '

विचार करतां करतां रात्र संपायला आली. तोंच कुणीकडून कोण जाणे, एक अक्राळ-विक्राळ राक्षसी त्या ठिकाणीं येऊन उभी राहिली. भले बटबटीत डोळे, अधोलीएवढाल्या नाकपुड्या, सुपाएवढालीं नखें, तिचें नांवहि शूर्पणखा ! लक्ष्मणाला पहातांबरोबर तिच्या तोंडाला सुटलें पाणी. तिनें विचार केला, ' बरा कोंवळा तरुण दिसतो आहे लुसलुशीत. खाऊन टाकावा झालें. खूप चांगला लागेल रुचकर. '

अन् मग ती पाय न वाजवतां गुपचुप पाठीमागून लक्ष्मणाच्या जवळ आली. शेकोटीच्या जाळाजवळ येतांच लक्ष्मणाचें तें सुंदर शरीर पाहिलेंन् तिनें, तशी तिचा विचार बदलला. ती गुप्त होऊन लक्ष्मणाला जवळ जाऊन पाहूं लागली. लक्ष्मणाची ती सुंदर तेजस्वी मुद्रा पाहून तर ती त्याच्यावर खूषच झाली !

तिचा पति विद्युज्जिव्ह हा मागेंच वारला होता. लक्ष्मणाला पाहून तिला वाटलें, ' यानें माझ्याशीं लग्न केलेंन् तर ? काय मजा होईल ! पण हा माझें असलें रूप पाहून भेदरूनच जायचा ! तेव्हां चांगलें सुंदर रूप धारण करावें. '

मग तिनें चांगलें छान मायावी रूप धारण केलें. चांगले छानदार डोळे, नाक, गोरी गोरी पान, चांगले छानदार कपडे असा वेश करून

पायांतले पैंजण छुमछुम वाजवीत लाजत मुरडत ती लक्ष्मणासमोर येऊन उभी राहिली.

लक्ष्मणानें प्रथम तिला पाहिलें, तो त्याला आश्चर्यच वाटलें. ‘ कुठून आली ही ? एवढ्या अरण्यांत अन् एवढ्या रात्रीं ही अचानक कुठून येऊन उभी राहिली ? ’

“ कोण तुम्ही ! कुठून आलांत ? ” लक्ष्मणानें विचारलें.

“ अशींच आल्यें हिंडत हिंडत. माझें नांव शूर्पणखा. तुमचें नांव काय ? ” शूर्पणखा लाजत मुरडत म्हणाली.

“ माझें नांव लक्ष्मण. अयोध्याधीश दशरथांचा मुलगा मी. पण तुम्हीं एकट्या कशा आलांत इथें एवढ्या रात्रीं ? भीति नाहीं वाटली तुम्हांला ? ”

“ भीति कशाची ? आमच्या जातीला नाहीं भीति वाटत. अन् तुम्ही जवळ असल्यावर कशाची भीति ? ” असें म्हणत शूर्पणखा लक्ष्मणाच्या अंगाशीं खेटायला लागली.

“ हं हं ! ” लक्ष्मण दूर सरत म्हणाला, “ तिकडेच थांबा. मला चांगलें स्वच्छ ऐकूं येतंय् ! ”

“ असें काय करतां हो ! तुम्ही किनई भारी चांगले अहांत. मला फार आवडतां तुम्ही ! ”

“ अहो, पण कोणतीहि वस्तु पाहिल्याबरोबर आवडूं लागणें, हें कांहीं फारसें बरें नव्हे ! अन् मी तुम्हांला आवडलों, चांगला वाटलों, हें तुमचें झालें. पण माझा कांहीं विचारच केला नाहींत तुम्ही. मला विचारलेंहि नाहींत ! ”

“ हो ! तें विसरल्येंच मी. ” असें म्हणून शूर्पणखा लक्ष्मणाच्या समोर जाऊन उभी राहिली, अन् त्याला म्हणाली, “ पहा ! कशी छान आहें मी. आहें ना चांगली ? आवडल्यें ना तुम्हांला ? ”

लक्ष्मणानें तिच्याकडे पाहिलेंन्. रात्रींची शांत वेळ. पंचवटीसारखी एकान्ताची जागा. तरुण लक्ष्मण आणि तरुण स्वरूपांत समोर आलेली शूर्पणखा.

पण मित्रांनो, लक्ष्मणानें ओळखलेंन् कीं, हें आपलें नव्हे. 'ही वस्तु माझ्या चारित्र्याला, माझ्या शीलाला काळोखी फांशील, माझी ही एवढी तपश्चर्या धुळीला मिळवील ही. हिला थारा देतां उपयोगाचा नाहीं.' त्याच्या मनांत वज्रासारखा निश्चय झाला!

मग तो मागें सरत म्हणाला, "ओहो! भारी सुंदर आहांत हो तुम्ही! अगदीं जगदंबामातेसारख्या! पण तुम्ही कुणाच्या कोण तें नाहीं सांगितलेंत?"

खूष होऊन अधिकच लाजत शूर्पणखा म्हणाली, "मी अशीच आपली आहें एक वनदेवता. मग आवडल्यें ना मी तुम्हांला? पसंत पडल्यें ना? मग आतां लग्न करूं या ना आपण!"

लक्ष्मणानें हें ताडलेंच होतें. तो हंसत हंसत म्हणाला, "वा वा! सगळ्या सुंदर गोष्टींशीं लग्न करायचें असतें वाटतें! एखादा मोती पाणीदार असला, तर त्याची काय छानदार भाजी करून खायची वाटतें? एखादे वेळीं संध्याकाळीं आकाशाचा रंग अगदीं छानदार केशरी दिसला, तर लगेच कुदळ अन् टोपली घेऊन तो खोदून घरीं घेऊन यायला जायचें वाटतें?"

"हें हो काय म्हणतां भलतेंच! पण किती गोड आवाज आहे हो तुमचा? असें काय करतां? हो म्हणा ना?"

"अहो पण मातुश्री! माझें एक लग्न झालें आहे."

"होईना का! त्यांत काय बिघडलें?"

एवढ्यांत पहांट होऊन तांबडें फुटलें, अन् झोंपडीचा दरवाजा उघडून रामराय बाहेर आले. बाहेर पहातात तों लक्ष्मण मागें मागें सरत

असलेला, अन् शूर्पणखा त्याच्याशीं लगट करीत असलेली ! रामांना हें पाहून हंसूंच लोटलें. ते पुढें येत म्हणाले,

" काय लक्ष्मणा, काय भानगड आहे ? "

रामांचा आवाज ऐकून शूर्पणखा त्यांच्याकडे पाहूं लागली, आणि त्यांना म्हणाली, " अगबाई ! तुम्ही यांचे भाऊ वाटतें ! अहो तुम्ही सांगा ना यांना ! "

" काय सांगूं ? "

" माझ्याशीं लग्न करायला ! हे आवडले आहेत मला. "

तोंच सीतामाईहि बाहेर आली. तिनें हा सगळा संवाद ऐकला होता. ती हंसत हंसत म्हणाली, " कां हो भाऊजी, लाजतायसे ? अहो, हो म्हणा ना ! चांगली छान जाऊ मिळेल मला ! "

शूर्पणखा सीतेकडे पहात म्हणाली, " तूं कोण ? यांची बायको वाटतें ? वाः ! चांगला छान आहे हो जोडा ! हे थोरले भाऊहि छान आहेत. हेहि आवडले मला. "

लक्ष्मणाला आतां थोडीशी थट्टा करावीशी वाटली. तो म्हणाला, " हां ! ते आवडले ना ? त्यांच्याशींच करा आईसाहेब तुम्ही लग्न ! "

सीतामाई हंसत म्हणाली, " मला चालेल असली छान सवत. आम्ही दोघी मिळून पाणी घालीत जाऊं या फुलझाडांना ! "

शूर्पणखा रामाकडे येत म्हणाली, " हो हो ! तुम्हींच करा माझ्याशीं लग्न ! "

राम थट्टा करीत म्हणाले, " अहो ताईसाहेब, ही एकच बायको मला पुरेशी झाली आहे. आणखी दुसरी कशाला ? तुम्ही असेंच करा, हा माझा धाकटा भाऊ, चांगला कुलशीलवान्, दिसायला चांगला, अन् तुम्हांला साजेसा आहे, याच्याशींच होऊन जाऊं दे तुमचें लग्न !

**अनुजस्त्वेष मे भ्राता शीलवान् प्रियदर्शकः ।**
**अनुरूपश्च ते भर्ता रूपस्यास्य भविष्यति ॥**
**एनं भज विशालाक्षि भर्तारं भ्रातरं मम –**

चांगली सकाळची वेळ आहे. मी अन् सीता दोघेजण धरूं अंतरपाट – चला होऊन जाऊं द्या लग्नाचा थाट ! ”

लक्ष्मणानेंहि ही थट्टा ओळखली. त्याला वाटलें, आपणहि थोडी मजा करावी. तो म्हणतो कसा,

“ अहो बाई, तुम्हांला माहीत आहे का ? यांनीं मला आपला सेवक म्हणून बरोबर आणलें आहे. पाहिलेंत नाहीं ? आपण दोघे मारे झोंपलीं होतीं झोंपडींत, अन् मला बाहेर थंडींत कुडकुडत पहारा करीत बसविलें होतें ! ”

“ हो ! हेंहि खरें आहे बरें का ! ” शूर्पणखेला लक्ष्मणाचें म्हणणें पटलें.

“ मग आतां बोला बघूं ? माझी दासाची पत्नी बनून तुम्ही दासी होणार कीं धन्याची पत्नी बनून धनीण होणार ? ”

**कथं दासस्य मे दासी भार्या भवितुमर्हसि ।**

शूर्पणखा रामाकडे जाऊन त्याला म्हणाली, “ खरें सांगतात बरें तुमचे धाकटे भाऊ ! ”

राम म्हणाले, “ अहो, पण ही माझी पहिली बायको आहे इथें. ”

“ असे ना का ! ”

“ आमच्यांत दोन बायका करायची पद्धत नाहीं. ”

मग मात्र शूर्पणखेचे डोळे चमकूं लागले. ती जिभल्या चाटीत म्हणाली,

“ हात्तिच्या ! या बायकोचीच अडचण आहे ना तुम्हांला ! मी आत्तां खाऊन टाकत्यें तिला ! मग तर झालें कीं नाहीं ! ”

हे शब्द ऐकतांक्षणीं राम आणि लक्ष्मण, दोघेहि चरकले. त्यांनीं ओळखलें कीं, ही बया दिसायला जरी कितीहि चांगली दिसत असली, तरी हें तिचें कांहीं खरें रूप नव्हे ! खरें रूप वेगळेंच असलें पाहिजे हिचें. त्यांनीं एकमेकांना डोळ्यांनीं खुणवलें. लक्ष्मणानें धुनीजवळ ठेवलेलें आपलें खड्ग हळूच उचलून घेतलें. मग तो हंसत हंसत शूर्पणखेला म्हणाला,

“ अहो अहो ! त्यांना खायच्या भानगडींत नका पडूं तुम्ही. इकडे या मजकडे. मीच लग्न लावतों तुमचें ! ”

मूर्ख शूर्पणखा वळून लक्ष्मणाकडे आली व म्हणाली, “ वा वा ! मी तर हें अगदीं प्रथमपासून म्हणत होत्यें ! ”

ती लक्ष्मणाजवळ पोहोंचली. विजेच्या वेगानें लक्ष्मणानें आपली तरवार उपसली, अन् तिचें नाक आणि कान कापून तिच्या हातांत दिले !

गाढवासारखी ओरडत, आपलें मूळ रूप प्रगट करीत शूर्पणखा पळून गेली !

माझ्या मित्रांनो, रात्रीची वेळ अन् त्या एकान्तांत शूर्पणखा चांगलें सुंदर तरुण रूप धरून लक्ष्मणाजवळ गेलेली –

पण त्यानें आपलें चारित्र्य, आपलें शील मिळूं दिलें नाहीं.

♣ ♣ ♣

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक ३००९
नों. दि.
वाचनालय

# आम्ही विष्णुदास तैसे नव्हों !

माझ्या बालमित्रांनों,

आपल्या देहूच्या तुकारामबुवांची गोष्ट बरें का. तुकारामबुवा भारी विरक्त. घरीं सगळें होतें. गाई होत्या, म्हशी होत्या. शेती होती, मळे होते. दुकान होतें, सावकारी होती. पण बुवांना आपलें विठ्ठलाचें वेड ! आईबापांनीं बुवांचीं दोन लग्नें करून दिलीं होतीं. पण बुवांचें लक्ष कांहीं प्रपंचांत नाहीं. एक वीणा अन टाळ उचलायचे, कीं आपले देवळांत जाऊन बसायचे.

तिथें नाना प्रकारें देवाला आळवायचे ते. कधीं म्हणायचे, " देवा, मला कसा भेटशील तूं ? भेटशील का कधीं ? होईल का तुझें दर्शन ? पडशील का माझ्या दृष्टीला ? येईल का तुला माझी दया ?

" ये ना रे देवा ! किती दिवस झाले बघ ! रोज तुझी वाट पहातोंय् मी. असें वाटतें कीं देव आतां येईल, पण तूं अजून कां येत नाहींस ? तुला दया येत नाहीं का माझी ? "

**अझुनी कां तुज येईना माझी दया ।**
**काय देवराया पहातोसी ॥**

कधीं निराश होऊन म्हणायचे, " नाहीं येत ना तूं ? नाहींच यायचास. मी काय पुण्य केलंय् असें ? काय उपकार केले आहेत कोणावर ? कोण्या गरिबाला मदत केली आहे ? काय अशी मोठी भक्ति केली आहे तुझी ? मी कां तुझ्या भेटीची इच्छा करावी ?

**काय पुण्य ऐसें आहे मजपासीं ।**
**तांतडी धांवसी पांडुरंगा ॥**

कधीं देवाला 'आई' म्हणून आळवायचे ते. म्हणायचे, "आई, ये ना ग ! कशी तळमळ चालली आहे बघ जिवाची ! पाण्यांतून मासा काढून वाळवंटांत टाकून द्यावा. अन् मग तो जसा तळमळ तळमळ करतो, तसें झालें आहे ग मला तुझ्यावांचून !"

**जीवनावेगळा तळमळी मासा ।**
**प्रकार हा तैसा होतो जीवा ॥**



ये ! आई ! तुझा विरह नाहीं सहन होत ! अगदीं अधीर झालों आहें मी. आतां उशीर सहन होईनासा झाला आहे बघ मला !"

**येई वो येई वो येई वो धांवोनिया।**
**विलंब कां वांया लावियेला कृपाळे॥**

हळूहळू बुवांची कीर्ति पसरत चालली. सगळया मावळ प्रांतातले लोक ओळखूं लागले बुवांना. कुठेंहि बुवांचें कीर्तन आहे असें ऐकलें त्यांनीं कीं भराभर मुंग्यांसारखे गोळा व्हायचे.

"काय हो, कुठें निघालां बाईबाईनें?" एक विचारायचा दुसऱ्याला.

"वाः! तुम्हांला नाहीं का माहीत?" दुसरा म्हणायचा.

"नाहीं बुवा! कुठें पुण्याला निघाला वाटतें शिवाजी राजांकडे?"

"ऊं हूं! तळेगांवला जातोंय्."

"कशाला ते बुवा?"

"अहो, तिथें कीर्तन आहे ना तुकारामबुवांचें!"

"खरेंच का? स्वतः बुवा येणार आहेत वाटतें?"

"हो ना. स्वतः बुवाच आलेले आहेत तिथें."

"असें का? थांबा तर मग; आमची ही म्हणत होती कितीं दिवसांपासून कीं, बुवांचें कीर्तन ऐकायचें म्हणून. मग आपण सगळेच मिळून जाऊं या."

अन् मग बाया, पोरें, म्हातारे-कोतारे अशी कांहीं गर्दी व्हायची म्हणून सांगूं कीर्तनाला! कारण माहीत आहे का, काय तें? बुवा कोणतीहि गोष्ट स्वतः करायचे अगोदर, मग जगाला सांगायचे. नाहीं तर लोकां सांगे ब्रह्मज्ञान, अन् आपण कोरडा पाषाण! तसें कांहीं नव्हतें बुवांजवळ. अगोदर आचरून दाखवायचें, मग उपदेश करायचा. त्यामुळें सगळा मावळ प्रांत बुवांच्या भजनीं लागला. अगदीं थेट आपले शिवाजी राजेहि कीर्तनांना यायला लागले बुवांच्या!

पण खुद्द देहूंतच कांहीं माणसें अशीं द्वाड होतीं ! त्यांना कांहीं बुवांची ही कीर्ति सहन होईना ! तसेंच असतें मुळीं. सूर्य उगवला, म्हणजे सगळ्यांना बरें वाटतें. पण घुबडाला ? त्याला नाहीं बरें वाटत. दिवसभर मनांतल्या मनांत सूर्याच्या नांवानें बोटें मोडीत बसतें तें. रात्र झाली कीं, मग त्याला मजा वाटते !

कांहीं माणसें होतीं अशीं घुबडासारखीं. कोणी बुवांची स्तुति करायला लागला कीं, यांचें तोंड अगदीं कडूलिंबाचा पाला खाल्ल्यासारखें व्हायचें. कपाळाला अठराशेंसत्तावीस आंठ्या पडायच्या. मनांतल्या मनांत त्याच्यावर जळफळत तीं माणसें उठून जायचीं तिथून.

अन् त्या सगळ्यांचा म्होरक्या होता मंबाजीबुवा. चार कुटाळांना जमवायचा आपल्याभोंवतीं, अन् बुवांची निंदा करीत बसायचा तो.

" काय हो, आज तुक्या भल्या पहांटेच उठून देवळांत किंचाळत बसला होता देवाच्या नांवानें ! तुम्हीं ऐकलेंत कीं नाहीं ? "

" ऐकलें तर काय ? कशी छान झोंप लागत होती पहांटे ! रात्रभर ढेकणांनीं क्षणभर झोंप येऊं दिली नाहीं. जरा कुठें डोळा लागत होता, तों या गोधड्याचें रडगाणें सुरू झालें ! असा संताप आला होता कीं, जाऊन काठीनें चांगला बडवून मोकळा करावा ! लेकाचा त्या दगडाचे पाय धरून बसतो आरडत ओरडत ! आतां थंडी होती, पांघरूण सोडवेना, म्हणून गेलों नाहीं झालें ! "

" पण केव्हां तरी एकदां खोडकी मोडली पाहिजे बरें का त्याची ! फार बंड वाढत चाललें त्याचें ! लोकांना कांहीं कळत नाहीं. जो उठतो तो त्याच्या पायां पडायला धांवतो. जगांतले सगळे साधुसंत खपले का पण ? आपले हे मंबाजीबुवा आहेत. त्यांच्या कां नाहीं पाया पडत ? "

असें सारखें चालू असायचें. देहूला एक चिमी नांवाची गाणारी बाई होती वाईट चालीची. मंबाजीबुवा तिच्या घरीं यायचा. ज्या दिवशीं

तुकारामबुवांच्या कीर्तनाला शिवाजीराजे आले, त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं हातपाय आपटीत अन् मुठी वळीत मंबाजीबुवा चिमीच्या घरीं जाऊन पोहोंचला. चिमी बसली होती पान खात.

"कां हो बुवा ?" चिमी म्हणाली, "रागवायाला काय झालें असें आज ?"

"धाड पडली ! पाणी दे थंड प्यायला !" मंबाजीबुवा लोडाजवळ धसकन् बसत म्हणाला, "सगळे लेकांचे मूर्ख आहेत ! राजे काय अन् शिपाई काय !"

"कां ? काय झालें ?" चिमी मंबाजीकरितां पान लावीत म्हणाली.

"व्हायचें काय दगड ? अग, काल शिवाजीराजा आला होता त्या तुक्याच्या कीर्तनाला ! या राजांनीं असा ताळ सोडला कीं, मग बाकीच्यांना काय म्हणायचें ?"

"असें का ? शिवाजीराजे आले होते का ?" चिमी पुढें सरत म्हणाली, "येतील बाई ! कांहीं म्हणा तुम्ही, कीर्तन बरीक तुकाराम चांगलें करतो हो ! गातो चांगला अन् कसा छान गवळणी-बिवळणी म्हणतो काय कीर्तनांत."

"तर तर त्यऽर !" वेडावून दाखवीत मंबाजीबुवा म्हणाला, "आणखी लावण्या नाहीं का म्हणत ? त्याहि म्हणायचा उद्यां ! अन् तूंहि लागलीस का त्याची स्तुति करायला ?"

"रागावूं नका हो बुवा ! मला तरी काय माहिती ? त्या दिवशीं सहज आपली तिकडून निघालें होत्यें, तर तिथें कीर्तन चाललें होतें याचें. म्हटलें, उभें रहावें थोडा वेळ. तुम्हांला नसेल आवडत तर नाहीं जायची आतां."

"नाहीं जायची म्हणजे काय ! नाहींच जायचें ! अग आपणाच जर त्या भोंदूच्या कीर्तनाला अन् गवळणीला भुलून त्याच्यामागें

लागलों तर मग जगाचें कसें व्हायचें? बाराच वाजले म्हणायचे मग सगळ्यांचे!"

"बरें ऽऽ! आतां नाहीं जायची म्हणत्यें ना एकदां! द्या, पान द्या."

मंबाजीबुवानें पान तोंडांत कोंबलेंन् अन् मग म्हणाला, "अशी जिरवली पाहिजे या लेकाची एकदां केव्हां तरी! काय करावें बरें?"

त्या खोलींतल्या खोलींत फेऱ्या घालायला लागला मंबाजीबुवा. मध्येंच थांबायचा. हातवारे करायचा. परत फिरायला लागायचा. मग त्यानें आपली पगडी काढून हातांत घेतली. मग परत पगडी डोक्याला घातली. मग खिडकीजवळ उभा राहिला थोडा वेळ. मग परत फिरायला लागला.

अन् फिरतां फिरतां एकदम थांबून टाळी वाजवून तो म्हणाला, "हात्तिचा! पाहिलेंस मी कसा बावळट आहें तो?"

"कां काय झालें?"

"अग, अगदीं सोपी युक्ति आहे!"

"असें का? काय आहे ती?"

"अगदीं सोपी म्हणजे काय? भारीच सोपी."

"अहो, पण काय ती सांगाल कीं नाहीं?"

"सांगतों. तूं एक काम करायचेंस्."

"काय?"

"तुला माहीत आहे ना, त्या तुक्याला भजन आवडतें?"

"बरें मग?"

"मग कांहीं नाहीं. तो रात्रीं एकटा बसतो देवळांत. तेव्हां सगळे झोंपले, म्हणजे तूं जायचेंस् देवळांत."

"मी?"

"हो तूं! कां भ्यायलीस कीं काय?"

"छे! भित्येंय् कशानें?"

"हां! शाबास! तर मग देवळांत जायचेंस्, अन् छानदार एखादें देवाबिवाचें पद नाहीं तर ज्ञानेश्वराचा अभंग म्हणायला करायची सुरुवात. तुला छान गातां येतें."

"इश्श! मला कसलें गातां येतंय्?" मुरडत लाजत चिमी म्हणाली.

"अशी लाजूंबिजूं नकोस. तर, अभंग म्हणायचा चांगली छानदार चाल लावून. अन् मग तुक्या तुझ्याजवळ येईल अभंग ऐकायला. तो जवळ आला कीं मग तूं त्याच्याशीं लाडीगोडी लावायला करायचीस सुरुवात. आम्ही सगळे लपून बसतों. अन् तो पाघळला कीं मारे काढतों बडवून लेकाला!"

"पण त्याच्याशीं लाडीगोडी लावणें जुळेल का?"

"होऽऽ! न जुळायला काय झालें? मोठे मोठे विश्वामित्रासारखे फशीं पडले, तिथें या तुक्या वाण्याची काय कथा! मग ठरलें ना हें?"

"पहा बाई! मी आपली तुम्हीं सांगितलें तें करीन. पण मग पुढचें काय तें मला माहीत नाहीं!"

"पुढची काळजी नको करूंस तूं!"

झालें. ठरला बेत. मंबाजीबुवानें आपल्या चांडाळचौकडीला सांगितला तो बेत. असा कांहीं आनंद झाला त्यांना! नुसते हुरळले ते सगळे.

त्या दिवशीं रात्रीं नेहमींप्रमाणें तुकारामबुवा विठोबाच्या देवळांत जाऊन बसले देवाला आळवीत. सगळा गांव झोंपला. होळीच्या टेकावर रोज गप्पा मारीत बसणारी मंडळीहि गेली उठून. देवळांत मिणमिण जळणारा एक दिवा, अन् त्याच्या प्रकाशांत बुवा देवाला बोलावीत बसले आहेत.

"ये रे! प्रभो! तुझ्यावांचून जगवेनासें झालें आहे मला! जेवण सुचत नाहीं, खाण सुचत नाहीं, कशाकशांत म्हणून मन लागत नाहींसें झालें आहे!

**येई गा तूं मायबापा पंढरीचे राया।**
**तुजवीण शीण वाटे क्षीण झाली काया॥"**

इकडे चिमी चांगलें छानदार लुगडें नेसली, चांगले दागिने घातले तिनें, काजळ घातलें डोळ्यांत, घागऱ्या घातल्या पायांत, विडा कोंबला तोंडांत, अन् निघाली नटून थटून त्या बिचाऱ्या साध्याभोळ्या देव-माणसाला भुलवायला. मंबाजीबुवाची चांडाळचौकडी देवळांत गरुड-पाराच्या आवतींभोंवतीं टपून बसली दंडेबिंडे घेऊन.

चिमी छुमूछुम् करीत देवळांत येऊन गरुडपारावर बसली. तिचा गळा होता गोड. तिनें चांगल्या छानदार रागांत ज्ञानेश्वरांचा अभंग म्हणायला केली सुरुवात.

**पडिलें दूरदेशीं मज आठवे मानसीं।**
**नको नको हा वियोग कष्ट होताती जिवासी॥**
**दिन तैसी रजनी झाली गे माये।**
**अवस्था लावोनि गेला अझुनि कां न ये॥**
**गरुडवाहना गंभीरा येई गा दातारा।**
**बाप रखुमादेवीवरा श्रीविठ्ठला॥**

रात्रींची शांत वेळ; चिमीचा आवाज देऊळभर पसरला. तो तुकारामबुवांच्या कानांवरहि पडला. त्यांना असा आनंद झाला ! 'कोण बोलावतें आहे माझ्या देवाला ? किती गोड आवाजानें ! वा ! वा !'

बुवांची समाधि लागली ! पार रंगून गेले ते. तिथल्या तिथें बसल्या जागींच डुलायला लागले ते. उठेचनात. चिमी गातां गातां थकली. पण बुवा उठायचें नांव घेईनात. शेवटीं चिमी कंटाळून थांबली. ती थांबतांक्षणीं बुवा भानावर आले. उठले ते जाग्यावरून. निघाले गाणाऱ्याला शोधायला दिवली घेऊन. त्यांना गरुडपारावर कोणी तरी दिसलें.

"कोण तें ?" बुवांनीं विचारलें.

चिमीला वाटलें, आतां जुळलें काम. लाजत मुरडत ती म्हणाली, "मी आहे चिमाबाई!"

बुवा तिच्यासमोर येऊन म्हणाले, "कोण, तुम्ही का अभंग म्हणत होतां? तुम्ही का बोलावीत होतां माझ्या पांडुरंगाला?"

"हो! मीच बोलावीत होत्यें. आवडला का तुम्हांला अभंग?"

"खरेंच किती गोड आहे अभंग तो! अन् तुम्ही म्हणतहि होतां किती छान! 'गरुडवाहना गंभीरा येई गा दातारा!' वा वा! किती गोड आहे ही हांक!"

"चांगली गात होत्यें ना मी?"

"भारी छान! छान आळवीत होतां तुम्ही माझ्या देवाला!"

"मग आवडल्यें ना मी तुम्हांला?"

"माझ्या देवाचा प्रत्येक भक्त आवडतो मला!"

"तुमचें प्रेम बसलें ना माझ्यावर?"

"हो आई! तूंहि या तुझ्या मुलावर प्रेम कर! मला देव भेटेल असा आशीर्वाद दे!"

चिमी गडबडली. तिला कांहीं सुचेचना! ती म्हणाली,

"ऊं हूं! तसें नव्हे!"

"काय नव्हे आई?"

"इश्य बाई! आई काय म्हणतां मला? आई नका म्हणूं. नुसतेंच चिमाबाई म्हणा खरेंच तुम्ही किती चांगले अहांत! भारी आवडतां तुम्ही मला!"

चिमी जाग्यावरून उठली अन् बुवांकडे चालली. बुवा एकेक पाऊल मागें टाकीत चालले. चिमी लाडक्या शब्दांत म्हणाली,

"असें हो काय करतां? थांबा कीं!"

बुवा देवळाच्या दारांत थांबले. अन गंभीर होऊन म्हणाले,

" आई, तूं मला ओळखलें नाहींस. त्या जातीचा नव्हे मी. माझ्या दोन पत्नी आहेत. अन् मग बाकी सगळ्या माझ्या आया आहेत — रुक्मिणीमाता आहेत त्या. भलतें काय बोलत्येस असें? मला किती क्लेश होताहेत? किती खालीं गेलीस तूं आई? भारी वाईट वाटतें मला हें तुझें पतन बघून! आई, जा तूं! आतां इथून पुढें माझ्यासारख्या कुण्या तुझ्या लेकराला फशीं पाडण्याची खटपट करूं नकोस?"

**पराविया नारी रखुमाईसमान।**
**गेलें हें नेमून ठाईंचेंची॥**
**जाई वो तूं माते न करीं सायास।**
**आम्ही विष्णुदास तैसे नव्हों॥**
**न साहवे मज तुझें हें पतन।**
**नको हें वचन दुष्ट वदों॥**

बुवांनीं एक साष्टांग नमस्कार घातला चिमीला, अन् ते देवळाबाहेर निघून चालते झाले! चिमी एवढेंसें तोंड करून उभी राहिली. मंबाजीबुवा अन् चांडाळचौकडी लपलेल्या ठिकाणांतून बाहेर आली. मंबाजीबुवा दांत खात म्हणाला,

" तूं धरलें कां नाहींस त्याला?"

चिमी संतापली मंबाजीबुवावर. ती फणकाऱ्यानें म्हणाली,

" जळ्ळें तुमचें लक्षण! कसल्या देवमाणसाकडे पाठविलेंत मला? केवढी मोठी चूक झाली माझ्या हातून! आतां मुळींच फंदांत पडायची नाहीं मी तुमच्या."

इतकें बोलून चिमी चालती झाली आपल्या घराकडे. मंबाजी आणि मंडळींचीं तोंडें झालीं कोरफड खाल्ल्यासारखीं!

माझ्या मित्रांनों! म्हणून तर तुकारामबुवांचें नांव घेतलें कीं, अजून हात जुळतात सगळ्यांचे.

♣ ♣ ♣

# मला शिकायचें आहे !

माझ्या बालमित्रांनो !

एखादा आंबट मुलगा पाहिलाय् तुम्ही ?

आंबट म्हणजे चवीला नव्हे कैरीसारखा ! आंबट म्हणजे सदा विटलेला. कोणत्याहि गोष्टीची हौस नाहीं. सदान् कदा याचा चेहरा आपला सुतक्यासारखा. शाळेंत अभ्यासाची हौस नाहीं, बाहेर खेळायची हौस नाहीं, कुठें फिरायला जायची हौस नाहीं. नुसता चिखलाचा गोळा जणुं कांहीं ओबडधोबड !

एखादा मुलगा मात्र याच्या अगदीं विरुद्ध. कोणतीहि गोष्ट दिसली कीं ती शिकायची हौस याला. कांहीं का चांगलें पाहीना तो. लगेच त्याला वाटेल, 'हें आपल्याला करतां यावें !'

हें वयच असतें शिकायचें. किती शिकूं अन् किती नको असें झालें पाहिजे माणसाला. कोणी एखादी गोष्ट शिकवायला तयार झाला, तर मग काय ? सोन्याला सुगंधच ! अन् एखादा आपली माहिती सांगायला नाकबूल असला, तर त्याच्या मागें लागून, त्याचीं कामें करून, ती माहिती मिळवतां आली पाहिजे. मग किती का अडचणी येईनात वाटेंत ! जो त्या अडचणींवर मात करून ती माहिती मिळवील, त्याला म्हणावें खरा विद्यार्थी !

झालें काय – पांची पांडव अन् द्रौपदी; केवळ्या सुखांत रहाणारीं माणसें ! पण त्यांच्यावर वेळ आली, तेव्हां वल्कलें म्हणजे झाडाच्या साली नेसून तीं वनांत रहायला लागलीं ! त्यांनीं वनांत बांधली एक

झोंपडी. सूर्यनारायणानें त्यांना दिली होती एक थाळी. ती थाळी रोज रात्रीं घासून पालथी घालायची. सकाळीं उलथी केली कीं तिच्यांतून गरज लागेल तें अन् तेवढें ताजें अन्न बाहेर पडायचें ! अगदीं पुरणपोळ्या, लाडू, जिलेबी सुद्धां ! त्यामुळें जेवायचें काय ही कांहीं काळजी नव्हती त्यांच्यामागें.

एके दिवशीं जेवणेंबिवणें झालीं, अन् पांची पांडव अन् द्रौपदी बसलीं झोंपडीसमोर अंगणांत. धर्मदादा, भीम, नकुल, सहदेव अन् द्रौपदी, हीं पांचजणें बसलीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलत. अर्जुन कांहीं भाग घेईना त्यांच्या गप्पांत ! एवढेंसें चिमणीसारखें तोंड करून तो आपला दूर जाऊन बसला.

नकुलाचें गेलें त्याच्याकडे लक्ष. तर तो धर्माला म्हणाला, "दादा, अरे, अर्जुन पाहिलास का कसा उदासवाणा बसलाय् तो !"

धर्म उठून अर्जुनाजवळ गेला अन् म्हणाला, "काय रे अर्जुना, प्रकृति बरी आहे ना ?"

"हो, बरी आहे कीं !" अर्जुनानें उत्तर दिलें.

"मग असा रे काय बसला आहेस गाल फुगवून ?" भीम आळस देत म्हणाला.

अर्जुन उठून उभा राहिला. इकडे-तिकडे फेऱ्या घालीत तो म्हणाला, "किनई दादा, हें माशा मारीत बसणें कांहीं मला आवडत नाहीं."

"तर मग मासे मारायला जात जा. तेवढीच करमणूक होईल !" भीम खजाळपणें म्हणाला.

"ऐक रे !" धर्मानें भीमाला चापलें, अन् अर्जुनाला जवळ घेऊन त्यानें विचारलें, "मग मनांत काय आहे तुझ्या ?"

" माझ्या मनांत आहे कीं, खूप खूप शिकावें. नाना प्रकारच्या अस्त्रांची माहिती करून घ्यावी. किती तरी अस्त्रें माहीत नाहींत मला अजून. मुख्य म्हणजे शंकरांचें पाशुपतास्त्र माहीत नाहीं मला."

" मग विचार काय आहे तुझा ?"

" मला वाटतें कीं, कुठें तरी जावें तपश्चर्येला. शंकरांना प्रसन्न करून घ्यावें. अन् त्यांच्याकडून तेवढें पाशुपतास्त्र शिकावें."

" शीक बाबा. तुझें बरें लक्ष लागतें शिकण्याकडे. आपलें कांहीं नाहीं लागत तसें." भीम आळस देत मध्येंच उद्गारला.



" बरें, तर मग केव्हां निघतोयस ?"

" तुम्हांला पसंत आहे ना हा माझा बेत ? मग मी लगेच निघतों. होऽ मनांत आलें कीं करून टाकावें."

सगळ्यांना तो बेत पसंत पडला. अगदीं द्रौपदीला सुद्धां. त्यांनीं सगळ्यांनीं अर्जुनाची तयारी केली. तयारी तरी काय करायची होती म्हणा ! पण जेवढी करायची, तेवढीच सगळ्यांनीं मिळून केली.

द्रौपदी अर्जुनाकरितां तहानलाडू, भूकलाडू बांधीत होती. अर्जुन बाहेरून येऊन तिला म्हणाला, "तुला वाईट वाटत नाहीं ना मी जातोंय् म्हणून !"

"मुळींच नाहीं वाईट वाटत. वाईट काय वाटायचें त्यांत ! तुम्ही का कुठें भलत्या कामाला का जातांय् ! चांगलें शिकायला जातांय्. मी देवाची प्रार्थना करीत राहीन कीं, देवा, माझ्या अर्जुनांना यश दे !"

असा सगळ्यांनीं उत्साहानें निरोप दिलेला अर्जुन निघाला बाहेर. पाशुपतास्त्र मिळविणें म्हणजे मोठेंच काम ! चांगली कडक तपश्चर्या करायला पाहिजे त्याकरितां. अन् मग एवढी मोठी तपश्चर्या करायची त्याकरितां एकान्तस्थळ पाहिजे.

'कुठें तपश्चर्या करावी बरें ?'



निघाला अर्जुन तपश्चर्येसाठीं जागा शोधीत. किती तरी जागा पाँहिल्या त्यानें. पण पसंतच पडेनात त्याला. तपश्चर्येला जागा कशी पाहिजे ? चांगली पवित्र, रमणीय, एकान्त, पाणी भरपूर असलेली, पशुपक्ष्यांचें भय नसलेली. कुठें एकान्त असायचा, तर पाणी नसायचें. कुठें पाणी भरपूर, तर तिथें लोकांची गर्दी. एखादी जागा चांगली रमणीय, तर तिथें घाणेरड्या लोकांची वस्ती.

नाना ठिकाणें पाहिलीन् त्यानें. एकहि मनास येईना त्याच्या. शेवटीं तो गेला इंद्रनील पर्वतावर. भारी सुंदर होती ती जागा. पाणीबिणी भरपूर, कुठें कुठें ऋषींचे आश्रम, चांगली रमणीय वनश्री, पशुपक्ष्यांचें फारसें भय नाहीं; असलेंच तर दोन चार मोर, पोपट, हरणें, इतकेंच.

तिथेंच रहायचें ठरविलें अर्जुनानें. एक छानदार झोंपडी बांधली त्यानें एका झऱ्याच्या कांठीं. अन् तिथें आपली वल्कलेंहि सोडून एक मोळाची कौपीन लावलीन्. एक धुनी रचलीन्, अन् एके दिवशीं सकाळीं स्नान करून अन् भस्म लावून बसला अर्जुन शंकरांच्या ध्यानाला.

**रमणीये वनोद्देशे रममाणोऽर्जुनस्तदा ।**
**तपस्युग्रे वर्तमान उग्रतेजो महामनाः ॥**

भारी कठोर नियम करून वतलेन् त्यानें. कांहीं खायचें नाहीं. नुसत्या पाण्यावर रहायचें. सकाळपासून बसायचें तें अगदीं संध्याकाळ-पर्यंत. उन्हाची पर्वा करायची नाहीं, वाऱ्याची पर्वा करायची नाहीं. पावसाला दाद द्यायची नाहीं कीं थंडीची डाळ शिजूं द्यायची नाहीं. सारखें शंकरांचें ध्यान करीत बसून रहायचें.

मोठमोठाले ऋषि पण कौतुक करायला लागले अर्जुनाचें. एक ऋषि म्हणाला, "काय हो, भारीच कठोर तपश्चर्या सुरू केली आहेन् अर्जुनानें !"

"नव्हे तर काय !" दुसरा म्हणाला, "तसें पाहिलें तर हा राजपुत्र. एवढे कष्ट सहन करायची संवय नसायची, पण कांहीं नाहीं बुवा ! आमच्यावरहि ताण केलीन् त्यानें !"

"ताण म्हणजे काय ही खरोखरीच ताण ! आम्ही करतों तपश्चर्या पण आपलें खाणेंपिणें सांभाळून चालतें आमचें काम. पण याचें सगळेंच विलक्षण ! कांहीं म्हणजे कांहीं सुद्धां खात नाहीं हा ! अगदीं कंदमुळेंहि नाहीं !"

सगळ्या ऋषि-मंडळांत अर्जुनाची कीर्ति पसरत चालली. पण याचें कांहीं तिकडे लक्ष नाहीं. हा आपला तपश्चर्येंत गुंग. शेवटीं होतां होतां त्याची कीर्ति थेट शंकरापर्यंत जाऊन पोहोंचली. नंदी शंकरांना म्हणाला, " देवा, तुमच्यापर्यंत आली कीं नाहीं बातमी ? "

" कसली रे ? " शंकर आपल्या गळ्यांतल्या नागाला हातानें खेळवीत म्हणाले.

" अर्जुनाच्या तपश्चर्येची ? "

" नाहीं बुवा ! "

" वाः नारदांनीं नाहीं सांगितली का तुम्हांला ! "

" हे रे ! कां करतोय् अर्जुन तपश्चर्या ? "

" पाशुपतास्त्रासाठीं म्हणे बुवा ! "

" पाशुपतास्त्रासाठीं ? अरे वा ! किती दिवस झाले ? "

" बरेच दिवस झाले. भारी कडक तपश्चर्या सुरू आहे म्हणे त्याची. कांहीं खात नाहीं म्हणे. सारखा तुमचें ध्यान करीत बसलाय् !"

" कुठें बसलाय् रे ? "

" इन्द्रनील पर्वतावर बसलाय् म्हणे. मोठमोठे ऋषीहि स्तुति करीत होते त्याची ! "

" असें का ? चांगला पोर आहे बरें का अर्जुन. त्याला पाशुपतास्त्र पाहिजे तर शिकवूं या. पण अगोदर परीक्षा पाहिली पाहिजे त्याची. "

" नव्हे तर काय ! पाशुपतास्त्र मिळविणें म्हणजे कांहीं अशीतशी गोष्ट नव्हे ती ! चांगली कडक परीक्षा घ्या त्याची. "

" ठीक आहे. काय करू या बरें ? " लागले शंकर विचार करायला. विचार करतां करतां त्यांना सुचली युक्ति. अर्जुनाला पाशुपतास्त्र शिकवायचें, म्हणजे अगोदर त्याच्या युद्धकौशल्याची परीक्षा पाहिली पाहिजे. तींत तो उतरला, तर मग पुढें शिकवायचें पाशुपतास्त्र.

नाहीं तर रामरक्षा शिकवायचा हट्ट धरून बसला, अन् 'राम' म्हणायच्या जागीं म्हणतो 'लाम'! अशाला रामरक्षा कशी यायची ?

अर्जुनाची तपश्चर्या सुरूच होती. वाळून दुबळा झाला होता बिचारा. पार छातीचें हाडन् हाड बाहेर पडलें होतें. तरी पण त्याची तपश्चर्या चालूच होती. तो निश्चयच करून बसला होता. 'काय होईल तें होई ना का! पण पाशुपतास्त्र शिकेन शंकरांकडून, तेव्हांच परत जाईन. तोंपर्यंत परतायचाच नाहीं!'

अचानक एके दिवशीं तपश्चर्या करतां करतां अर्जुनाला दिसला एक डुक्कर. भला पोसलेला होता तो. तुसता तुस्त फुगला होता अन् आपल्या सुळ्यानें उगीचच बारकीं बारकीं झाडें हुंदडे देऊन पाडीत तो सरळच अर्जुनाच्या झोंपडीकडे येत होता. त्याच्या डोळ्यांवरहि मांस उतरलें होतें. मान तर अशी जाड होती कीं, मागें फिरूनहि पहातां येत नव्हतें त्याला. आपल्याच धुंदींत चालला होता तो डुक्कर.

अर्जुनानें जेव्हां तो डुक्कर पाहिला, तेव्हां ताबडतोब त्याचा क्षत्रिय-स्वभाव जागा झाला. त्याला वाटलें, हा डुक्कर आतां त्रास देईल ऋषींना! मारला पाहिजे बेट्याला. विचार यायचा अवकाश, ताबडतोब अर्जुनानें आपलें बाजूला ठेवून दिलेलें धनुष्य उचललें, अन् त्यावर दोरी चढवली. डुक्कर येतच होता समोरून. अर्जुनानें भात्यांतला एक बाण काढला अन् असा कांहीं खेंचून सोडलाय् तो –

खपकन् त्या डुकराच्या अंगांत रुतून बसला तो, अन् डुक्कर खालीं कोसळला मोठमोठ्यानें ओरडत!

तोंच मजा काय झाली, कुणीकडून कोण जाणे, त्याच वेळीं दुसराहि एक बाण त्या डुकराला येऊन लागला. विवळत हगतमुतत डुकरानें प्राण सोडला! दोन्ही बाण बरोबरच लागले म्हणानात!

**तौ मुक्तौ सायकौ ताभ्यां समं तत्र निपेततुः।**

अर्जुन आश्चर्यानें बघायला लागला. हा दुसरा बाण कुणीं मारला ? तो इकडे-तिकडे पहातोय् तों तो डुक्कर जिकडून आला होता, त्याच दिशेनें एक किरात म्हणजे पारधी हातांत धनुष्यबाण घेऊन झाडींतून बाहेर पडला. भला जाडाजुडा ! तांबडे लाल डोळे, लंगोटी लावलेली. भल्या रांकट जाड्याजुड्या मिशा. असा तो पारधी पुढें येत म्हणाला,

"काय रे, ए गोसावड्या, या माझ्या शिकारीला कुणीं बाण मारला ?"

"मीं मारला. कां ?" अर्जुनानें उलट प्रश्न केला. त्याला त्या किराताच्या उद्धट बोलण्याचा असा राग आला ! पण तपश्चर्येला बसला होता म्हणून त्यानें तो राग तसाच गिळला.

"कां म्हणजे ? माहीत नाहीं का तुला ? शिकार माझी आहे !"

**"ममैव लक्ष्यभूतो हि मम पूर्वपरिग्रहः।"**

"तुझी कशावरून ?"

"कशावरून म्हणजे ? मीं म्हणतों म्हणून !"

"तूं म्हणतोस हा कांहीं पुरावा नव्हे !"

"पुरावाबिरावा कांहीं माहीत नाहीं मला. तूं कां बाण मारलास ? सांग. कां मारलास ?"

"अरे, पण तो ऋषींच्या आश्रमांकडे चालला — !"

"नाहीं, पण तूं माझ्या शिकारीला कां बाण मारलास ?"

"बरं ! मारला ! पुढें मग ?" अर्जुनहि आतां तापत चालला.

"मग ? मग कांहीं नाहीं. कां मारलास तूं बाण ?"

"माझी इच्छा होती म्हणून मारला."

"तर मग माझी इच्छा तुला धरून बडवावें, अशी आहे."

"वाः ! तूं भांडणच करायला लागलास ! अरे, मी तपश्चर्या करतोंय् !"

"तपश्चर्या कर कीं आणखी कांहीं कर. मी तुला धरून ठोकणार!"

आतां मात्र अर्जुनहि रागावला. त्यानें ठरवलेंन् कीं, 'परीक्षाच म्हणायची ही आपली. होऽ! पाशुपतास्त्राकरितां तपश्चर्या करतोंय् आपण, अन् हा अपमान सहन करून घ्यायचा?' तो आपलें धनुष्य आणि बाण सांवरून उभा राहिला अन् म्हणाला, "अरे ए! तूं कुणाशीं भांडतोयस्? माहीत आहे का तुला? अर्जुनाचें नांव ऐकलें आहेस का तूं?"

किरात आडदांडासारखा हंसत आपल्या धनुष्याला बाण चढवीत म्हणाला, "अर्जुन? हो! ऐकलें आहे खरें त्याचें नांव. त्याच्या बायकोला फरफर ओढीत सभेंत तिची दुर्दशा केली लोकांनीं, तरी मान खालीं घालून बसला होता, तो अर्जुन का? तसली दहा-पांच पोरें आमच्या झोंपडीसमोर येऊन मातींत घरकुलें करीत असतात खरीं!"

मग मात्र अर्जुन भयंकर संतापला. त्यानें भराभर आपल्या भात्यांतून बाण काढून ते किरातावर सोडायचा सपाटा चालवला. बाणामागें बाण सोडून त्यानें किराताला नुसता वेढून टाकला!

**ततोऽर्जुनः शरवर्षं किराते समवासृजत्।**

किरातहि तयारच होता. त्यानें अर्जुनाचे बाण आले कीं ते मधल्यामध्यें बाणांनीं तोडून टाकावे, अन् दुसऱ्या बाणांनीं अर्जुनाला जखमी करावें! इतके बाण सोडले अर्जुनानें, पण एकहि बाण लागेना किराताला!

अर्जुनाला आश्चर्यच वाटलें! एऱ्हवीं अर्जुन लढायला उभा राहिला कीं, त्याच्यापुढें कुणीहि टिकायचा नाहीं. पण या पाळीला पहातो तों सगळेंच उलटें! त्याचे बाण फुकट चालले, अन् तो मात्र जखमी व्हायला लागला.

अर्जुनाला येत होतीं त्या सगळया अस्त्रांचा उपयोग केला त्यानें. वायव्यास्त्र सोडून पाहिलें, गरुडास्त्राचा उपयोग केला, नागास्त्राची योजना केली, मोहनस्त्राचा प्रयोग केला, पर्जन्यास्त्र फेंकलें.

पण सगळीं निकामीं झालीं ! किरात आपला जसाच्या तसाच ! हंसत हंसत अर्जुनावर बाण सोडतोय् तो !

शेवटीं किरातानें अर्जुनाचें धनुष्यहि तोडून टाकलें एका बाणानें. मग मात्र अर्जुन निःशस्त्र झाला. तरी त्याची रग जात्ये का कुठें ? तो अंगांतले बाण उपटीत किराताला म्हणाला, " बरें आहे ! तुटूं दे धनुष्य तुटलें तर ! येतोस ? कुस्ती खेळतोस ? "

" होऽ ! कशालाहि तयारी आहे. " किरात धनुष्यबाण टाकून दंड थोपटीत म्हणाला.

दुबळा झालेला अर्जुन, अन् भला जाडाजुडा किरात, दोघेहि भिडले कुस्तीला. दोन डावांतच किरातानें अर्जुनाला खालीं घेतला, अन् तो बसला त्याच्या छातीवर !

मग त्याला किरात म्हणतो,

" का बच्चंजी ! भली जिरली का खोड ? आतां बोलाव कुणाला मदतीला बोलावतोस तो ! का हरलों म्हणून कबूल करतोस ? "

" अरे जा रे ! मी ज्यांचें ध्यान करतों, ते भगवान् शंकर काय त्यांच्या या भक्ताला असाच मरूं देतील काय ? "

असें म्हणून अर्जुन शंकराचें ध्यान करायला लागला, एकाग्र चित्तानें. मनांतल्या मनांत तो शंकराची पूजा करायला लागला. त्यांच्यावर फुलें वहायला लागला —

तों काय आश्चर्य ! तो जें जें फूल वहायची कल्पना करायचा, तें तें फूल इकडे त्या छातीवरच्या किरातावर दिसूं लागायचें ! अर्जुन डोळे विस्फारून पहातोय् तों हळूहळू किराताचा वेष मावळून तिथें शंकर दिसायला लागले ! अर्जुन म्हणाला, " कोण देवा ! तुम्ही का ते ? "

"होय, मीच तो बरें माझ्या भक्ता! शाबास! खूप परीक्षेंत उतरलास! आतां पाशुपतास्त्रच काय आणखी सुद्धां कांहीं शिकवीन तुला." असें म्हणून शंकरांनीं अर्जुनाला उचलून पोटाशीं धरलें! आणि मग पाशुपतास्त्राची सगळी विद्या त्यांनीं अर्जुनाला शिकवली.

मित्रांनो, अर्जुनाची जी शिकण्याची जबर इच्छा, तिचें हें फळ बरें का! त्या इच्छेकरितां वाटेल तितकी कठीण परीक्षा द्यायलाहि अर्जुनानें मागेंपुढें पाहिलें नाहीं!

♣ ♣ ♣

अनुक्रम
दिनांक
क्रमांक 3009
नों. दि.
वाचनालय

# होईनच मी एम्. ए.

माझ्या बालमित्रांनो !

कृष्णाबाई पाहिली आहे तुम्हीं ? भारी सुंदर आहे ती. कृष्णाबाई म्हणजे कृष्णा नदी. तिच्या कांठीं रहाणारीं माणसें तिला आवडीनें कृष्णाबाई म्हणतात. तर खरोखरीच सुंदर आहे ती. उगम तरी किती सुंदर ! महाबळेश्वर आहे माहीत तुम्हांला ? तिथें आहे तिचा उगम.

एक भारी सुंदर देऊळ आहे. खूप मोठें. अन् त्या देवळांतून पांच नद्या बहिणीबहिणीसारख्या हातांत हात घालून बाहेर पडतात. बाहेर पडतांना त्या पांची एका भल्या मोठ्या कुंडांत पडतात. अन् मग तिथून जशा पांच बहिणी आपापल्या सासरीं जायला निघाव्यात, तशा पांच वेगवेगळ्या वाटांनीं महाबळेश्वराच्या डोंगराखालीं उड्या घेतात त्या.

कृष्णाबाई उतरते सातारा जिल्ह्यांत. त्या सातारा जिल्हाभर कृष्णाबाई जिथून जिथून वाहिली, त्या त्या गांवीं तिच्या कांठीं भलीं सुंदर देवळें आहेत, अन् भले प्रशस्त घाट आहेत. कऱ्हाडला कृष्णा अन् कोयना, दोघी बहिणी बहिणी भेटल्या आहेत परत. दोघीहि समोरून समोरून आल्या, अन् कडकडून भेटल्या एकमेकींना. त्यांच्या त्या संगमाला नांवहि कसें सुंदर आहे. 'प्रीतिसंगम !'

त्या कऱ्हाडशेजारीं कृष्णाबाईच्या कांठीं आहे एक छोटेंसें गांव. त्याचें नांव टेंभू. त्यालाहि कृष्णाबाईच्या तटाकीं एक भलें मोठें देऊळ

आहे लक्ष्मीनारायणाचें. गोजिरवाण्या मूर्ति, सुंदर महिरापी, कानकळाशी-दार शिखर, भला मोठा सभामंडप अन् समोरच्या नगारखान्यांत सकाळ-संध्याकाळ दड दड नगारा झडतो आहे.

त्या लहानशा टेंभू गांवचें नांव कुणाला माहीत झालें असतें ! कारण त्या गांवच्या देवळांतल्या नगाऱ्याचा आवाज कांहीं हिंदुस्थानभर ऐकूं जाईल इतका मोठा नाहीं ! पण त्या गांवच्या एका लहानग्या मुलाची कीर्ति मात्र पुढें हिंदुस्थानभर गाजली !

त्या मुलाचें नांव गोपाळ गणेश आगरकर. त्या टेंभू गांवच्या देवळाचा धनी. त्या मुलाचे पूर्वज होते खूप श्रीमंत. त्यांनीं तें छानदार देऊळ बांधून त्याला दरसालचें उत्पन्नहि लावून दिलें.

पण मग पुढें आली गरिबी. गोपाळचे वडील गणेशपंत हे घरींच राहिली-साहिली शेती संभाळून होते. संस्कृतचा अभ्यास चांगला केला होता त्यांनीं. कधीं कीर्तनें करायचे, कधीं पुराण सांगायचे. स्वभावानें भारी प्रेमळ. त्यांची पत्नीहि तशीच प्रेमळ. सात मुलें झालीं त्यांना. सातवा मुलगा तो आपला गोपाळ.

लहानपणापासून गोपाळ खूप हुषार अन् दांडगा. पोरांचा म्होरक्याच तो. जन्म झाला कऱ्हाडला आजोळीं, अन् पुढें त्याला शिकायलाहि ठेवला कऱ्हाडलाच. तर कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावर पोरांना घेऊन गोपाळ नुसता डुंबत असायचा दोन दोन तास. पोहणें झालें कीं मग चिंचा, बोरें, कैऱ्या, कवठें, इत्यादि फळांकरितां मोहीम निघायची त्या टोळीची. कऱ्हाडशेजारच्या दऱ्या अन् खोरीं सगळीं उलथीं-पालथीं केलीं होतीं त्या पोरांनीं.

एकदां एका सुटीच्या दिवशीं हीं पोरें जमलीं गोपाळच्या आजोळीं. एका पोरानें आणली एक तोंडाला पाणी सुटणारी बातमी.

" बरें का गोपाळ, एक जम्मत सांगायची आहे तुला ! "

“ काय रे ? काय ? आम्हांला नाहीं का सांगायची ? ” सगळ्या पोरांनीं त्याच्याभोंवतीं घोळका करून त्याला विचारलें.

“ अरे हो ! हो ! सांगतों की पण ! आपल्या पंतांच्या कोटांत चिंचा आहेत ना ? त्यांतली एक चिंच अशी छानदार पिकली आहे ! गोंभुळली आहे नुसती ! ”



“ कोणती रे ? कोणती ? ” पोरांनीं आपल्या तोंडाला सुटलेलें पाणी गिळत विचारलें.

“ चला कीं ! मी दाखवतों. ”

निघालीं पोरें. गोपाळ होता त्यांच्यापुढें. आलीं पोरें पंतांच्या कोटांत.

"कुणीकडली चिंच रे?" पोरांनीं विचारलें त्या बातमी आणणाऱ्याला

"पार दरडीवरची कोयनेच्या."

पण पोरें त्या दरडीजवळच्या चिंचेजवळ येऊन पहातात तों काय! वानरांनीं नुसतें फुललें आहे झाड. काळ्या तोंडाचे, अन् लांब शेपटीचे वानर. दोन-तीन वानर भले थोरले हुप्प्ये, अन् बाकीचीं बारकीं बारकीं. या पोरांच्या टोळक्याला पाहून तीं लागलीं चिरचिर करून किलकिलाट करायला.

एवढी सुंदर पिकलेली चिंच, पण पार फडशा पाडणें चालवलें होतें त्यांनीं तिचा. गोपाळनें जेव्हां का त्या वानरांना पाहिलें, तेव्हां एक दगड उचलीत तो काय म्हणतो,

"ए दगड मारा रे यांना!"

केली पोरांनीं दगड भिरकावयाला सुरुवात. बारकीं वानरें पळालीं दुसऱ्या झाडांवर. पण ते जे दोन-तीन हुप्प्ये होते ना, ते कांहीं हालेनात. तिथूनच दांत काढून दाखवायला लागले पोरांना चिंचा खातां खातां.

गोपाळनें ठरवलेंन्. 'चिंचा खायला आलोंय्, आतां काय वाटेल तें झालें तरी चिंचा खाल्ल्याशिवाय जायचें नाहीं. वानरांना आतां लावतों पिटाळून.' अन् मग त्यानें टोपी काढून दिली पोरांजवळ. धोतराचा मारला काचा. सदरा खोंवला धोतरांत. अन् पोरें नको नको म्हणत असतांहि हा सरसर चढला झाडावर.

दोन वानर याला पाहून पळून गेले. पण एक जो आला गोपाळच्या अंगावर! शेंडीच धरली त्यानें गोपाळची! पण गोपाळहि असा होता पक्का! त्यानें एका फांदीला मांड्यांत धरलें दाबून, अन् लागला कुस्ती खेळायला वानराशीं. तो याला चावायला बघतोय्, हा त्याला ठोसे लगावतोय्.

शेवटीं जी झुकांडी मारली वानरानें, अन् धापा टाकीत गेला गोपाळच्या तडाक्यांतून सुटून ! खूप चिंचा खाल्ल्या पोरांनीं गोपाळला शाबासकी देत.

अगदीं याच जातीची हौस होती गोपाळला शिकायची. कोणतीहि गोष्ट येत नाहीं म्हणजे काय ? आलीच पाहिजे ती. काय वाटेल तें करील गोपाळ त्या गोष्टीकरितां. पण ती गोष्ट शिकेल, तींत चांगला हुषार होईल तेव्हांच राहील.

तर गोपाळ जसा टेंभूहून शिकण्याकरितां कऱ्हाडला आला, तसा आजोबांनीं त्याला अन् त्याच्या मामाला शाळेंत नेऊन घातला. त्या शाळेचे हेडमास्तर होते नारायण मनोहर रोंघे. मोठे बुद्धिमान्. अन् शिकवायचे असें मजेदार ! लहानग्या पोरांना गमतीदार प्रश्न घालायचे.

" सांगा रे गड्यांनो ! दहा रुपयांचे पंचेचाळीस, तर वीस रुपयांचे किती ? "

बाकीच्या पोरांनीं पंचेचाळीस दुणे नव्वद असा हिशेब करावा. पण लहानग्या गोपाळनें हात वर करून म्हणावें.

" मी सांगूं मास्तर ? "

" सांग पाहूं ! "

" वीस रुपयांचे ऐंशी पंचे ! पंचे म्हणजे अंग पुसतात ते ! "

" भले शाबास ! " मास्तरांनीं हंसत हंसत गोपाळची पाठ थोपटावी.

मास्तरांना जेवढें येत होतें, तें सगळें ओतलें त्यांनीं गोपाळच्या झोळींत. अन् ती सगळी झोळी पचवून रिकामी केली गोपाळनें. गोपाळवर भारी प्रेम मास्तरांचें. ते त्याच्या चुणचुणीतपणावर अन् बुद्धिमत्तेवर अगदीं खूष असायचे. वेळ मिळेल तेव्हां गोपाळला घेऊन बसायचे ने,

अन् त्याला कितीतरी गोष्टींची माहिती करून द्यायचे. गोपाळ सगळें तें मोठ्या हौशीनें शिकायचा.

कऱ्हाडला नागपूरकर नांवाचे एक मुन्सफ रहात. त्यांना असें वाटे कीं, मुलांनीं खूप शिकावें, चांगलें हुशार व्हावें. मुलांना शिकायला उत्तेजन मिळावें, म्हणून ते दर रविवारीं कांहीं बाल-गोपाळांना आपल्या घरीं गोळा करायचे. अन् मग कधीं त्यांच्याकडून एखाद्या छानदार विषयावर भाषणें देववायचीं तर कधीं त्यांच्याकडून लेख लिहून मागवायचे. चांगलीं चुणचुणीत पोरें दिसतील, साधारण बरें बोलत असतील, अशांना बक्षिसें द्यायचीं. बाकीच्यांना नुसतेंच "भले शाबास" म्हणायचें. असा चालायचा त्या नागपूरकरांचा कार्यक्रम.

अशा चांगल्या संधीचा फायदा घेतल्याशिवाय आपला गोपाळ काय रहातोय् ! त्यानेंहि एकदां एक चांगला छानदार निबंध लिहून आणला, अन् फाड-फाड वाचून दाखविला. तो निबंध ऐकायला गांवांतली चार मंडळी जमली होती. त्यांत होते कऱ्हाडचे मामलेदार आप्पासाहेब जोशी. त्यांना वाटलें, हा एवढासा मुलगा काय आणतोय् लिहून असा छानदार निबंध ? आणला असेल झालें मास्तरांबिस्तरांकडून लिहवून. ते सुपारी कातरून तोंडांत टाकीत म्हणाले, "बरं का नागपूरकर ! निबंध छान आहे. पण काय रे गड्या, नांव काय तुझं ? गोपाळ नाहीं का ? कोणाकडून लिहवून आणलास हा निबंध तूं ? मास्तरांकडून आणलास ना ? खरं सांग. आम्हीं कांहीं रागवायचे नाहीं तुझ्यावर !"

गोपाळला असा राग आला ! त्यानें फाडकन् दिलें उत्तर, "मास्तरांच्याकडून कशाला लिहवून घेतोंय् ? आम्हांला नाहीं वाटतें लिहितां येत ? तुम्हीं सांगा आत्तां एखादा दुसरा विषय. इथल्या इथें लिहून दाखवितों छानदार निबंध त्याच्यावर ! या निबंधाहून सरस !"

असा तेजस्वीपणें चालला होता गोपाळचा अभ्यास. पण बेटें मधेंच आलें एक विघ्न ! कऱ्हाडला शाळा इंग्रजी तिसरीपर्यंतच. पुढली शाळा पुण्याला. अन् तिथें रहायचें म्हणजे खर्चाला पैसे पाहिजेत. बिचाऱ्या गरीब गोपाळनें पैसे कुठून आणायचे ? बरें. आजोबाहि तेवढ्यांत वारले. मग कोण व्यवस्था करणार गोपाळच्या शिक्षणाची ? बिचारा हिरमुसला होऊन एवढेंसें तोंड करून बसला होता. पण मनांत अशी जबरदस्त इच्छा – 'कांहीं का होईना, किती का अडचणी येईनात ! मी खूप शिकल्याशिवाय नाहीं रहायचा !'

विचार करतां करतां त्याला सुचली एक युक्ति. रत्नागिरीला आगरकरांपैकीं एकजण वामन कृष्णाजी आगरकर होते – एज्युकेशनल इन्स्पेक्टर. त्यांच्याकडे जावें पुढल्या अभ्यासाला. ते करतील आपली सोय. आणि असा विचार ठरवून निघाला गोपाळ तिकडे. आला तो रत्नागिरीला. तिथें शिकायची सोय झाली त्याची. पण त्या घरचीं माणसें अशीं खाष्ट ! कुरकुर काय करायचीं, कामें काय सांगायचीं, शिव्या काय द्यायचीं, मधुकरीला काय पाठवायचीं अन् 'मधुकऱ्या' म्हणून चिडवायचीं काय !

सगळें सहन केलेंन् गोपाळनें. ते सगळे शिव्याशाप गिळून टाकलेन् त्यानें. कारण त्याला शिकायचें होतें.

" ए मधुकऱ्या ! तेवढें तें अंगण झाडून टाक, अन् मग लाव अभ्यासाचे दिवे ! अभ्यास करून मारे आतां बालिष्टर होणार आहेस तो ! "

गोपाळनें मुकाट्यानें उठून अंगण झाडून काढावें, अन् मग अभ्यासाला बसावें. तोंच दुसरा हुकूम सुटायचा.

" गोप्या ! गधड्या, हीं धोतरें नाहीं धुतलींस चांगलीं ? डाग कसे राहिले याच्यावर ! चल ऊठ अगोदर ! परत धुवून आण ! भिकारी तर भिकारी अन् आळस किती ! "

निमूटपणें गोपाळनें उठून धोतरें पुनः धुवून आणावींत, अन् मग अभ्यासाला बसावें. अशीं दोन वर्षें काढलीन् त्यानें. एवढा कामाचा लकडा मागें असूनहि तो दोन इयत्ता वर गेला.

पण पुढें त्याला शाळेंतच जाऊं देईना कुणी ! नुस्तेंच तावडून घ्यायला लागले ! गोपाळच्या मनांत तर जबर इच्छा.– 'मला शिकायचेंय् !' मग कसें जुळणार रत्नागिरीला ? निघाला तिथून तो, अन् परत आला कऱ्हाडला. सारखा जीव तळमळतोय् त्याचा – 'माझें शिकायचें कुठें जमेल ?' 'मला शिकायचेंय् ! मला शिकायचेंय् !'

तों आणखी एक योग आला जुळून. वऱ्हाडांत आकोल्याला गोपाळचे मामा भागवत रहायचे. त्यांच्याकडे मामीला घेऊन जायचें होतें. निघाला प्रश्न. "कोण घेऊन जाईल हिला ?"

"मी जातों !" चटकन् गोपाळ म्हणाला. कारण त्याला आकोल्याची शिक्षणाची सोय दिसत होती डोळ्यांपुढें. निघाला मामीला घेऊन गोपाळ आकोल्याला. तिथें गेल्याबरोबर तो पोहोंचला तिथल्या शाळेंत. अन् हेडमास्तर होते महाजनी, त्यांच्यापुढें उभा राहून त्यांना म्हणाला,

"मास्तर, मला नांव घालायचेंय् शाळेंत. खूपसें शिकायचें आहे मला. पण फी नाहीं भरतां यायची. घालाल का माझें नांव ?"

"कुणाचा मुलगा बाळ तूं ? इथें कोणाकडे आलास ?" मास्तरांनीं कौतुकानें विचारलें. गोपाळनें सगळी हकीगत सांगितली त्यांना. बरें वाटलें मास्तरांना. त्यांनीं नांव घातलें गोपाळचें. झाली शिकायला सुरुवात. भराभर गोपाळ अभ्यास करायला लागला.

पण नशीब असें कांहीं दुष्ट ! गोपाळच्या मामीची आई पडली आजारी. मामीला आलें पत्र. तशी ती म्हणाली, "मला जायचेंय् आईला भेटायला."

"जा हो ! पण बरोबर कोणाला नेशील ?"

" गोपाळ आहे कीं आपला ! "

गोपाळला जेव्हां हें कळलें, तेव्हां असें कांहीं वाईट वाटलें त्याला ! " आतां परत कऱ्हाडला जाणें आलें ! पण जायचेंच नाहीं कऱ्हाडला. गेलों तरी रहायचें नाहीं ! " गोपाळनें केली एक युक्ति. हेडमास्तरांकडे जाऊन त्यांना नमस्कार करून म्हणाला तो,

" मास्तर येतों मी. संपली माझी शाळा. मामीच्याबरोबर जावें लागणार मला परत. पण मी पुण्याला राहूं का शिकायला ? "

मास्तरांनाहि वाईट वाटलें. ते म्हणाले, " रहा कीं ! पण कुठें रहाशील ? "

" कुठेंहि राहीन. तुम्ही सांगाल तिथें. "

" मी सांगेन तिथें रहाशील ? थांब. मी देतों तुला एक पत्र. "

मास्तरांनीं एका ओळखीच्या जागीं दिलें एक पत्र. गोपाळ मामीला कऱ्हाडला पोहोंचवून आला पुण्याला. पण तिथें कांहीं जमेना त्याचें. कुणी कुणी म्हणून सोय करीना गोपाळची. पण गोपाळची शिकायची इच्छा जबर ! ' न कां कुणी करीना सोय ! आकोल्यालाच जाईन मी परत. किती चांगले आहेत तिथले मास्तर ! '

आला गोपाळ आकोल्याला. झाला हजर मास्तरांपुढें. ते आश्चर्यानें म्हणाले, " कां रे ? परतसा आलास ? "

गोपाळनें सगळी हकीगत सांगितली पुण्याची. अन् म्हणाला, " मास्तर, मी राहूं का इथें ? तुम्ही सांगाल का मामांना ? "

" सांगेन हो ! "

मास्तरांनीं मामांना सांगितलें, अन् झाली झपाट्यानें अभ्यासाला सुरुवात. दुसरा विषय नाहीं गोपाळच्या डोळ्यापुढें. पण घरांतलेंहि काम पडायचें. एके दिवशीं खूप काम होतें घरचें. म्हणून गोपाळचा अभ्यास

कांहीं झाला नाहीं. अन् शाळेंत यायलाहि झाला उशीर. तर मास्तर काय म्हणाले,

"काय गोपाळ ! अरे उशीर कां झाला आज ?"

"घरीं काम होतें खूप !" गोपाळनें खालीं मान घालून उत्तर दिलेंन्.

"अभ्यास तरी केला आहेस का ?"

गोपाळनें नुसतीच मान हालवली. मास्तर चेष्टेनें म्हणाले, "अरे, काम तर रोजच्च असायचें ! मग कसा होणार रे तुझ्याकडून अभ्यास ! असाच रखडत पडणार का तूं ?"

गोपाळ तापला. तटकन् बोलला तो. "मुळींच नाहीं रहायचा रखडत. एम्. ए. होईन तुमच्यासारखा. न झालों तर नांव बदलून देईन !"

मग झाला का गोपाळ एम्. ए. ?

हो. झाला तर ! आकोल्याला चांगल्या तऱ्हेनें मॅट्रिक झाल्यावर त्यानें ठरविलेंन् कीं, 'मी पुण्याला जाईन कॉलेजमध्यें.' मास्तरांनींहि कौतुकानें अन् प्रेमानें आपापसांत वर्गणी करून त्याला साठ रुपये दिले. तें साठ रुपयांचें भांडवल घेऊन पुण्याला आला गोपाळ.

डेक्कन कॉलेजमध्यें त्यानें नांव घातलें. कॉलेजची फी भरण्याकरितांच नाना भानगडी कराव्या लागायच्या गोपाळला. कुठें-आकोल्याच्या 'वऱ्हाड समाचार'मध्यें लेख लिही, तर कुठें वक्तृत्वोत्तेजक सभेंत भाषण करून बक्षीस मिळव, तर कुठें कॉलेज-संमेलनांत लेख लिहून बक्षीस मिळव.

पण एवढें सगळें करूनहि कॉलेजची फीच कशीबशी भागायची ! जेवायला धड नाहीं. कपडे नाहींत पुरेसे. सांगूं का ? खरेंहि वाटायचें नाहीं कुणाला. पण किती तरी दिवस गोपाळनें एका सदऱ्यावर काढले ! रात्रीं धुवून सदरा वाळत टाकावा, रात्रभर उघडें असावें, अन् सकाळीं उठल्यावर परत तोच अंगांत घालावा ! कधीं कधीं थंडीच्या नाहीं तर

पावसाळ्याच्या दिवसांत वाळायचाहि नाहीं तो ! तसाच दमट अंगांत घालावा लागायचा मग.

हें सगळें केलेंन् गोपाळनें. कारण त्याला शिकायचें होतें !

अन् अशा अनेक आपत्तींशीं झुंजत शेवटीं तो बी. ए. झाला, अन् पुढें एम्. ए.ची परीक्षाहि दिलीन् त्यानें. एवढें शिकून पुढें काय केलेंन् त्यानें ? भरपूर पैसे मिळवले का ?

माझ्या बालमित्रांनो ! समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर मनांत आणते, तर खोऱ्यानें पैसे ओढते ! पण हें सगळें शिक्षण त्यांनीं त्यांच्या समाजाच्या कारणीं लावलें.

♣ ♣ ♣

# माझा देव सगळीकडे

माझ्या बालमित्रांनो !

आमच्या आळींतला चिंतू आहे ना, कशाकशावर म्हणून विश्वास नाहीं त्याचा. कोणीं म्हटलें कीं, " आज फार उन्ह पडलें आहे ! " तर हा विचारील, " कशावरून म्हणतां ? पुरावा काय ? सिद्ध करा. " कुणी जास्त थंडी पडल्याबद्दल तक्रार केली, तर हा एकीकडे हुड्हुड् करीत असतांहि पुरावा मागितल्याशिवाय रहायचा नाहीं. कुणीं सूर्य उगवल्याची बातमी सांगितली, तरी सुद्धां हा पुरावा मागेल !


प्रत्येक गोष्टीबद्दल पुरावा पाहिजे त्याला. आमटी तिखट झाली पुरावा पाहिजे. गणित येत नाहीं, पुरावा पाहिजे. चिंतूनें अभ्यास केला नाहीं, पुरावा पाहिजे !

असा राग येतो त्याचा ! बडव बडव बडवावा, अन् म्हणावें, " पोहोंचला का पुरावा ! "

हें काय ? ज्याविषयीं आपल्याला कळत नाहीं, अशी एखादी गोष्ट शहाण्या माणसानें सांगितली तर तिच्यावर विश्वास ठेवायला नको ? कीं तिच्याबद्दलहि पुरावा मागायचा ? चांगलीं शहाणीं माणसें सांगतील ती गोष्ट खरीच आहे, असें खुशाल मानून चालावें. खुशाल विश्वास ठेवावा त्याच्यावर. हा जो चांगल्या माणसांच्या सांगण्यावर विश्वास, त्याला म्हणावयाचें श्रद्धा !

आपल्या धर्मांत असें सांगितलें आहे कीं, देव सगळीकडे भरलेला आहे. खडीसाखरेंत गोडी भरलेली असते, तसा. एवढी एवढी म्हणून वस्तु देवावांचून रिती नाहीं.

झालें काय, हिरण्यकशिपु नांवाच्या एक दैत्य राजा. तो होता काश्यप आणि दिति यांचा मुलगा. मोठा झाल्यावर त्यानें केला तपश्चर्येला प्रारंभ. शीर्षासन करून जप करायला लागला ब्रह्मदेवाचा. दहा वर्षे झालीं,



वीस वर्षे झालीं, तीस झालीं, शेवटीं शंभर वर्षे झालीं, तरी हा कांहीं शीर्षासन मोडीना ! आपला खालीं डोकें वर पाय करून जप करतोय् सारखा !

शेवटीं ब्रह्मदेव आले त्याच्याकडे. त्यांनीं त्याला विचारलें, " काय पाहिजे तुला ? "

" मला जें पाहिजे तें द्याल ? " हिरण्यकशिपूनें उलट प्रश्न केला.

" हो देईन. "

" तर मग मला मरण नको ! "

" काय ? मरण नको ? "

" हो. दिवसां-रात्रीं, घरांत-बाहेर, माणसाकडून-जनावराकडून, शस्त्रानें-अस्त्रानें, वाळल्यानें-ओल्यानें, कश्शाकश्शानें मला मरण नको. द्या असा वर ! "

ब्रह्मदेव हंसले थोडेसे, अन् म्हणाले,

" ठीक आहे. तूं सांगितलेल्या सगळ्या अटी मान्य. त्या त्या वेळीं अन् त्याच्या त्याच्या हातून मरण नाहीं यायचें तुला ! "

झालें. फुगला हिरण्यकशिपु. त्याला वाटलें, ' आतां मला कोण मारणार ? कुणाची छाती आहे माझी खोडी काढायची ? ' त्याला काय माहीत कीं देव आपल्याहून अधिक हुषार आहे !

मग काय विचारतां ? हिरण्यकशिपूनें आपल्या राज्यांत चहूंकडे आज्ञा सोडल्या कीं, " आतां सगळ्यांनीं माझी भक्ति करायची ! आतां मीच देव आहें. माझी पूजा करायची सगळ्यांनीं. कुणा दुसऱ्या देवाबिवाची केली, तर याद राखा ! "

असे तसे लोक होते ते भ्यायले. त्यांनीं विचार केला कीं, ' काय करतां ? वेळ येईल तशी पाठ फिरवली पाहिजे. कुणी पाहिलेंय् देव आहे कीं नाहीं ? हिरण्यकशिपूचीच पूजा करावी झालें. अहो म्हणतात ना काय बैल गाभणा तर नववा महिना ! '

पण कांहीं माणसें अशीं मजबूत होतीं ! त्यांनीं निश्चय केला. ' काय होईल तें होवो, नाहींच पूजा करावयाची हिरण्यकशिपूची. पूजा

करावी देवाची. तो सर्व कांहीं करूं शकतो. दुसऱ्या कोणाची काय करावी पूजा ! सांगे ना का हिरण्यकशिपु कांहींहि. आपण आपली देवाचीच पूजा करायची. त्यालाच शरण जायचें.'

अन् मग लपून, उघड, जसें जमेल तसें तीं माणसें आपली देवाची पूजा करायचीं. हिरण्यकशिपूचे हेर होतेच कीं त्यांच्या पाळतीवर ! त्यांनीं पटापट हिरण्यकशिपूकडे जाऊन या माणसांच्या केल्या चुगल्या ! अन् मग काय ? भुताच्या हातीं कोलीतच जणुं काय !

तावडतोब हिरण्यकशिपूनें सेवक पाठवून मारीत झोडीत त्या लोकांना पकडून आणविलें. पण तीं माणसेंहि अशीं कांहीं ताठ ! जाम वांकेनातच ! मारा, झोडा, काय वाटेल तें करा. हिरण्यकशिपु डोळे वटारीत अन् दांत-ओंठ खात त्यांच्यावर ओरडला,

"गाढवांनो ! मला सोडून त्या चोराची, ईश्वराची पूजा करतां, नाहीं का ?"

"हो ! कारण त्यानें तुम्हांलाहि निर्माण केलें आहे !" त्या लोकांतला एकजण म्हणाला.

"चूप ! त्या देवाची काय बिशाद आहे माझ्यापुढें ? मला कोणीहि मारूं शकत नाहीं !"

"पण हा वर तरी देवानेंच दिला कीं नाहीं ? शंभर वर्षं खालीं डोकें वर पाय करावे लागले होते त्याच्याकरितां !"

पिसाळून जाऊन हिरण्यकशिपु हात चोळीत ओरडला,

"न्या रे या मूर्खांना ! द्या लोटून कड्यावरून !"

त्या सगळ्यांना कड्यावरून लोटून ठार मारून टाकलें हिरण्यकशिपूनें. पण गंमत अशी झाली कीं, त्याच्या घरांतच मुळीं भांड्याला भोंक पडलें ! त्याची बायको कयाधूच मुळीं देवाची भक्ति करायला लागली !

भारी चांगल्या स्वभावाची होती ती. अन् त्यांत नारदाऱ्यासारखे गुरु मिळाले. मग काय? लोण्यांत खडिसाखरच पडली म्हणायची! ती नारदांना म्हणायची,

" देवर्षि, काय करूं हो! यांचा स्वभाव कधीं सुधारेल?"

" कयाधू, आपण प्रयत्न करीत असावें, अन् देवावर विश्वास ठेवावा. तो सगळें कांहीं चांगलेंच करील."

कयाधू देवाला आळवायची अगदीं कळकळून. ती म्हणायची " देवा! यांना चांगली बुद्धि दे रे! तूं समर्थ आहेस, तुला वाटेल तें करतां येतें. मग एवढं नाहीं का करतां यायचें? यांच्या स्वभावांत बदल नाहीं का करतां यायचा तुला?"

अशा त्या कयाधूला झालें एक बाळ. कसें अगदीं गोजिरवाणें. अगदीं लहानपणापासून आई देवाचीं भजनें म्हणायला लागली कीं, ऐकत काय रहायचें, हंसायचें काय, टाळ्या काय वाजवायचें! तें रडत असलें कीं कयाधूनें भजन म्हणायला सुरुवात करावी कीं झालें गप्प बाळ!

त्याचें नांव ठेवलें प्रल्हाद. प्रल्हाद हळूहळू मोठा व्हायला लागला. त्याचीं खेळणींहि कसलीं? तर कुठें टाळ, तर कुठें चिपळ्या. कुठें विष्णूची मूर्ति, तर कुठें शंकराची पिंडी. मात्र कयाधूला हें सगळें हिरण्यकशिपूपासून लपवून ठेवावें लागायचें. हो! काय करतां? त्या खाष्ट गृहस्थाला दिसलें कीं, तो एक तर पोराला तरी बडवायचा, नाहीं तर कयाधूला तरी त्रास द्यायचा!

प्रल्हाद झाला सात वर्षांचा. तेव्हां एक दिवस हिरण्यकशिपु कौतुकानें त्याला जवळ घेऊन बसला, अन् विचारतो कसा,

" सोन्या तुला काय पाहिजे?"

" सांगूं? बाबा, मला किनई एक छानदार रथ पाहिजे. अन् चांगले पळणारे घोडे."

" काय ? रथ पाहिजे ? हो हो हो हो हो ! " हिरण्यकशिपु हंसत म्हणाला, " वा वा ! छान ! देऊं हां रथ तुला ! चांगला छानदार रथ देऊं. पण कशाला पाहिजे रे रथ ? "

" कशाला पाहिजे सांगूं ? "

" हांSS सांग ! "

" मी किनई त्या रथांत बसेन, अन् आपल्या देशांत जितकीं देवळें आहेत देवाचीं — "

" हूं ! पुढें मग ? " अधीर होऊन हिरण्यकशिपूनें विचारलें.

" तितक्या सगळ्या देवांचें दर्शन करून येईन; अगदीं भर्रकन् — "

हिरण्यकशिपु चिडला. त्यानें प्रल्हादाला दूर लोटलें, अन् म्हणाला,

" हूंSS ! दर्शन करून येशील ? कांहीं नाहीं जायचें ! देव नाहींच मुळीं. ढोंग आहे तें सगळें. तुला कुणी शिकवलें हें पोरा ? सांग. खरें बोल. कुणीं सांगितलें तुला देव असतो म्हणून ? "

छोटासा प्रल्हाद आश्चर्यानें म्हणाला, " कां बाबा ? देव नसतो ? वा असतोच मुळीं तो ! सगळीकडे आहे तो ! अगदीं सगळीकडे. आई अन् नारदमुनि सांगतात. तीं खोटें कशाला सांगतील ? "

दांत-ओठ खात हिरण्यकशिपु म्हणाला, " काय ! तो तंबोरी-वाला जोगडा येतो काय घरीं ! अन् तुझी आईहि त्याला सामील आहे नाहीं का ! थांब तुमची फाटाफूटच करून टाकतों. तुला पाठवतों दैत्य-गुरूकडे, म्हणजे ते तुला माझी भक्ति करायला शिकवतील. "

तावडतोब त्यानें दैत्यगुरूला बोलावणें पाठविलें अन् ते आल्यावर तो त्यांना म्हणाला, " ऐकलेंत गुरुजी, या पोरट्याला घेऊन जा तुम्ही तुमच्याबरोबर. अन् याला माझी भक्ति करायला शिकवा. चांगली शिस्त लावा याला. जा. "

दैत्यगुरु प्रल्हादाला आपल्या आश्रमांत घेऊन गेले. तिथें दुसरींहि कांहीं दैत्यांचीं पोरें होतीं. त्या पोरांबरोबर त्यांनीं प्रल्हादाला शिकवायला केली सुरुवात.

"बरें का पोरांनो! म्हणा, हिरण्यकशिपु महाराज हेच देव आहेत."

बाकीचीं पोरें म्हणालीं. पण प्रल्हाद कांहीं म्हणेना. तो गप्पच राहिला. दैत्यगुरु त्याला म्हणाले, "म्हण कीं रे प्रल्हादा!"

"पण मी उगीच कांहीं तरी खोटें कसें म्हणूं?"

"वा: ! खोटें काय आहे त्यांत?"

"खोटें नाहीं तर काय? मला आईनें अन् नारदांनीं सांगितलें कीं, देव सगळीकडे आहे. त्याला सगळें कळतें. तो प्रकाश देतो. तो पाऊस पाडतो. तो गाईकरितां गवत निर्माण करतो. तो दयाळु आहे. त्याची भक्ति करावी. अन् तुम्ही तर म्हणतां कीं बाबा देव आहेत! ते कुठें आहेत सगळीकडे? ते कुठें प्रकाश देतात अन् पाऊस पाडतात? ते तर रागावतात अन् त्या दिवशीं त्यांनीं दहा-वीस लोकांना मारून टाकायला सांगितलें! ते कसे देव होतील?"

प्रल्हादाची ती बुद्धि अन् देवावरचा विश्वास पाहून दैत्यगुरु चकितच झाले. पण करतात काय? त्यांना कुणीकडून हिरण्यकशिपूची पीडा टाळायची होती. ते म्हणाले,

"बरें बरें! तें कांहीं चालायचें नाहीं. हिरण्यकशिपु महाराजांनाच देव म्हटलें पाहिजे. आलें ध्यानांत? करा रे अभ्यास पोरांनो!"

ते चरफडत बाहेर निघून गेले. पण पोरें कसलीं अभ्यास करताहेत! तीं सगळीं जमलीं प्रल्हादाभोंवतीं. अन् त्याला लागलीं म्हणायला, "भली मजा केलीस, बरें का प्रल्हादा! असेंच पाहिजे होतें गुरुजींना. भारी मारतात ते आम्हांला. अन् रोज म्हणतात महाराजांचीच पूजा करा म्हणून!"

प्रल्हाद म्हणाला, "पूजा करावी देवाची. त्यानें हें जग निर्माण केलें, असें आई म्हणते. तो भारी चांगला आहे. चांगल केलें तर तो चांगलें फळ देतो. वाईट केलें, तर वाईट. गड्यांनो, तुम्हांला भजन करतां येतें का त्याचें ?"

"ऊं हूं !" सगळ्या पोरांनीं इवलालीं तोंडें करून उत्तर दिलें, "आम्हांला कुठें शिकवलें आहे भजन का काय म्हणतात तें !"

हंसून प्रल्हाद म्हणाला, "न का शिकवीना कोणी. मीच शिकवतों. या असे. माझ्या शेजारीं बसा."

अन् मग त्या सगळ्यांनीं मिळून केला भजनाचा ठोक्या सुरू ! पार रंगून गेलीं पोरें. थोड्या वेळानें दैत्यगुरु आंत आले, अन् पहातात तों काय ! सगळीं पोरें प्रल्हादाचें भजन ऐकण्यांत तल्लीन झालेलीं ! गुरूंनाहि कौतुक वाटलें. पण करतात काय ! हिरण्यकशिपूची आज्ञा नव्हती ना ? त्यांनीं आरडाओरडा करून पोरांना पळवून लावलें, अन् प्रल्हादाला जवळ घेऊन समजावूं लागले ते. पण तो कांहीं केल्या ऐकेचना मुळीं ! हिरण्यकशिपूच देव आहे, हें कांहीं पटेना त्याला !

शेवटीं आठ-दहा दिवसांनीं कंटाळून ते प्रल्हादाला परत घेऊन गेले हिरण्यकशिपूकडे. हिरण्यकशिपूनें त्यांना पाहून विचारलें, "काय गुरुजी, शिकला कीं नाहीं प्रल्हाद माझी भक्ति करायला ? गेलें कीं नाहीं त्याचें वेड अजून ?"

गुरु बावरून जाऊन म्हणाले,

"हो ! हो म्हणजे काय ? नाहीं ! नाहीं म्हणजे तसा थोडा थोडा—"

"थोडा थोडा काय ?" हिरण्यकशिपूनें विचारलें.

"थोडा थोडा म्हणजे अजिबातच नाहीं. कांहीं फारसा फरक नाहीं प्रल्हादांत."

" काय ? अजून तो मला देव म्हणत नाहीं ? " संतापून जाऊन हिरण्यकशिपू म्हणाला.

" हो ! असें म्हणायला कांहीं हरकत दिसत नाहीं ! "

" काय रे कार्ट्या ? मला देव नाहीं म्हणत का ? "

" बाबा, " शांतपणें प्रल्हाद म्हणाला, " उगीच खोटें कसें म्हणूं मी ? "

" खोटें काय रे गधड्या ? कुलकलंका ! करायचें काय हें असलें कार्टें ? कोण आहे रे तिकडे ? इकडे या ! न्या या कारट्याला हत्तीच्या पायीं द्यायला ! "

सगळे लोक घाबरले. त्यांना प्रल्हाद भारी आवडायचा. पण करतां काय ? हा दैत्य होता ना पाठीशीं उभा ! आले सेवक पुढें, अन् त्यांनीं चालविला प्रल्हादाला बाहेर ! सगळे लोक गोळा झाले. सगळ्यांना दुःख झालें. ही बातमी कळली कयाधूला. तशी ती रडत-ओरडतच आली धांवत, अन् प्रल्हादाला मिठी मारून म्हणाली, " कुठें रे नेतां माझ्या बाळाला ? "

सेवक थांबले. तों मागून हिरण्यकशिपु आला. तो म्हणाला, " कां थांबलांत ? " सेवक कयाधूकडे बोट दाखवून खालीं माना घालून उभे राहिले. तशी हिरण्यकशिपु पाय आपटीत तिच्याजवळ आला अन् म्हणतो कसा —

" अस्सें ! महाराणी आल्या काय आपल्या पोराला वांचवायला ! सोडत्येस कीं नाहीं त्याला ? "

" नाहीं ! मुळींच नाहीं सोडायची ! मलाहि द्या हत्तीच्या पायाखालीं ! "

" कोण आहे रे ? ओढा तिला धरून ! घ्या हिसकावून तिच्या-कडून तें कार्टें ! "

हिरण्यकशिपूच्या धाकानें दोन-तीन सेवक पुढें झाले. त्यांनीं प्रल्हादाला ओढलें कयाधूजवळून. काय करणार बिचारी! धाय मोकलून रडायला लागली! तों प्रल्हाद तिला म्हणतो,

"आई, आई ग! रडत्येस कशाला तूं? तूंच शिकवलेंस ना मला कीं, देव सगळीकडे आहे म्हणून! मग या हत्तींत नाहीं का तो? माझी श्रद्धा आहे त्याच्यावर. त्याच्या मनांत मारायचें असेल तर मारील मला तो. त्यांत वाईट कसलें? रडूं नकोस तूं."

चालला प्रल्हाद हत्तीकडे. केवढा थोरला हत्ती! दारू पिऊन मत्त झालेला. झुलतो आहे एकसारखा. गेला प्रल्हाद त्याच्याजवळ अन् त्याच्यासमोर आपण होऊन झोंपला. सगळे लोक दुःखी झाले. त्यांच्या डोळ्यांत आंसवें मावेनात. पण कांहीं इलाज नव्हता!

हिरण्यकशिपूनें खूण केली. माहुतानें डोळे पुशीत अंकुश चालवला. सगळ्या लोकांनीं डोळे मिटून घेतले. बघवेना त्यांच्याच्यानें.

तों काय आश्चर्य! हत्ती मुळीं पाऊलच उचलीना! माहुताचा अंकुश रुतून रक्ताची धार वहायला लागली गंडस्थळांतून; चीं चीं ओरडायला लागला, पण पाऊल घालीना तो पुढें! हिरण्यकशिपु हातपाय आपटायला लागला. पण करतो काय?

संतापानें हिरण्यकशिपु म्हणाला, "हत्ती पाय देत नाहीं का त्याच्यावर? ठीक आहे. विष आणा रे एक पेलाभर!"

विष आलें. प्रल्हादानें 'नारायण' 'नारायण' म्हणत हंसतमुखानें त्याला लावला ओठाला. त्याची दृढ श्रद्धा. "माझा नारायण सगळीकडे आहे. तो विषांतहि आहे. त्याच्या मनांत असेल तर मारील तो मला."

पण विषानेंहि प्रल्हाद मेला नाहीं! मग तर चिडलाच हिरण्यकशिपु. त्याला त्यानें विस्तवांत फेंकला धगधगत्या. तरी प्रल्हाद जळाला

नाहीं. शेवटीं पर्वताच्या कड्यावरून लोटला त्याला! तरी प्रल्हाद जिवंतच! नाना उपाय करून पाहिले.

**प्रयासेऽपहृते तस्मिन् दैत्येन्द्रः परिशंकितः।**
**चकार तद्वधोपायान्निर्बन्धे न युधिष्ठिर॥**

शेवटीं खूप चिडला हिरण्यकशिपु. पण तो प्रल्हादावर नव्हे. प्रल्हादाला दांत-ओठ खात विचारलें हिरण्यकशिपूनें,

"कार्ट्या! जर तुझा देव सगळीकडे आहे, तर या समोरच्या खांबांतहि आहे का तो?"

"हो! बाबा, खांबांतहि आहे, तुमच्यांतहि आहे!"

"असें काय गद्ध्या? खांब अन् मी बरोबरीचे का? ठीक आहे. हा मी तुझ्या देवाला मारतों लाथ. पाहूं तो काय करतो तें."

हिरण्यकशिपु उठला आसनावरून. तावातावानें निघाला समोरच्या खांबाकडे. अन् मारली त्यानें एक लाथ तिरमिरीनें!

काडकन् मोडला खांब. अन् त्यांतून नारसिंह मूर्ति बाहेर आली! डोकें तेवढें सिंहाचें अन् बाकी शरीर माणसाचें! तें नारसिंहाचें रुद्र रूप पाहून हिरण्यकशिपु असा कांहीं भ्याला! पण नारसिंहानें ओढलें त्याला, अन् उंबरठ्यावर बसून, संध्याकाळीं, हिरण्यकशिपूचें पोट नखांनीं फाडून ठार मारलें त्याला.

त्याच्या सगळ्या अटी पाळल्या देवानें. अन् मग तें रूप कौतुकानें प्रल्हादाकडे पहायला लागलें. प्रल्हादाच्या देवानें त्याला जवळ घेतलें अन् प्रेमानें कुरवाळलें.

मित्रांनो, दृढ श्रद्धेचें हें फळ.

♣ ♣ ♣

# मांजरीचीं पिलें

माझ्या बालमित्रांनो !

पंढरपूर माहीत आहे ना तुम्हांला ? सोलापूर जिल्ह्यांत आहे तें. त्या पंढरपुराजवळच गोपाळपूर म्हणून गांव आहे. आपलें इतर चार गांवांसारखेंच. तसलींच माळवदी घरें, त्याच पांढऱ्या मातीच्या भिंती, त्याच खोल खोल विहिरी, सगळें तसलेंच.

पण त्या सामान्य गांवांत एक असामान्य मनुष्य होऊन गेला. अन् धंदा कोणता करीत असे माहीत आहे का ? कुंभाराचा. आपला देश किनई फार भाग्याचा. चांगलीं चांगलीं भक्त माणसें होऊन गेलीं या आपल्या देशांत. अन् तीं कुठेंहि, बरें का ! नरहरी सोनार, चोखा महार, वाल्या कोळी, सांवता माळी, नामदेव शिंपी, रोहिदास चांभार, सेना न्हावी, जनी दासी, कान्होपात्रा वेश्या, अशीं किती तरी.

तर त्यांतला हा राका कुंभार. त्याचा मूळ देश गुजराथ. पंढरी-जवळ गोपाळपुरीं येऊन राहिला होता तो. माती आणावी, चांगली चाळावी, खडे काढून टाकावे, तिच्यांत राख मिसळावी, चांगली मळावी, मेहनत मशागत करावी, अन् मग तिचीं मडकीं, सुगडीं, गाडगीं, लोटकीं, रांजण, बोळकीं, परळ, खुजे, पणत्या, दिवल्या असें तयार करावें. पंढरीच्या बाजारांत नेऊन विकावें तें. पोटापुरते पैसे मिळायचे. घरीं बायको अन् एक लहानगें मूल. चंद्रभागेचें स्नान अन् पांडुरंगाचें दर्शन, हा रोजचा कार्यक्रम.

काम करीत असतां देवाकडचें लक्ष चळूं देऊं नये. माती आण-तांना, ती भिजवतांना, मडकीं करतांना आपलें देवाचें भजन करीत

असावें. राकाला माहीत होतें कीं, त्याचा पांडुरंग पंढरीला तर आहेच, पण सगळीकडेच भरला आहे तो. तो नाहीं अशी तसूभरहि जागा कुठें सांपडायची नाहीं.

मडकीं वहायला गाढवें होतीं राकाजवळ. त्याला माहीत होतें कीं, परमात्मा जर सगळीकडे आहे, तर मग तो गाढवांत नाहीं का? त्यांच्यांतहि आहेच तो. म्हणून तो कधीं मारायचा नाहीं गाढवांना. फारसें ओझेंबिझें लादायचा नाहीं कधीं त्यांच्यावर.

त्याच्या घरीं एक मांजरी होती, कुत्रें होतें, त्या सगळ्यांवर राकाचें प्रेम. तो म्हणायचा, " माझा पांडुरंग आहे ना, तो या माझ्या मनीमध्यें, वाघ्यामध्यें, सगळ्या सगळ्यांत आहे भरलेला. त्याचींच रूपें आहेत तीं. सगळें जगच मुळीं त्याचें रूप आहे. "

राकाचा गळा मोठा गोड. तो भजन करायला लागला कीं, माणसें अगदीं रंगून जायचीं. राका भजन करायचा खरा, पण काम बंद नाहीं. रांजण थापटतां थापटतां त्या तालावर भजन सुरू. त्या भजनाच्या धुंदींत चाललें आहे राकाचें काम. माती मळतांना त्या मातींत नाचावें लागतें. मग काय, राकाचें नाचणें चालू अन् देवाला आळवणेंहि चालू !

एकदां झालें काय, राकानें केलीं खूपशीं मडकीं. वेगवेगळ्या आकाराचीं. कांहीं लहान, कांहीं मोठीं. कांहीं रांजणहि केले त्यानें. कांहीं बोळकींहि केलीं. लवकरच संक्रांत येणार होती, म्हणून कांहीं सुगडींहि केलीं.

अन् मग त्यांचा रचला एक भला मोठा आवा. आवा म्हणजे भट्टी. खालीं भरपूर जळण घालायचें. त्याच्यावर मडक्यांचा एक थर. मडक्यांच्यामधेंहि जळण घालायचें. त्या थरावर परत एक जळणाचा थर. त्यावर परत मडकीं. सगळीं मडकीं रचून झालीं कीं, ती भट्टी जळणानें चांगली झांकायची. अन् तिच्यावर चांगली भरपूर माती पसरायची, ती लवकर जळूं नये म्हणून. मग वाराबिरा नाहीं फारसा, असें पाहून पेटवून

द्यायचा तो आवा. आठ-दहा दिवस जळत रहातो. थंड झाल्यावर हळू हातानें काढून घ्यायचीं मडकीं.

तर राकानें आवा चांगला छानदार रचून तयार केला. चांगला चहूंकडून झांकून-पाकून टाकला अन् खालीं ठेवलें तोंड पेटवण्याकरितां अन् धूर जाण्याकरितां. पण आवा रचून झाला, अन् मोठा जोराचा वारा सुटला. चार दिवस झाले, सहा दिवस झाले, तो कांहीं बंद होईना. राका बायकोला म्हणाला,



"काय ग, वारा तर बंदच होईना कीं. मग आवा कसा पेटवायचा?"

"खरेंच. आतां पेटवला तर भुरकन् जळून जायचा. कच्चींच निवायचीं मडकीं."

" ऊं हूं. तें बरें नव्हे. पैसे घेतों आपण गिऱ्हाईकाकडून, माल चांगला दिला पाहिजे त्यांना. होऽऽ. गिऱ्हाईक म्हणजे पांडुरंगच आहे माझा. त्याला असें फसवूं नये."

" मग काय करतां ?"

" असें करतों मी. तोंवर गोटेगांवला जाऊन येतों."

" पण लवकर याल ना ? नाहीं तर गोटेगांवचे हरिबुवा अन् तुम्ही बसलां दोघेजण भजनाला कीं, दोघांनाहि वेळ सुचायची नाहीं कीं काळ सुचायचा नाहीं !"

" ऊं हूं. लवकर येईन मी. आव्याचें लक्षांत आहे माझ्या."

निघाला राका गोटेगांवला. तिथें गेल्यावर हरिबुवांबरोबर चार दिवस भजनकीर्तनांत घालविले त्यानें, अन् वारा थांबला, तसा परत यायला निघाला.

इकडे काय झालें, राकाची मांजरी झाली होती व्यायला. भली छानदार होती ती. तांबूस रंगाची. चांगली गुबगुबीत होती. मोठी इमानी होती. दुधाचें गाडगें अगदीं समोर असायचें तिच्या. पण कधीं तोंड घालायची नाहीं त्यांत. तिचा एक परळ ठरलेला होता. त्यांत भाकरी कुसकरून घातली, म्हणजे मग खायची. एऱ्हवीं तुमचें दूध असो कीं तूप असो, कधीं म्हणून चोरून खायची नाहीं. भूक लागली म्हणजे राकाच्या बायकोच्या पायांत घोटाळायची म्यांव् म्यांव् करीत.

तर राका तिकडे गेला गोटेगांवला, अन् इकडे मांजरी लागली विण्याकरितां जागा शोधायला. सगळ्या घरांत हिंडली ती. कुठें कांहीं मनाजोगती जागा दिसेना तिला. शेवटीं ती गेली आव्याकडे. आव्याला खालीं जें तोंड ठेवलें होतें, त्यांतून शिरली ती आंत. तिथें एक रांजण होता आडवा ठेवलेला. त्यांत होता जळणांतला पाला-पाचोळा. तिला

वाटलें, ही जागा बरी आहे एका बाजूला. इथें कुणी येणार नाहीं, अन् आपल्या पिल्लांना हात लावणार नाहीं.

राका गेल्यावर दुसऱ्या दिवशीं दुपार झाली, तरी मांजरी येईना घरांत खायला. राकाची बायको म्हणाली, " कुठें गेली कोण जाणे मनी. कीं कुठें जाऊन व्यायली ? पार भरले होते तिचे दिवस. चला शोधूं या तरी. "

निघाली ती बाहेर. हांक मारलीन् तिनें, " मनी मनी ईऽऽ "

तरी मनी येईना. मग गेली मागील दारीं. तिथें मारली हांक, " मनी मनी ईऽऽ "

तरी मनी येईना. " कुठें गेली कोण जाणे बया. " असें म्हणत ती आव्याकडे गेली. तिथें जाऊन हांक मारलीन, " मनी मनी ईऽऽ "

तशी पुटकन् त्या रांजणांतून उडी मारली मनीनें, अन् म्यांव् म्यांव् करीत घोटाळायला लागली तिच्या पायांत. राकाची बायको तिच्याकडे पाहून म्हणाली, " अगबाई ! व्यायलीस कीं काय आव्यांत ? बघूं तुझीं पिलें. "

ती गेली आव्याजवळ. आंत त्या रांजणांत हात घालून तिनें मांजरीचीं पिलें काढलीं बाहेर. मांजरी चाटायला लागली आपल्या पिलांना. कशीं पांढरीं शुभ्र होतीं तीं पिलें, अगदीं सशासारखीं. राकाची बायको म्हणाली, " वा, भारी छान आहेत बरें का तुझीं पिलें. राहूं देत इथेंच चार दिवस हे येईस्तोंवर. हे आले म्हणजे मग दुसरीकडे नेऊन ठेऊं यांना. "

मांजरीला जणुं काय समजलेंच हें. ती म्यांव् म्यांव् करीत राकाच्या बायकोचे पाय चाटायला लागली. तिनें तिला घरांत नेऊन चांगलें भरपूर दूध अन् भाकरी खाऊं घातली.

राका परत यायला निघाला गोटेगांवाहून. वाटेनें चालतां चालतां भजन चालू होतें त्याचें. रंगून गेला होता तो भजनांत.

**विठोबा रखुमाई। छंद लागला तुझे पायीं ॥**

तोंडानें चाललें होतें भजन. मनांत चाललें होतें विठोबाचें ध्यान. पाय चालत होते गोपाळपूरची वाट. रस्त्यांत जो माणूस भेटायचा त्याला गोरोबा म्हणायचा, " जय हरि, देवा. " तो माणूस हंसून म्हणायचा, " जय हरि, राकाबुवा. "

आला राका घरीं. पहातो तों बायको बाहेर गेलेली. त्यानें शेजारीं विचारलें,

" ही कुठें गेली ? "

शेजारणीनें सांगितलें, " ती गेली रानांत शेण्या वेंचायला. संध्याकाळीं येईल घरीं. भाकरी झांकून ठेवली आहे तिनें. म्हणाली कीं, आले तर जेऊन घ्यायला सांगा. "

" बरें बरें. "

राकानें दार उघडलें. भाकरी खाल्ली. ढेंकर देत बाहेर आला. अन् त्यानें विचार केला कीं, वारा कमी झाला आहे. आवा पेटवायला कांहीं हरकत नाहीं आतां.

मग त्यानें पाटीभर चवळ आणलेंन्. तें घातलेंन् आव्याच्या तोंडांत. अन् मग चकमक झाडून केला विस्तव, अन् दिलें चवळ पेटवून. दोन-चार दिवस वाऱ्यानें हडकलें होतें जळण. भरॅकन् पेट घेतला त्यानें, अन आवा पेटला. माती टाकली होती त्यावर म्हणून धूर निघायला लागला चांगला भरपूर.

बसला राका पलीकडच्या बाजूला भजन करीत. तों मांजरी आली धांवत. तिनें जेव्हां आवा पेटलेला पाहिला, तेव्हां काय विचारतां ? आकान्त मांडला तुसता ! त्या आव्याभोंवतीं घिरट्या काय

घालायची, रडायची काय, ओरडायची काय, राकाच्या समोर येऊन लोळायची काय. राकाला कांहीं कळेचना. तो म्हणाला,

" कां ग बाई रडत्येस ? काय झालें तुला ? अरे, ही व्यायली ? पिलें कुठें आहेत तुझीं ? अरेरे ! नाहीं सांपडत ? कीं बोक्यानें खाल्लीं ? देवा रे ! ये ये माझी बया ती ! ये बेटा ! "

राकानें मांजरीला उचललेंन्. तशी ती त्याच्या हातून निसटली. अन् रडत रडत परत आव्याभोंवतीं घिरट्या घालायला लागली. ती कां करत्येय् असें कांहीं समजेना राकाला. व्याकुळ झाला तो.

राकाच्या बायकोनें जेव्हां रानांत शेण्या वेचतां वेचतां आपल्या आव्यांतून धूर निघतांना बघितला तेव्हां धस्स झालें तिच्या छातींत. ती म्हणाली, " आले वाटतें हे. पेटवला त्यांनीं आवा. अन् तीं मांजरीचीं पिलें ? जळलीं कीं काय तीं ? देवा रे ! आतां काय करूं ? "

निघाली ती धांवत-पळत घराकडे. रस्त्यांतल्या लोकांनीं विचारलें, " काय झालें ? का पळत्येस बाई ? "

पण उत्तर द्यायला वेळ कुठें आहे तिला ? धूम पळत आली घराकडे. राका मांजरीला थोपटीत बसला होता तिथें. राकाला आश्चर्यच वाटलें. तो म्हणाला, " कां ग ? "

धांपा टाकीत तिनें विचारलें, " पिलांना काढलेंत बाहेर ? "

राका चमकला. त्यानें विचारलें, " कुठून ? "

" आव्यांतून ? "

झालें आतां कळलें राकाला, मांजरी कां रडत होती तें. उभा राहिला तो. आवा चांगला धडकला होता. चहूंकडून पेटला होता. राकाला असें वाटलें कीं, धरणी कां दुभंग होईना. घाम फुटला त्याच्या अंगांतून. नुसत्या धारा वहायला लागल्या.

बायको रडत अन् डोळे पुशीत म्हणाली, " कशीं छान पिलें होतीं पांढरीं पांढरीं फेक. इथेंच खालच्या रांजणांत व्याली ती. म्हटलें तुम्हीं आलांत, म्हणजे अगोदर पिलांना तिथून हालवूं. अन् मग आवा पेटवूं. जळलें माझें मेलीचें तोंड! आजच आठवलें मला रानांत जाणें. सांगूनहि ठेवलें नाहीं शेजारीं. आतां काय जगत्येय् मांजरी. प्राण टाकील ती. काय ग बाई पाप केलें होतें गेल्या जन्मीं! डोळयादेखत पिलें भाजून काढलीं. आई ग! काय करूं आतां ? "

मांजरी थकून जाऊन एकाच ठिकाणीं अस्ताव्यस्त पडली होती; अन् तिथूनच थोड्या थोड्या वेळानें म्यांव् म्यांव् करायची ती.

राकाच्या डोळयांतून धारा वहायला लागल्या आंसवांच्या. तो तिथेंच खालीं बसला, अन् स्फुंदत स्फुंदत म्हणायला लागला,

" पांडुरंगा, बरें कवतुक दाखविलेंस!

" काय बिवडविलें होतें तुझें मीं? काय अपराध केला होता? कुणाला त्रास दिला होता?

" आजपर्यंत हातानें तर नाहींच नाहीं, तोंडानेंहि दुखविलें नाहीं कुणाला. तूं सगळीकडे भरला आहेस म्हणून कोणालाहि दुःख दिलें नाहीं. ज्याची त्याची पूजा करीत होतों. नमस्कार करीत होतों ज्याला त्याला. माझ्या गाढवांनाहि कधीं त्रास दिला नाहीं मीं.

" त्याचे बरे पांग फेडलेस! बरीं पिलें मारवलीस माझ्या हातून. मन्येबाई, काय करूं ग मी आतां? काय केलें म्हणजे रडायची थांबशील तूं? काय केलें म्हणजे तुला बरें वाटेल?

" कसें बरें वाटेल तिला? तिचीं पिलें. इवलालीं इवलालीं. गोजिरवाणीं. जणू कळयाच मोगऱ्याच्या. त्या कुसकरल्या म्यां चांडाळानें. या आपल्या हातांनीं विरतव घातला आव्यांत. या तोंडानें फुंकर घालून पेटवला आवा. होरपळलीं असतील बिचारीं आंतल्या आंत. म्यांव्

म्यांव् केलें असेल त्यांनीं. आईला हांक फोडली असेल. विस्तव जवळ पोहोंचला तेव्हां आक्रोश केला असेल त्यांनीं आईकरितां. त्यांना वाटलें असेल, आतां तरी आई येईल, आम्हांला उचलून घेऊन जाईल.

" पण आई जाऊं शकली नाहीं. मीं रस्ता बंद केला होता तिचा. "

थडथडा डोकें बडवून घ्यायला लागला राका. माणसें जमलीं आवतींभोंवतीं. त्यांतला एक म्हातारा राकाचे हात धरून म्हणाला, " राक्या, असें काय मारून घ्यावें बरें ? आलें देवाजीच्या मना, तेथें कोणाचें चालेना. मेलीं तर मेलीं पिलें. पुढल्या पाळीला जरा काळजी घ्यावी. " थांबला राका. उठून उभा राहिला तो, अन् डोळे पुशीत म्हणाला,

" मेलीं तर मेलीं ? नाहीं मरायचीं तीं ! मीं कुणाचें वाईट केलें नाहीं. देवहि माझ्या हातून वाईट नाहीं करवायचा. नाहींच मरायचीं. मेलीं नाहींतच तीं ...

" पांडुरंगा, तुला मारतां येणार नाहींत तीं पिलें. मुळींच नाहीं मारतां यायचीं. जिवंत ठेवलींच पाहिजेत. ठेवशील तूं ?

" तूं प्रल्हादाकरितां खांबांतून आलास, द्रौपदीकरितां लुगडीं बनलास, अर्जुनाचे घोडे धुतलेस, आतां माझ्याकरितां त्या पिलांजवळ बस. वांचीव तीं पिलें.

" न जाणतां आवा पेटविला मीं. माहीत नव्हतें मला. या माझ्या अपराधाबद्दल एवढी मोठी शिक्षा देशील मला ? एवढा मोठा दंड करशील ?

" उंहूं ! तूं दयाळू आहेस. करशील ना एवढें ? पांडुरंगा, ये रे, माझें कुंभाराचें एवढें काम कर रे. कुंभार म्हणून दूर लोटूं नकोस मला.

" मग येशील ना ? तूं येईपर्यंत मी पाणीहि पिणार नाहीं. तुझें भजन करीत असेन. जोंपर्यंत आवा विझत नाहीं तोंपर्यंत. तुला वांचवलेंच पाहिजे पिलांना. वांचवशीलच तूं.

" हो, माझा पांडुरंग वांचवीलच पिलें. "

राकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसायला लागला. तो मांजरीजवळ गेला. अन् त्यानें तिच्या पाठीवरून हात फिरवीत तिला म्हटलें, " बाई मन्ये, रडूं नकोस आतां. माझा पांडुरंग वांचवणार तुझीं पिलें. "

तिला जणुं काय समजलेंच तें. शांत झाली ती.

राकाचें भजन सुरू झालें. रंगून गेला राका. भान राहिलें नाहीं त्याला. दिवस गेला, रात्र आली. रात्र संपली, दिवस उजाडला. परत दिवस मावळला, रात्र झाली. पण खाणें नाहीं. पिणें नाहीं, सारखें देवाला आळवतो आहे राका.

लोक म्हणायला लागले, " खरेंच वांचतील का हो पिलें ? "

एक शंकाखोर म्हणाला, " छट् ! कुठलीं वांचताहेत आतां. पार गेलीं जळून तीं. अन् कल्पना करा, न जळलीं, तरी भुकेनें तडफडून मरतील. वेडा आहे झालें राका. उगीच उपास करीत पडला आहे. "

पण राकाचें कुठें आहे लक्ष ! त्याची ब्रह्मानंदीं टाळी लागलेली. चौथा दिवस उजाडला, अन् आवा विझत आला.

सहा दिवस झाले. अजून राकाचें भजन संपलें नाहीं. गळून गेलेला राका. अंगांत शक्ति राहिली नाहीं एवढीशीहि. तरी त्याचें भजन चालूच होतें. शेवटीं सातव्या दिवशीं शेजाऱ्यांनीं उपसला आवा. काढलीं वरचीं मडकीं. तों काय आश्चर्य ! पिलांचें म्यांव् म्यांव् ऐकूं यायला लागलें आंतून. त्यांनीं त्या रांजणाच्या भोंवतालची राख बाजूला केली तों गोजिरवाणीं पिलें उड्या मारीत बाहेर आलीं. मांजरीला जाऊन बिलगलीं तीं. मांजरी त्यांना चाटीत पाजायला लागली. सगळ्यांच्या डोळ्यांतून कौतुकाचीं आंसवें वहायला लागलीं. राका हंसत म्हणाला, " मला माहीतच होतें, माझा पांडुरंग जळूं द्यायचा नाहीं तीं पिलें. "

माझ्या मित्रांनो ! राकाची दृढ श्रद्धा होती देवावर, तिचें हें फळ.

# मातृभक्त गरुड

माझ्या बालमित्रांनो !

'देवीअपराधक्षमापनस्तोत्र' या नांवाचें एक संस्कृत स्तोत्र आहे बरें का. भारी सुंदर अर्थ आहे त्याचा. अन् शब्दांची ठेवणहि तितकीच सुंदर. कांहीं श्लोक तर फारच सुंदर उतरले आहेत. त्यांतल्या तीन-चार श्लोकांचा शेवट पुढीलप्रमाणें आहे :

**कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥**

कळला या ओळीचा अर्थ ? नसेल कळला तर मी सांगतों. तो कवि देवीला म्हणतो, " माते, मुलें वाईट निपजणें ही गोष्ट कांहीं अशक्य नाहीं. पण दुष्ट आई कुठें शोधूनहि सांपडणार नाहीं. "

केवढा विश्वास आहे आईवर ! केवढी निष्ठा ! आई दुष्ट असूंच शकणार नाहीं. सगळ्या जगांतलें मांगल्य आईजवळ सांठवलेलें. सगळ्या विश्वांतील पवित्रता आईजवळून उगम पावलेली. आईकरितां वाटेल तें करावें लागो, आईला दुःख भोगूं द्यायचें नाहीं. कारण ती पवित्र आहे. ती पहिला देव आहे ! उपनिषदकार देवांची मोजणी करतांना पहिलें स्थान आईला देतो. अगोदर " **मातृदेवो भव** " अन् मग " **पितृदेवो भव** । "

तुकारामबुवांचा एक सुंदर अभंग आहे. ते म्हणतात, लाभाशिवाय प्रीति करणारी एकटी आईच !


**लेकुराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥**
**ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीती ॥**
**पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥**

अपंग, आंधळें, लंगडें, मुकें असें एखादें मूल कुणाच्या प्रेमानें जगतें ? कोण प्रेम करतें त्याच्यावर ? कुणाच्या कुशींत वाढतें तें मूल ? सगळ्या जगापेक्षां मोठा आश्रय कुठें असतो त्या मुलाला ?

एक आईच ! सगळें जग त्या मुलाच्या टिवल्याबावल्या करतें. अशा वेळीं त्याला आपल्या पदराआड लपवून त्याचा सांभाळ करणारी आईच खरें का !

त्या आईची एकनिष्ठ भक्ति करणारीं किती तरी माणसें होऊन गेलीं आपल्या देशांत. ' काय वाटेल तें होवो, मी आईचे पांग फेडीनच फेडीन. ' अशा निर्धाराचीं. पराकाष्ठेचीं 'मातृभक्त'. ही गोष्ट अशाच एका मातृभक्त मुलाची आहे.

पूर्वी काय झालें, आपल्या या भरतवर्षात कश्यप नांवाचे एक



प्रसिद्ध ऋषि होऊन गेले मोठे तपस्वी अन् विद्वान् होते ते. ते ज्या अरण्यांत रहात असत, त्या अरण्यावर प्रजापति नांवाच्या राजाची



सत्ता होती. त्या प्रजापतीला दोन मुली होत्या. एकीचें नांव विनता अन् दुसरीचें नांव कद्रु.

तुम्ही म्हणाल, "हः! कद्रु हें कसलें नांव? हां! विनता हें नांव चांगलें आहे. पण कद्रु म्हणजे काय? ऐकायलाहि:तर कसंसंच वाटतें!"

बरोबर आहे तुमचें म्हणणें. ही जी कद्रु होती ना, ती अगदीं नांवासारखीच द्वाड होती आपल्या एकच एक बहिणीचा भारीच द्वेष करायची ती. उगीचच्या उगीचच ' प्रजापतीला पडला प्रश्न कीं असल्या या द्वाड पोरीशीं कोण लग्न लावतो?

पण मग त्याला सुचली एक युक्ति. त्यानें विचार केला, ' हां, असें करावें! जो विनतेशीं लग्न करील, त्यालाच कद्रूहि देऊन टाकूं म्हणजे झालें. ' अन् मग तो लागला जांवई शोधायला. कुणी एकानें त्याला सांगितल.

कश्यपांचें नांव. कश्यपांचें विद्याध्ययन अन् तीर्थयात्रा संपून आतां ते एका नदीच्या कांठीं आश्रम बांधून विद्यार्थ्यांना शिकवूं लागले होते.

प्रजापतीनें विचार केला, चांगला सत्पात्र ब्राह्मण आहे, यालाच द्याव्या आपल्या मुली. अन् मग त्यानें मोठ्या थाटामाटानें आपल्या मुलींचें लग्न कश्यपाशीं लावून दिलें. विनता आणि कद्रु दोघीजणी प्रजापतीच्या घरून आपल्या पतीच्या आश्रमांत रहायला गेल्या.

अगोदरच कद्रूला विनतेविषयीं भारी प्रेम! आणि त्यांत आतां दोघीहि एकाच ठिकाणीं दिलेल्या! मग काय? पदोपदीं कद्रु खार करायची विनतेचा. तिला जें काय मिळेल त्याच्या दुप्पट हिला पाहिजेच! तिला दोन नेसणीं मिळालीं तर हिला चार पाहिजेत. तिला एक फुलांची माळ मिळाली, तर हिला तीन तरी पाहिजेतच!

एकदां काय झालें, कश्यप सहज थट्टेनें म्हणाले, "ऐकलेस का ग विनते, तुला किती मुलें व्हायला हवींत?"

विनता लाजली अन् म्हणाली, "इश्श! हें कसलें भलतेंच विचारणें?"

ऋषि हंसले अन् म्हणाले, "अग लाजलीस काय अशी? खरेंच विचारतोंय् मी तुला!" विनता विचार करीत म्हणाली, "मला आपलीं दोन पुरे झालीं. पण मात्र तीं चांगलीं निपजावीं."

तेवढ्यांत कद्रु आली धांवतच; अन् म्हणाली, "काय? काय दिलें तिला?"

कश्यप म्हणाले, "कांहीं नाहीं ग! मुलांबद्दल विचारीत होतों."

"मग किती दिलींत तिला?"

"दिलीं कुठलीं? मागितलींन् तिनें दोन मुलें."

"दोन मागितलीं का? मग मीहि मागत्यें."

"किती पाहिजेत तुला?"

" मला पाहिजेत शंभर ! "

अन् झालेंहि तसेंच ! कद्रूला शंभर मुलें झालीं. अन् विनतेला झालीं दोनच. अगदीं आपापल्या आयांसारखीं. कद्रूचीं शंभर मुलें अगदीं कद्रूसारखीं द्वाड, दुष्ट अन् मारकुटीं. विनतेचीं मात्र चांगलीं सालस स्वभावाचीं. तिच्या थोरल्या मुलाला सूर्याच्या सारथ्याची जागा मिळाली. धाकटा मात्र तिच्याजवळच असायचा. आईवर त्याचें भारी प्रेम. सगळ्या कामांत तिला अगदीं लहानपणापासून मदत करायचा तो. आई पाणी आणायला जायची, हाहि जायचा लहानशी बुटकुली घेऊन. आई धुणीं धुवायचीं, हाहि म्हणायचा, " आई, मी धुवूं लागतों. "

पण कद्रूचीं मुलें मात्र दिवसभर उनाडायचीं. इकडे दगड फेंक, तिकडे ढेकूळ मार ! याला त्रास दे, त्याला दुखापत कर ! या गाईच्या पाठींत काठी घाल, त्या बैलाला जखमी कर ! या विद्यार्थ्याची शेंडी ओढ, त्या विद्यार्थ्याला सतावून सोड ! दिवसभर यांचे हे उद्योग चालायचे !

होतां होतां एकदां काय झालें, देवांनीं समुद्रमंथन केलें, अन् त्याच्यांतून रत्नें निघालीं बाहेर. त्या रत्नांत उच्चैःश्रवा नांवाचा एक छानदार घोडा होता. पांढरा पांढरा फेक. अगदीं दुधासारखा. तर विनता अन् कद्रू या दोघीजणी त्या रत्नांविषयीं बोलत बसल्या, त्यांत निघाली उच्चैःश्रव्याची गोष्ट. विनता म्हणाली, " कद्रूताई, उच्चैःश्रवा कसा छान पांढरा पांढरा आहे, नाहीं ग ? "

विनतेनें एखादी गोष्ट सांगितली अन् कद्रूनें तिला होय म्हटलें, मग कद्रूचें काय राहिलें ! ती पटकन् म्हणाली, " मुळींच नाहीं पांढरा. शेपूट काळें आहे त्याचें. "

विनता म्हणाली, " काळें कुठून असेल ? मला चांगलें आठवतें आहे. सबंध पांढरा आहे. "

कद्रू पेटली हट्टाला. ती म्हणाली, " अन् शेपूट काळें असलें तर ? "

"तर काय?"

"तर माझी दासी होशील?"

"हो! होईन की! तुझी दासी व्हायला मला एवढीशीहि लाज वाटायची नाहीं." विनता बिचारी सहज बोलून गेली.

'भली पकडली आतां! माझ्या पोरांना पिटाळतें उच्चैःश्रव्याजवळ अन् त्यांना सांगतें कीं, घोड्याच्या शेपटीवर सांवली धरून उभे रहा' कद्रूनें विचार केला. आणि दोघींचें उच्चैःश्रव्याला बघायला जायचें ठरलें.

दुसऱ्या दिवशीं दोघी निघाल्या घोडा पहायला. कद्रूनें अगोदरच आपल्या पोरांना पाठवून दिलें होतें. घोडा चांगल्या छानदार उन्हांत उभा होता. जवळ जाऊन पहातात तों काय! खरेंच कीं! त्याची शेपटी पांढरी फेक नव्हती! काळसर छटा होती तिच्यावर. विनतेला बिचारीला काय माहीत कीं कद्रूच्या पोरांनीं सांवली धरल्यामुळें ती शेपटी काळसर दिसत्येय् तें! ती ओशाळली.

कद्रूला जो कांहीं आनंद झालाय्! ती म्हणाली, "कां माझेंच म्हणणें खरें ठरलें कीं नाहीं? बोल ना आतां!"

विनता म्हणाली, "होय ताई. तूंच खरी ठरलीस."

"मग आतां? तूं दासी झालीस माझी! खरें कीं नाहीं?"

विनतेला बिचारीला काय माहीत कीं खरोखरच कद्रु आपल्याला दासी बनवील म्हणून! पण ती वचन देऊन चुकली होती. मान खालीं घातलीन् तिनें. आतां काय? कद्रूला आभाळ ठेंगणें झालें. मोरे ताठ्यांत म्हणाली, "हां, चल आतां हें माझें वस्त्र घेऊन लवकर! उगीच उशीर करूं नकोस!"

विनता मुकाट्यानें कद्रूचें वस्त्र घेऊन चालूं लागली.

कद्रूनें असा कांहीं छळ सुरू केला विनतेचा त्या दिवसापासून! आपण मोरे पायांवर पाय टाकून बसली रहायची. अन् स्वयंपाक करणें,

चाढणें, उष्टीं काढणें, भांडीं घासणें, धुणीं धुणें, पाणी आणणें हीं सगळीं कामें विनतेला करायला लावायची. अन् तेंहि सरळ शब्दांत नव्हे.

"झाला कीं नाहीं स्वयंपाक? आळशी मेली! सकाळपासून पहात्यें आहें तर आपली स्वयंपाकघरांत ठाण मांडून बसली आहे! भांडीं कोण तुझा काकोबा घाशील वाटतं?"

जसें कांहीं हिचा काकोबा अन् विनतेचा काकोबा वेगवेगळेच होते!

"हीं धुणीं कशीं वाळूं घातलीं आहेत? धांदरट कुणीकडची. सगळीं कामें मुळीं बेअकलीपणानें करायचीं!"

पण एवढ्यानेंच संपलें नाहीं. हीं सगळीं कामें उरकलीं कीं मग विनतेला कद्रूचे हातपाय दाबावे लागायचे. तिच्या तोंडावरच्या माशा पंख्यानें उडवाव्या लागायच्या. अन् हें सगळें शिव्या खातां खातां. विनता बिचारी हें सगळें मुकाट्यानें सहन करून घ्यायची.

पण गरुडाला कांहीं हा प्रकार उमजेना! त्याला वाटे, 'ही कद्रु मावशी असें काय करत्येय्! हिला काय झालें कोण जाणे?'

तो आपला आईला जेवढी मदत करतां येईल तेवढी करायचा. तरी पण आईला कांहीं रात्रीं त्याला थोपटून झोंपवायलाहि सवड मिळायची नाहीं. भारी वाईट वाटायचें त्याला. पण आईला बोलायलाहि वेळ नाहीं. मग विचारावें कसें? प्रत्येक वेळीं कुणी ना कुणी बरोबर असायचें.

शेवटीं एक दिवस गरुड आणि विनता अशीं दोघेंच एकदां पाणी आणायला निघालीं. तिथें घागरी भरल्या अन् म्हणाला, "आई?"

विनतेनें गरुडाकडे पाहिलें मात्र. खळकन् तिच्या डोळ्यांतून आंसवें ओघळलीं! गरुडाला पोटाशीं धरलें तिनें. कांहीं बोलवेना तिच्यानें.

गरुडालाहि गहिंवरून आलें. त्यानें परत हांक मारली, " आई ग ! बोल ना ! "

विनतेनें स्वतःला सांवरलें अन् म्हणाली, " काय बाळ ? "

" तुलाच एकटीला कां काम करावें लागतें ? अन् मावशी तुला असें फडाफड बोलत्ये कां ग ? "

" काय सांगूं सोन्या ? मी दासी झालें आहें तिची. " अन् मग तिनें त्या दिवशीं झालेली सगळी हकीकत सांगितली गरुडाला. गरुड खिन्न होऊन म्हणतो, " आई, आतां आपण कधींच मोकळे होणार नाहीं का ग ? "

" देव जाणे बाळ ! "

पण हळूहळू गरुडाचाहि त्रास वाढत चालला. कद्रूचीं मुलें उगीचच ताणायचीं त्याला. त्यांचीं सगळीं कामें गरुडाला करावीं लागायचीं. तो खूप विचार करायचा. पण कांहीं उपाय सुचेना त्याला. आईचे ते कष्ट तर पहावेनात त्याला.

शेवटीं एक दिवस आई केर काढीत होती, तेव्हां गरुड तिच्या-समोर उभा राहिला. अन् म्हणाला, " आई ! "

" काय बाळ ? "

" याला कांहींच उपाय नाहीं का ? "

" नाहीं बाळ ! "

" नाहीं कसा ? असलाच पाहिजे ! मी जाऊन विचारतों कद्रु मावशीला ! "

तसाच तडक निघाला गरुड. कद्रु अन् तिचीं मुलें बसलीं होतीं चकाट्या पिटीत. तिथें गेला तो. अन् म्हणाला, " मावशी, काय केलें म्हणजे आई या दासीपणांतून मोकळी होईल ? "

कद्रु अन् मुलें खो खो करून हंसायला लागलीं. गरुड चिडला अन् म्हणाला, " हंसतांय् काय अशीं ! सांगा कीं ! "

थोरला मुलगा म्हणाला, " दासीच्या पोराला एवढा दिमाख कशाला पाहिजे रे ? मी सांगतों उपाय. करतोस ? "

एक क्षणभरहि विचार न करतां गरुड म्हणाला, " होऽऽ ! "

" अमृत आण आमच्याकरितां स्वर्गांतून. "

किती आनंद झाला गरुडाला ! तो म्हणाला, " बस एवढेंच ? अन् अमृत आणलें म्हणजे मोकळी कराल आईला ? "

" हो हो ! जा. तूं अमृत आणलेंस कीं तुझी आई मोकळी आहे. "

निघाला गरुड. दुसरें कांहीं सुचेना त्याला. 'आतां मी स्वर्गांतून अमृत आणीन. अन् मग माझी आई स्वतंत्र होईल !' एका झेपेसरसा निघाला तो. स्वर्ग म्हणजे कांहीं जवळ नव्हे. किती तरी लांब आहे तो. किती तरी दूर. पण गरुडाला त्या आनंदापुढें सुचेचना कांहीं. तो निघाला झपाट्यानें.

देवांनीं जेव्हां हें ऐकलें तेव्हां त्यांनीं अमृताभोंवतालचा बंदोबस्त जास्त मजबूत केला. जिथें अमृताच्या घागरी होत्या, तिथें त्यांनीं आणखी पहारेकरी ठेवले. कारण त्यांना गरुडाची शक्ति माहीत होती. पण गरुड कशाचा ! तिथें पोहोंचल्याबरोबर त्यानें आपल्या पंखाच्या झपाट्यानें अन् चोंचीनें एकेका पहारेकऱ्याची वाट लावून टाकली ! ते आपल्या शस्त्रांनीं गरुडाला मारायला लागले. पण गरुड कशाला सांपडतोय् त्यांच्या सपाट्यांत ! तो पटकन् उडून जायचा. शेवटीं देवांनीं पाहिलें कीं, आपण गेल्याशिवाय कांहीं जुळत नाहीं. म्हणून ते आपापलीं शस्त्रें सांवरून सगळे धांवत आले गरुडाकडे.

पण गरुडानें केली एक युक्ति. देव जवळ आले असें पाहून त्यानें आपले पंख जमिनीवर आपटून अशी कांहीं धूळ उडविली कीं देवांना

कांहीं दिसेनासें झालें. त्यांना कळेचना गरुड कुठें आहे तें. उगीचच कुणीकडे तरी शस्त्रें फेंकायला लागले ते. अन् त्या गोंधळांत अमृताचा कलश घेऊन गरुड निघाला तिथून !

देवांची ही फजिती पाहून इंद्र धांवला वज्र घेऊन अन् त्यानें जोरानें गरुडावर फेंकून मारलें तें. पण गरुड कशाचा ऐकतोय् ! त्यानें दधीचि ऋषींचा मान राखण्याकरितां एक पीस मात्र टाकून दिलें खालीं. अन् परत निघाला ! मग मात्र इंद्र पळत जाऊन त्याला म्हणाला, " अरे गरुडा, मला ठाऊक नव्हता तुझा पराक्रम. आतां आपण मित्र होऊं या. "

गरुडाला वाटलें कीं, ही चांगली गोष्ट आहे. तो उभा राहिला. अन् इंद्र जवळ आल्यावर त्याला म्हणाला, " इंद्रा, मला तरी काय करायचें आहे अमृत ? "

" मग कशाला नेतो आहेस ? " इंद्रानें विचारलें.

गरुडानें सर्व हकीकत त्याला सांगितली. इंद्र म्हणाला, " पण हें कांहीं चांगलें नाहीं गड्या ! तशा त्या द्वाड पोरांना अमृत पाजून तूं काय करणार ? "

शेवटीं त्या दोघांनीं ठरवली एक युक्ति. गरुड अमृताचा कलश घेऊन आईजवळ आला. कद्रूच्या मुलांना वाटलें होतें कीं, हा काय अमृत आणणार ? पण त्याला अमृतकलश घेऊन आलेला पाहून ते धांवतच आले गरुडाजवळ.

गरुड म्हणाला, " हां हां ! अशी गडबड करूं नका ! अगोदर सांगा. माझी आई स्वतंत्र झाली ना ? "

" हो ! हो ! झाली तुझी आई स्वतंत्र. आतां उशीर नको करूं गड्या. "

" अरे पण असेंच पारोसें पिणार वाटतें अमृत तुम्ही ? स्नान तरी करून या ! तोंपर्यंत मी हा कलश इथें ठेवतों या दर्भांवर. "

" अरे, हो ! हेंहि खरेंच कीं ! चला रे, स्नान करून येऊं आपण सगळे. "

कद्रूचीं मुलें निघालीं आंघोळीला. गरुडानें अमृतकलश दर्भावर ठवून दिला. इंद्रानें ही संधि पाहून तो कलश पळवला !

पण आतां विनता स्वतंत्र झाली होती ! गरुड तिच्याजवळ जाऊन म्हणाला, " आई, तूं मोकळी झालीस ! अगदीं मोकळी ! "

विनता त्याचें मस्तक हुंगून म्हणाली, " झालें बरें ! माझा सोन्या तो ! "

तिच्या डोळ्यांतून वहाणाऱ्या आनंदाच्या आंसवांनीं अभिषेकच केला गरुडावर.

♣ ♣ ♣

# आई आलोंना मी !

माझ्या बालमित्रांनो,

तुमच्यापैकीं किती जणांना ' वंदे मातरम् ' हें गीत येतें ?

कांहीं जणांना तर अवश्य येत असेल. किती सुंदर आहे म्हणून सांगूं तें गीत ? ज्या कवीनें तें केलें ना तो किनई अगदीं आपल्या आईशीं एकरूप झाला. तो म्हणतो,

**तुमि विद्या तुमि धर्म तुमि हृदि तुमि मर्म त्वं हि प्राणाः शरीरे**
**बाहु ते तुमि मा शक्ति । हृदये तुमि मा भक्ति**
**तोमारइ प्रतिमा गडि मंदिरे मंदिरे ॥ वंदे मातरम् ॥**

" आई, तूं विद्या आहेस, तूं धर्म आहेस, तूं हृदय आहेस. या शरिरांतील प्राण तुझें स्वरूप आहे. तूं बाहूंतील शक्ति आहेस. हृदयांतील भक्ति आहेस. हीं जितकीं मंदिरें दिसतात ना, तितक्या सर्व मंदिरांत तुझीच मूर्ति बसलेली आहे. आई, तुला प्रणाम असो. "

किती छान अर्थ आहे नाहीं ? तो कवि इतर सगळ्या गोष्टी विसरून गेला आहे. त्याला आईशिवाय कांहींहि दिसत नाहीं. त्याला जिकडे तिकडे आई दिसते. इकडे आई, तिकडे आई. चहूंकडे आईच भरलेली आहे ?

हें सुंदर गीत कुणीं केलें माहीत आहे ?

3002



हें केलें बंकिमचंद्रांनीं. बंगालमध्यें रहाणारे बंकिमचंद्र. बंगाल भारी चांगली भूमि आहे. तिथें आईचीं दुःखें जाणणारीं किती तरी मुलें जन्मलीं. उल्हासकर, इंदुभूषण, बाबू अरविंद घोष, खुदीराम बोस, सुभाषबाबू, एक ना दोन, किती तरी.

त्या बंगालमध्यें एक मातृभक्त मुलगा जन्मला. त्याचें नांव ईश्वरचंद्र विद्यासागर. तो विद्यांचा सागर होता. संस्कृत, व्याकरण, तर्क, साहित्य, षड्दर्शनें, ज्योतिष, सामुद्रिक, धर्मशास्त्र, वेद, वेदांग सगळें कांहीं त्याला येत होतें. सगळ्या विद्यांत तो पारंगत होता. तो बंगालमध्यें जन्मला. बंगाली त्याची मातृभाषा. पण त्याला हिंदी, इंग्रजी हेंहि उत्कृष्ट यायचें. अत्यंत बुद्धिमान् होता तो.

पण नुसती बुद्धिमत्ता ही कांहीं कौतुकाची गोष्ट नव्हे. नुसत्या बुद्धिवैभवानें मनुष्याला माणुसकी येत नाहीं. त्या माणुसकीला अंतःकरण लागतें. हृदय लागतें. भावना लागतात. आपले हे ईश्वरचंद्र अत्यंत सहृदय होते. त्यांच्याजवळ बुद्धि तर अमूप होती. पण तिच्या जोडीला अत्यंत कोमल असें अंतःकरणहि होतें त्यांच्याजवळ.


दिसायला कांहीं ईश्वरचंद्र फारसे सुंदर नव्हते. त्यांच्या डोक्यावर एक भली मोठी शेंडी असे. ते म्हणत, "या शेंडीबिंडीनें मी अगदीं उडीसा ब्राह्मणासारखा दिसतों नाहीं ?" उडीसा ब्राह्मण म्हणजे स्वयंपाकी बंगाल्यांत स्वयंपाक करायला उडीसा ब्राह्मणांना ठेवतात. ईश्वरचंद्र तसे दिसायचे. पण मनुष्याचा मोठेपणा त्याच्या सौंदर्यावर का अवलंबून असतो ?

छे ! मोठेपणा हा चांगल्या कपड्यांवरून ठरवितां येत नाहीं. मोठेपणा ठरवायला चांगला सुंदर चेहराहि उपयोगी पडत नाहीं. मग कशानें ठरतो मोठेपणा ?

मोठेपणा हा हृदयाच्या श्रीमंतीवर अवलंबून आहे. ईश्वरचंद्र मोठे होते. फार मोठे होते. कां ? त्यांचें हृदय अत्यंत श्रीमंत होतें. त्यांचें मन अत्यंत मोठें होतें. ते फार मोठ्या पगाराच्या जागेवर होते. तरी पण कुणीहि मनुष्य त्यांच्याकडे जावो. तो कितीहि गरीब असो. त्याचे कपडे कितीहि फाटके असोत. ईश्वरचंद्र विद्यासागर त्याला आपल्याजवळ बसवायचे. त्याची विचारपूस करायचे. अन् त्याला कांहीं तरी मदत केल्याशिवाय त्यांना बरेंच वाटायचें नाहीं.

बंगाल प्रांतावर निसर्ग कधीं कधीं रागावतो. तो तिथें खूप पाऊस पाडतो. सगळीं भाताचीं शेतें पाण्यानें भरून जातात. नद्यांना मोठमोठे पूर येतात. कितीक गरिबांचीं घरें वाहून जातात. शेतांतलें धान्य कुजून जातें. अन् मग बिचाऱ्यांच्या फजितीला पारावर नसतो. घरें नदीनें वाहून नेलीं ! भाकरी पावसानें हिरावून घेतली ! त्यांनीं कुणाकडे फिर्याद करायची ? कुणाजवळ तोंड वेंगाडायचें त्यांनीं ? समुद्र नदीवर रागावला. तिनें कुठें जायचें ? नदी माशांवर रागावली. त्यांनीं कुणाच्या पदराआड लपायचें ?

पण ईश्वरचंद्रांना अशा पीडलेल्यांचा भारी कळवळा. एकट्याला किती करतां येणार ? पण जितकें करतां येईल तितकें सगळं ईश्वरचंद्रांनीं



करावें. त्यांनीं स्वतः दुष्काळानें पीडलेल्या खेडेगांवांत जाऊन रहावें. अन् मग त्या भुकेल्यांच्या अन्नाची काळजी करावी. उघड्यांच्या कपड्यांची

काळजी करावी. वणवण पायीं हिंडावें. कांट्यांतून, कुट्यांतून हिंडून अशा गांजलेल्या लोकांची व्यवस्था करावी त्यांनीं. ईश्वरचंद्रांना अशा कष्टांतच भारी आनंद व्हायचा. त्यांना त्यांतच भारी समाधान वाटायचें.

असा मोठ्या हृदयाचा मनुष्य तो. त्याच्या मातृभक्तीची गोष्ट.

त्या वेळीं ईश्वरचंद्र हे कलकत्त्याला फोर्ट वुइल्यम महाविद्यालयांत संस्कृतचे प्राध्यापक होते. नुकतीच नोकरी लागली होती त्यांना. अन् त्या वेळीं भारी स्वस्ताई; त्यामुळें प्राध्यापकांना पगार थोडासाच असायचा. विद्यासागरांना सारा ५० रुपयेच पगार मिळायचा. पण त्या ५० रुपयांत



ते किती तरी कामें करायचे. त्यांनीं इंग्रजी अन् हिंदी शिकण्याकरितां दोन शिक्षक ठेवले. त्या दोघां शिक्षकांना मिळून ते २५ रुपये महिना

देत. त्या शिक्षकांचेंहि तेवढ्यांत छान भागायचें. उरलेल्या २५ रुपयां-पैकीं २० रु. ईश्वरचंद्र घरीं आईकडे पाठवीत ! अन् उरलेल्या पांचच रुपयांत ते आपला सगळा खर्च भागवायचे ! खाणें-पिणें त्यांतच, घरभाडें, न्हावी, धोबी, सगळें कांहीं त्यांतच ! एका प्राध्यापकाला सबंध महिनाभर खर्चायला ५ रुपये पुरत ! आतां तर कितीकांचा वर-खर्चच दहा-बारा रुपये होऊन जातो !

त्या नोकरीवर असतांना काय झालें, ईश्वरचंद्रांच्या धाकट्या भावाचें ठरलें लग्न. ईश्वरचंद्रांचें मूळचें गांव वीरसिंह. तिथें तें लग्न व्हायचें. तशी घरीं मंडळी जमायला झाली सुरुवात. हे आले, ते आले. मामे, चुलते, माम्या, चुलत्या, मावश्या, मावसे, भाऊ, बहिणी सग-ळ्यांची गर्दी व्हायला लागली. ईश्वरचंद्रांची आई भारी चांगली. तिनें विचार केला, 'हे सगळे आले, फक्त माझा ईश्वरचंद्रच काय तो राहिला.' म्हणून तिनें त्यांना पाठवलें एक पत्र.

त्या पत्रांत तिनें लिहिलें होतें, " बरें का, तुझ्या धाकट्या भावाचें ठरलें लग्न सगळी मंडळी गोळा झाली आहेत. एकटा तूंच नाहींस. त्यामुळें कसंसेंच वाटतेंय्. तरी कसेंहि करून निदान लग्नाला तरी येच तूं. येशील ना ? "

तें पत्र ईश्वरचंद्रांना मिळालें. वाचल्याबरोबर भारी आनंद झाला त्यांना. आईचें पत्र. आईवर भारी प्रेम त्यांचें. तिचें पत्र. अन ती लिहितेय्, " कसेंहि करून निदान लग्नाला तरी येच तूं. येशील ना ? "

बस्स ठरलें. जायचेंच. माझी आई बोलावत्ये आहे ना ? मग जायचेंच. तसेच उठले ईश्वरचंद्र. अन् गेले महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे. ते प्राचार्य होते मार्शल या नांवाचे एक इंग्रज गृहस्थ. ईश्वरचंद्रांना पाहिल्याबरोबर ते म्हणाले, " या विद्यासागर ! आज मधेंच आलांत ? आपण तर कधीं मधेंच भेटायला येत नाहीं ? "

"आज थोडेंसें काम आहे, म्हणून आलोंय्." विद्यासागर म्हणाले.

"काय काम आहे ? बोला ना !"

"आईचें पत्र आलें आहे गांवाहून. तिनें दोन दिवसांकरितां घरीं बोलावलें आहे मला. धाकट्या भावाचें आहे लग्न. तरी मला दोन दिवसांची रजा पाहिजे."

"छे छे ! पंडितजी, आतां तर परीक्षा जवळ आल्या आहेत आतां रजा कशी मिळेल तुम्हांला ? छे ! अगदींच अशक्य !"

"पण मी माझ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास सगळा संपवलाय्. आतां केवळ उजळणी सुरू आहे."

"तरी पण कसें जातां येईल तुम्हांला ?"

"मला तर गेलेंच पाहिजे. माझ्या आईची आज्ञा आहे ती. मला कशी मोडतां येईल ?"

"पण सध्यां तर आपण महाविद्यालयाचे नोकर आहांत. आज आपल्याला आपल्या अधिकाऱ्यांची आज्ञा मानली पाहिजे. मी सांगतों, आपल्याला जातां येणार नाहीं."

"मीहि सांगतों कीं, मग मला गेलेंच पाहिजे. येतों मी."

विद्यासागर तटकन् उठून घरीं आले. सबंध रस्ताभर ते विचार करीत होते, 'ही असली कसली नोकरी ? मला माझ्या आईच्या भेटीलाहि जातां येत नाहीं ! किती तरी माणसें घरीं जमलेलीं, कुठल्या कुठल्या गांवांचीं. मुद्दाम कोण जातो भेटायला ? कुणाला वेळ आहे एवढा ? अनायासें एकत्र झालेलीं. सगळ्यांचा परिचय होतो. संबंध वाढतो. मैत्री होते. जन्माची मैत्री. अन् शिवाय त्या ठिकाणीं माझ्या आईनें बोलावलेंय् मला. अन् म्हणे जाऊं नका ! मी जाणारच.

'पण साहेब रागावेल !

'रागावेना का रागावला तर. मी मुळीं राजीनामाच लिहून पाठवितों. असली नोकरी काय कामाची ? बस. ठरलें. करायचीच नाहीं नोकरी. मला ब्राह्मणाला काय ? कुठेंहि कुणालाहि शिकवीन. कोणीहि जेवायला घालील मला.'

विद्यासागरांनीं आपल्या प्राध्यापकाच्या जागेचा राजीनामा लिहिला ! अन् तो पाठवून देऊन ते निघायच्या तयारीला लागले.

'पण आजच या पावसालाहि खूप फावलें ! चहूंकडून भरून आलेंय्. आकाशांत गडगडायलाहि लागलेंय्. विजाहि कशा लवलव करताहेत. पाऊस येणार वाटतें खूप सपाटून. पण तरी मला गेलेंच पाहिजे.'

निघाले ईश्वरचंद्र. एखाद्या निश्चयी वीरासारखे. त्यांचें शरीर भलें मजबूत होतें. त्या सगळ्या संकटांना तोंड देत ईश्वरचंद्र निघाले.

पण जसजसे ते चालायला लागले, तसतसा सूर्यहि धांवतच होता कीं घरीं जायला ! संध्याकाळ व्हायला आली. अन् पावसाचा रंगहि बदलत चालला. आतांपर्यंत नुसतेंच गडगडत होतें, नुसत्याच विजा लवत होत्या. नुसतेंच अंधारून आलें होतें. पण आतां पावसाला सुरुवात झाली.

चांगला जोराचा पाऊस. हा एवढा बोरासारखा एकेक थेंब. टपाटप पडताय्. जसा कांहीं कोणी दगडच मारतो आहे ! सगळीं रस्त्यांतलीं माणसें अन् गुरें पळायला लागलीं आडोशाला. कुणीहि उरला नाहीं रस्त्यांत.

पण आपले मातृभक्त ईश्वरचंद्र मात्र चाललेच होते. सगळीं माणसें आडोशाला थांबत होतीं. तीं ईश्वरचंद्रांना म्हणत होतीं, "अहो पंडितजी ! अहो थांबा कीं ! कुणीकडे जातांय् एवढ्या पावसांत ?"

" जाऊं द्या मला. माझ्या आईनें बोलावलेंय् मला. मला गेलें पाहिजे."

पावसाचा जोर वाढत चालला. विजांचा लखलखाट वाढत चालला. मेघांचा गडगडाट वाढत चालला. जशा कांहीं तोफा सुटताहेत आकाशांतून. कडकड करून एखादी वीज कोसळायची. असें वाटायचें कीं, आतां कांहीं खैर नाहीं. आपल्यावरहि एखादी वीज कोसळणारच !

पण ईश्वरचंद्र मात्र थांबले नाहींत. कारण त्यांना आईनें बोलावलें होतें !

सगळीकडे पाणीच पाणी झालें. रस्त्यांत गुडघाभर पाणी. पावसाच्या आवाजापुढें कसलाहि आवाज ऐकायला येईना. मधून मधून साथ द्यायला मेघांचा गडगडाट. अंधारगुडुप. अंगाला जसे बाण टोंचताहेत. कुठें कुणी कुत्रेंहि दिसत नाहीं. पण एकटे ईश्वरचंद्र मात्र सपासप पावलें टाकीत निघाले आहेत. ते म्हणताहेत, " मला माझ्या आईनें बोलावलें आहे. गेलें पाहिजे मला."

कपाळावरून डोळ्यांवर ओघळणारें पाणी एका हातानें निरपून टाकीत ईश्वरचंद्र झपाझप निघाले आहेत. रस्ता माहीत आहे त्यांना. अंधार पडला आहे; म्हणून रस्ता कांहीं चुकायचे नाहींत ते. झपाट्यानें निघाले आहेत.

कां ? एवढी काय घाई आहे त्यांना ? वाटेंत एक नदी आडवी वहाते आहे. दामोदर नांवाची नदी. जर का तिच्यांत जास्त पाणी आलें तर आणखी एक पंचाईत ! म्हणून ते झपाझप निघाले आहेत.

पण देवालाहि त्यांची परीक्षाच पहायची होती. अगदीं नेमकें तसेंच झालें. ईश्वरचंद्र दामोदर नदीजवळ येऊन पहातात, तों ती तुडुंब भरून दुथडी वहात चाललेली. सपाटून पाणी. मारे लांकडें अन् ढोणके

झपाट्यानें वहात चाललेली. केवढा तरी आवाज होत होता त्या पाण्याचा. आतां काय करायचें ?

ईश्वरचंद्र तसेच भिजत नावाड्यांच्या घरांकडे निघाले, अन् ओरडून म्हणाले, " अरे खेवटभय्या, आहे का कुणी ? "

ते सगळे लोक बसले होते दिव्याभोंवतीं चिलमी फुंकीत. त्यांना वाटलें, कोण बोलावतो आहे काय जणें असल्या मुसळधार पावसांत ? परत एक हांक ऐकूं आल्यावर त्यांच्यांतला एक म्हणाला, " अरे कोण आहे ? "

दारापाशीं सगळ्या अंगावरून पाणी निथळत असणारे पंडित ईश्वरचंद्र उभे होते. ते म्हणाले, " मी आहें ईश्वरचंद्र. चला ना ! मला पलीकडे जायचेंय् ! "

" बाप रे ! पलीकडे ? अशा पुरांत ? पंडितजी, आतां रात्रभर रहा इथेंच. सकाळीं जरा पूर उतरल्यावर मग चलूं आपण. "

" नाहीं रे गड्या ! मला आत्तांच गेलें पाहिजे. काय तुम्हांला लागतील तितके पैसे घ्या. पण आत्तां चला. "

" छेः ! आत्तां नाहीं पंडितजी. तुम्ही पुष्कळ पैसे द्याल. पण तिथें तर प्राणांशीं खेळायचें आहे ना ! एवढ्या रात्रीं कोणीहि चलणार नाहीं पलीकडे. "

आतां ? आतां काय करायचें ? आईनें तर आज रात्रीं बोलावलें आहे !

तें कांहीं नाहीं. गेलेंच पाहिजे मला. नाहीं येत ना नावाडी ? न का येईनात. मी एकटाच जाईन. चांगले पोहतां येतेंय् मला. मी पोहत पोहत जाईन. कसेंहि करून गेलेंच पाहिजे मला. आई घरीं वाट पहात असेल.

कपडे काढून चांगलें सांवरले त्यांनीं. धोतर मजबूत बांधलें. " माताजी की जय ! " अशी गर्जना केली अन् मग —

त्या महाभयंकर दामोदर नदींत त्या काळ्याकुट्ट रात्रीं बेधडक उडी ठोकली. किती तरी ओंडके, किती तरी भोंवरे, किती तरी पाण्याबरोबर वहात आलेले साप ! पण त्या सगळ्यांतून वाट काढीत सपासप निघाले ईश्वरचंद्र. त्यांना आईनें बोलावलें होतें !

नदीच्या पलीकडेच होतें त्यांचें गांव. घरीं किती तरी माणसें जमलीं होतीं. आई सारखी दारांतून डोकावून पहात होती. पावसाचे थेंब घरांत येत होते. तशीच ती दारांत येऊन डोकावून जायची. " अजून माझा ईश्वरचंद्र नाहीं आला ! "

घरांतलीं माणसें तिची थट्टा करीत होतीं. " कुठचा येतोय् तुझा मुलगा ? तूं आपली वेडी ! उगाचच डोकावते आहेस वारंवार. आतां का कुठें येतोय् ईश्वरचंद्र ? झालें, अकरा वाजून गेले रात्रींचे. अगा कलकत्त्याची मजा सोडून कशाला येतोय् तो इथें ? "

पण आईला मात्र विश्वास. " माझा ईश्वर आल्याशिवाय रहायचा नाहीं. " इतक्यांत –

पावसामुळें लावून घेतलेलें दार वाजलें. आई धांवतच आली दाराजवळ. अन विचारायला लागली, " कोण आहे ? "

" मी आहें आई, ईश्वर ! "

आईनें दार उघडलें. बाहेर पाण्यानें नखशिखान्त भिजलेले, ईश्वरचंद्र उभे होते !

" आई, आलों ना मी ! "

" आलास ना ? मला माहीतच होतें तूं येणार म्हणून ! "

मग सगळीं माणसें भोंवतीं गोळा झालीं. अन् ईश्वरचंद्र अशा तुफान पाण्यांत नदी पोहून घरीं आले, हें ऐकून सगळ्या थट्टा करणाऱ्यांनीं माना खालीं घातल्या. आईचें अंतःकरण ...

बा. क्र. ९८८ दि.
क्र. ना. ना.
IRBK-0109897